साप्ताहिक

# माणूस

६ एप्रिल ८५ / २ रूपये




## पिंपरी-चिंचवड महानगर

# दोन वर्षांपूर्वी आणि आता...

## दरवर्षी दीड टक्का सवलती कमी करा..

## राखीव जागा आंदोलनाबद्दल...

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : पंचेचाळीसावा

६ एप्रिल १९८५
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १९२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

ग्रामायन अंक

# केवळ जनकल्याणवाद नको

बाबुराव चंदावार

'माणूस'चा *ग्रामायन* विशेषांक(दि.२३मार्च) जेवढ्या आस्थेने माझ्याकडे भेट म्हणून पाठविण्यात आला तेवढ्याच आस्थेने तो हाती पडताच मी वाचून काढला सागवी-सांडसची सांगितलेली गोष्ट वाचनीय झालेली आहे. वाचनीय करण्याच्या प्रयत्नात काहीवेळा गोष्ट आशय हरवून बसते. तसे या गोष्टीचेही झाले असेल की काय हेच वाचताना मी दक्षतापूर्वक पाहत गेलो; पण आशय हरवून बसणारी ही गोष्ट नाही असेच माझ्या लक्षात आले.


असे जरी आहे तरी केलेल्या कार्याचा प्रचार करणे व कार्याचा हेतू पढवीत रहाणे या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत, हे या ठिकाणी मला मुद्दामच सांगितले पाहिजे. देशात अनेक ठिकाणी चाललेल्या ग्रामीण क्षेत्रातल्या कार्याचा माझा या ना त्या कारणामुळे सबंध येत असतो आणि मी स्वतः अनेक राज्यात राहून अशा कार्यात अनेक वर्षे दिलेली असल्यामुळे माझे या बाबतीतले काही निष्कर्षही आहेत कार्याचे यश कशाला म्हणावयाचे असा प्रश्न फार पूर्वीच अशा कार्याच्या बाबतीत निर्माण झाला असून या विषयी म्हणावी तेवढी स्पष्टता अद्याप होत नाही म्हणून जे कार्य केले जाते ते यशस्वी करण्याच्या आमच्या कल्पना बऱ्याच मोघम स्वरुपाच्या होऊन बसलेल्या आहेत. अद्याप त्या तशाच मोघम स्वरुपाच्याच आहेत. म्हणून शेवटी प्रत्यक्ष क्षेत्रातल्या कार्यकर्त्यांच्या आकलनशक्तीवर व समजशक्तीवर विसबून राहणेच पत्करावे लागते. तेव्हा आकलनात सूक्ष्मता आणणे व या आधारे समाज विकसित करीत जाणे या दोहोंचे महत्त्व कमी होता उपयोगाचे नाही. मला या दृष्टीने आमच्यातल्या ज्या काही उणीवा असतील (त्या आहेतच) त्या पुन्हा पुन्हा तपासून त्यातून मुक्त होण्याची आवश्यकता वाटते. या दृष्टीने विचार केल्यास प्रत्यक्ष सुरू केलेल्या व *असलेल्या कार्यात, आलेल्या आणि* येणाऱ्या अडचणीचे स्वरूप व त्याची मूलतत्वे वारंवार शोधतच राहण्याची गरज आहे. अशा बाबतीत झालेल्या प्रयत्नात बिहारमध्ये मुजफ्फरपूर जिल्ह्यात मुशहरी प्रखंडात (ब्लॉक) जेपींनी जे ग्रामीण उत्थानाचे कार्य केले होते त्याचा दृष्टिकोण मला सर्वात अधिक प्रमाणात आकर्षून घेऊ शकला. मुशहरीच्या शेजारीच वैशाली प्रखंडात मी त्यावेळी ग्रामीण उत्थानाच्या कार्यात रममाण झालेलो होतो. जेपींनी स्वतः केलेल्या प्रत्यक्ष कार्याच्या आधारे एक निबंध त्यांनी लिहिला होता. तो पुढे जाऊन समाजशास्त्राच्या अभ्यासकांना अतिशय मोलाचा वाटला असून त्याची देशविदेशात बरीच चर्चाही झाली होती. निबंधाचे नाव 'आमने सामने' (हिंदी) 'फेस टू फेस' (इंग्रजी). ग्रामीण उत्थानाच्या कार्याला निश्चित असा समाजशास्त्रीय दृष्टिकोण लाभल्याशिवाय अशा कार्याची मौलिकता सिद्ध करणे शक्य होत नाही, हे हा निबंध वाचल्यानंतर कोणाच्याही सहज लक्षात येईल.

म्हणून मला सर्व प्रथम हेच सुचवायचे आहे की, ग्रामीण उत्थान साधण्यापाठीमागचा आमचा दृष्टिकोन काय आहे तो सुस्पष्ट करायला हवा. जे आम्ही करू व सांगू त्याची प्रेरणा जर स्पष्ट होत राहिली तरच समाजशास्त्रात भर घालण्याच्या दृष्टीने ते उपयोगी मानले जाईल आणि हेच यशाचा मार्ग प्रशस्त करण्यास सहाय्यक होईल. या दृष्टीने मी जेव्हा ग्रामायन विशेषांक वाचला तेव्हा श्री. माजगावकरांच्या तोंडून प्रगट झालेल्या एका वाक्याजवळ मी थबकलो व त्यावर विचार केला.

'खेड्यातील गरीब, दलित वर्गाला आर्थिक व सामाजिक उपक्रमातून बलवान करून, स्वतःच्या पायावर उभे करणे, हे ग्रामायनचे कार्य आहे.' (पृष्ठ १६)

या विशेषांकात ज्या उपक्रमांचा परिचय करून दिला गेला आहे त्याची मूळ प्रेरणा या वरील संकल्पात आहे असेच जर म्हटले तर त्याचा आशय काय असू शकेल हे तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. आणि यातूनच कार्याची स्पष्टता होऊ शकेल.अर्थात या दृष्टीने ग्रामीण उत्थानाचे दोन भाग पडतात. एक जनकल्याण. (वेलफेअर) दुसरे मूलभूत परिवर्तन. जनकल्याणाचे स्वरूप सध्या जेवढे सुस्पष्ट आहे तेवढेच मूलभूत परिवर्तनाचे स्वरूप सुस्पष्ट नाही. मूलभूत परिवर्तनाची जी आकर्षणे सध्या निर्माण केली गेलेली दिसतात त्या सर्वांचे वेगवेगळे हेतू आहेत. एका विशिष्ट समाज रचनेचा हेतू अशा आकर्षणाचा असतो–आहे. आणि या बाबतीत ज्यांना अतिशय घाई झालेली असते ते अनेक परीने तडजोड करून आपला हेतू पुढे दामटण्याचा प्रयत्नहो करतात. याची स्पर्धा या देशात सध्या सुरू आहे. या स्पर्धेत बहुराष्ट्रीय कंपन्या, अर्थसहाय्य देणाऱ्या विदेशी संस्था, जॉइंट स्टॉक कंपन्या, रचनात्मक कार्य करणाऱ्या विविध संस्था व प्रतिष्ठाने, राजकीय विचारसरणीने भारलेल्या राष्ट्रीय व जागतिक संघटना, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरचे धर्म, पंथ व संप्रदायांची विविध कार्ये या सर्वांचा समावेष करता येईल. शेवटी या सर्वांच्या कार्याचे पर्यवसान जनकल्याण वादातच होते असेही दिसून येत आहे. व यामुळे समाज रचनेची उद्दिष्टे मागे पडत आहेत, असेही लक्षात येत आहे. या बाबतीत कोणताही पण सुस्पष्ट दृष्टिकोन स्वीकारण्याची आवश्यकता आहे. याच्या अभावी ग्रामीण उत्थान कार्यात उतरलेल्या सर्व संस्था व त्यांचे कार्य संकुचित स्वार्थ (व्हेस्टेड इंटरेस्ट) साधण्याची केंद्रेच बनतील, बरीच बनलीही आहेत. अशी केंद्रे या देशात मुबलक आहेत. याचे चालक गांधीवादी–सर्वोदयी जसे आहेत तसेच मार्क्सवादी, समाजवादी, हिंदुत्ववादी आहेत. नक्सली उग्रवादीही आहेत. या सर्वांचे कार्य मानवी उत्थानाचा आशय बरोबर घेऊन परिणाम साधण्याच्या पात्रतेचे अद्याप तरी झालेले नाही–होत नाही. उलट प्रस्थापितांची अशुभ शक्ती या देशात प्रबळ होत आहे असेच दिसते.

हे जरी काही असले तरी बिचकून जाऊन हाती घेतलेले कार्य मधेच सोडू नये. उलट ते अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्नच करायला हवा. म्हणजे मानवी उत्थानाचा विशुद्ध हेतू दृढतेने तडीस नेणेच आवश्यकही आहे. यातच डोळस होता आले पाहिजे. ग्रामायन या दृष्टीने दृढ निश्चयाचा परिचय देईल अशी आशा वाटते. □



# मुंबापुरी

## □ दादांचा फावला वेळ

मुख्यमंत्री वसंतदादा पाटील फावल्या वेळात काय करतात असा आम्हाला नेहमी प्रश्न पडायचा. म्हणजे कायेय की राज्यकारभारात काही खास रस घ्यावा अशी एकूण परिस्थिती नाही. राहता राहिल्या निवडणुका. त्याही संपल्या. मंत्रिमंडळात डॉक्टर वामनराव शेरेकरांचा समावेश करावा की नाही, हे हायकमांड नक्की करणार.

विधानपरिषदेवर कोणाची वर्णी लावायची तेही इंद्रप्रस्थीच ठरणार. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी काँग्रेस (आय)च्या उमेदवारांची यादी तीही मुरली देवरा ठरवणार. मग दादा इतक्या प्रचंड फावल्या वेळात करणार तरी काय ?

याचं उत्तर परवा मिळालं. बेहरामभॉय काँट्रॅक्टर यांच्या 'आफ्टरनून' या नव्या सायंदैनिकात दादांनी असं जाहीर करून टाकलंय की फावल्या वेळात ते मिकीमाऊस ही चित्रमालिका व्हीडियोवर पाहतात. भले बहाद्दूर ! नाहीतर आमचे (चुकलो, आमचे नव्हेत) जगन्नाथ मिश्रा. त्यांनी फावल्या वेळात बिहार प्रेस बिल काढलं. ज्योती बसूंनी फावल्या वेळात मुलासाठी (त्याचा फावला वेळ सत्कार्णी लागावा या सद्हेतूने) बिस्किटांचा कारखाना काढला. त्यापेक्षा मिकी माऊस किंवा 'हियर इज ल्यूसी'सारखी चित्रमालिका पाहणं म्हणजे किती छान टाइमपास ना !

एवढ्या मोठ्या पदावर असूनदेखील दादा मिकी माऊस व्हीडियोवर पाहतात. काय थोर आहे. पुराणकाळी एक राजा होऊन गेला तो ऐन संक्रमणाच्या परिस्थितीत बागेत जाऊन चित्रं काढत बसायचा. त्यापैकीच हे. दादा, तत्त्वज्ञानी पुरुषांची ही लक्षणं आहेत बरं ! आता फक्त एक करा. गुणवंत नांद्यांना सांगून विधानसभेत प्रत्येक दालनात असा मिकी माऊसचा खेळ व्हीडीयोवर दाखवा म्हणजे आमदारांना मोडलेल्या खुर्च्या अन् पोटातले गुद्दे अजिबात आठवणार नाहीत.

## □ जागा वाटपाचं भांडण

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीची तारीख जाहीर झाली आहे. येता शनिवार हा उमेदवारीचा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस. पण अजूनही विरोधी पक्षांचे ऐक्य होण्याची चिन्हे दिसत नाहीत तुम्ही म्हणाल यात नवीन काय सांगितलेत ? पण त्याच त्याच बातम्या वेगवेगळ्या प्रकारे सांगणे हेच यशस्वी पत्रकारितेचे गमक आहे.

विरोधी पक्षाचे नेते रोज भक्तिभावाने शरद पवारांच्या सारंग येथील निवासस्थानी जमतात. परंतु जागा वाटप हा मुलीचे लग्न जमवण्यापेक्षाही कठीण प्रकार आहे असा आजपर्यंतचा अनुभव आहे. ह्या खेपेस डॉक्टर दत्ता सामंतांच्या कामगार आघाडीने पुलोदची दमछाक केली आहे.

युतीची बोलणी करण्यामध्ये शरद पवारांसारखा नेता उभ्या महाराष्ट्रात शोधून सापडणार नाही असे म्हटले जाते. याउलट अगदी बोटावर मोजता येईल इतक्या मालकांना दत्ता सामंतांबरोबर बोलणी

करण्यात यश लाभले आहे. त्यामुळे सामंत-पवार भेट म्हणजे 'unsurmountable obstacle meeting the irresistible force' असे वर्णन करण्यात येते.

परंतु सामंताबरोबर जमले नाही याचा अर्थ कॉंग्रेस एस, जनता आणि भाजप याच्यातील प्रेमाला बहर आला असेही नाही. जनता आणि भाजप ह्या दोन्ही पक्षांनी ८० ते ९० जागांवर आपला अधिकार सांगितला आहे. दत्ता सामंतानी कामगार भागातील सर्व जागा आपल्या पक्षाला मिळाल्या पाहिजेत असा हट्ट धरला आहे. त्यामुळे गेल्या संपूर्ण आठवड्यातील चर्चे-नंतर विरोधी पक्षांची युती व्हायलाच पाहिजे ह्या एकमेव मुद्द्यावर पुलोदच्या घटक पक्षाचे एकमत झाले आहे.

शिवसेनेशी समझोता केल्याने लोकसभा निवडणुकीत भाजपला मुंबापुरीत जे भरघोस यश मिळाले त्यामुळे ह्या खेपेस सेनेला युतीपासून दूर ठेवण्याकडे पुलोदचा कल आहे. शरद पवारांनी तर जाहीरपणे शिवसेनेशी आपण समझोता करणार नाही असे सांगितले आहे. यामुळे ठाकऱ्यांची आता इकडे देवरा आणि तिकडे पवार अशी स्थिती झाली आहे. मराठी माणसाच्या अस्मितेबद्दल पुलोदने इतके उदासीन राहावे याचे आम्हाला खरोखरच वाईट वाटते.

इकडे आझाद मैदानावरील बी. आर. सी. सी. आय.मध्ये मात्र जल्लोष उसळला आहे लोकसभा निवडणुकीत मुंबापुरीतील सहा पैकी पाच जागा कॉंग्रेस आयने पटकावल्या आणि विधानसभा निवडणुकीत ३४ पैकी २७ जागा जिंकल्या. त्यामुळे कॉंग्रेस आयचे तिकिट मिळाले की, आपला महापालिकेच्या वातानुकुलित सभागृहात प्रवेश झालाच असा मुंबापुरीतील सर्व सोशल वर्करांचा ग्रह झाला आहे. बी. आर. सी. सी. आयच्या कार्यालयापासून रस्त्यापर्यंत रोज गाड्यांची ही रांग लागलेली असते. हजार दीड हजार माणसे सकाळ-संध्याकाळ कार्यालयाला गराडा घालून असतात. (न जाणो मुरली देवरा केव्हा येतील ?) एकशे सत्तर जागासाठी म्हणे एकूण तीन हजार अर्ज आले आहेत. प्रत्येकाने आपल्या बायो-डेटात आपल्या समाजकार्याबद्दल रोमाच-कारी वर्णन केले आहे एका गुजराथी पत्रकाराने तर लोकसभा निवडणुकीत भाजपच्या जयवंतीबेन मेहेताच्या पराभवा-साठी आपणच जास्त परिश्रम घेतले ह्यासाठी आपल्याला तिकिट दिले जावे असे म्हटले आहे. असो.

महापालिकेच्या बरखास्तीपूर्वीची पाच वर्षे पुलोदने महापालिकेवर सत्ता गाजवली. आता ह्यावेळी प्रथमच कॉंग्रेस आयचे महा-पौर सत्तेवर येणार अशी चर्चा असल्याने आयच्या तिकिटाला मागाल तो भाव मिळतो आहे. पुलोदलाही विजयाची तितकीच खात्री आहे. त्यामुळे जागा वाटपाच्या भांडणाला अधिक रंग चढला आहे.

इसापनीतीत एक गोष्ट आहे. सरहद्दी-वरील कुरणात एक गाढव चरत असताना अचानक शत्रूने हल्ला केला. गाढवाचा मालक त्याला म्हणाला, 'चल गड्या, लवकर पळून जाऊयात, नाहीतर शत्रू मारून टाकील.' गाढवाचे उत्तर मार्मिक होते.

'तुमच्या राज्यात ओझी वहायला लागत होती. आता शत्रू जिंकला तरी तेच करावे लागणार आहे. मग इतकी धावपळ कशा-साठी ?'


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०


## ☐ तक्रार कुणाकडे ?

शालिनीताई पाटील ह्यांना वसंतदादानी मंत्रालयासमोरचा बी-४ सरकारी बंगला खाली करायला लावला हे ऐकून आम्हाला भारी वाईट वाटले. ताई आता कुठे जातील ह्या विचाराने आमचे काळीज गलबलून आले परंतु मंत्रालयातील एका जेष्ठ वार्ताहराने माहीम येथील ज्योती सदनमध्ये शालिनी-ताईंचा फ्लॅट आहे अशी माहिती पुरवल्या-मुळे आमचे मन थोडे थाऱ्यावर आले. नरिं-मन पॉइंटवरील निवासस्थान सोडून एकदम माहीमला गेल्यामुळे ताई महाराष्ट्राच्या राज-कारणापासून दोन स्टेशने दूरच गेल्या हे मात्र खरे. असो.

ताईंनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी जीवाचे रान केले. त्याची लोकसेवा न खपल्याने अ. र. अंतुल्यानी त्याची महसूल खात्याच्या मंत्रीपदावरून उचलबांगडी केली होती. पण ताईंनी हार खाल्ली नाही. अखेर अंतुल्यांचे काय झाले हे तुम्हाला ठाऊकच आहे.

यशवंतराव चव्हाणानाही जेव्हा मायदेशी परतण्याचा व्हिसा मिळत नव्हता तेव्हा दादाना इंदिरा कॉंग्रेसमध्ये आणण्याच्या कामगिरीत ताईंचा सिंहाचा वाटा होता.

रामकृष्ण हेगड्याच्या मगरमिठीतून कर्ना-टकची सुटका करण्यासाठी ताई बंगलोरला गेल्या कर्नाटकात महागाई फार नसती तर आज दहाबारा आमदार खरेदी करून ताईंनी गुंडूरावांना सत्तेवर बसवले असते. ताईंच्या चातुर्यकथा ऐकून आम्हाला तर झाशीच्या राणीची आठवण येते. पण याचा अर्थ बाबू-राव भापशांची तुलना आम्ही तात्या टोपेंशी करतो असा ग्रह मात्र कुणी करून घेऊ नये.

ताईंच्या ह्या साऱ्या कर्तृत्वाची दखल न घेता हायकमांडने त्यांना लोकसभा आणि विधानसभेचे तिकिट नाकारले. ताईंनी पूर्व-सूचना न देता पक्षाच्या काही आमदारांची बी-४ वर बैठक बोलावली या क्षुल्लक कारणावरून दादांनी त्यांना बंगला खाली करायला लावला. मंत्रालयातील पत्रकार जीव मुठीत धरून दादांना जाब विचारायला गेले तर दादा म्हणाले 'तुम्ही काय वाट्टेल ते लिहा. मला या विषयावर काहीही बोलायचे नाही. मी त्या बंगल्यात गेले चार महिने पाऊल टाकलेले नाही.' आम्ही हिरमुसले होऊन प्रेसरूममध्ये परत आलो. असो. ताई मात्र ह्या विषयावर पत्रकाराशी बोलायला तयार नाहीत. 'वाऱ्याने, पावसाने झोडपले, हायकमांडने तिकिट नाकारले आणि नवऱ्याने ...' अशा स्वरूपाची एक जुनी म्हण आहे. आता आम्हाला ती नीटशी आठवत नाही. पण 'तक्रार कुणाकडे करायची' अशा स्वरू-पाचा शेवट आहे.

विष्णू-जयदेव

# राजकारणाचे नाजूक रंग

प्रि. खं. कुलकर्णी

'Politics is the gentle art of persnading the poor for their votes and rich for their campaign funds with a promise to protect each from the other'

एक आग्ल सुभाषित

राजकारण हा गरीबाची मने व श्रीमंतांची थैली काबीज करण्यासाठी आश्वासने देण्याची नाजूक कला आहे.

,मुक्त अनुवाद

प्रणय ही नाजूक कला आहे याबद्दल जाणत्यात एकवाक्यता व्हावी. इतरांनी अधिक माहितीसाठी नवीन प्रसिद्ध होत असलेल्या पुस्तकाच्या व औषधाच्या जाहिराती वर्तमानपत्रात वाचाव्यात. वर उधृत केलेले जे आग्ल विधान आहे त्याचा अर्थ असा की राजकारण ही नाजूकतम कला आहे.

राजकारण सर्वस्वाचा त्याग करून अथवा तळहातावर शीर घेऊन करावयाचे असते, या घसमुसळधा कल्पना लोकशाहीत कालबाह्य झाल्या आहेत. ज्याप्रमाणे क्रिकेट या खेळाचे 'रोपटे' इग्लडचे पण त्याचा वटवृक्षाएवढा विस्तार हिंदुस्थानात झाला, त्याचप्रमाणे लोकशाहीचे बीज इंग्लंडमधून आले हे प्रामाणिकपणे मान्य करूनसुद्धा जगातील मोठी लोकशाही होण्याचा मान आपल्या देशाचा. तेव्हा हे साहजिक आहे की वरील आग्ल सूत्रात जो गर्भितार्थ आहे त्याचा विस्तार जगातील मोठी लोकशाही वाढत असताना व्हावा.

मला वाटते की आपल्या मध्यमवर्गाच्या मर्यादित नीतिकल्पनातून आपण राजकारणाविषयी बोलत व तक्रार करीत राहतो. राजकारण हा पैशाचा खेळ आहे. राजकारण भ्रष्ट आहे इ. इ. हे ऐकले की कवी तांबे यांच्या कवितेतील एका ओळीची आठवण येते 'प्रणय रसोदगमि पाप कल्पना' प्रणय आणि राजकारण या दोन्हीकडे पाहण्याची आपली मध्यमवर्गाची दृष्टी संकुचित आहे एवढाच त्याचा अर्थ घ्यावयाचा.

राजकारण ही कला आहे ही गोष्ट निवडणूक जाहीर झाली की लगेच जाणवावयास लागते. कविता मुक्तछदात व निर्यमक असणे हे पुरोगामित्वासाठी आवश्यक ठरले आहे. पण आता सर्व राजकीय घोषणाना यमक जुळविणे अगदी जरुरीचे आहे. लग्नात उखाण्यातून नावे घेण्याची पूर्वीची प्रथा आता कालबाह्य होत आहे. कदाचित ती कवित्व शक्ती राजकीय उखाण्यातून आता प्रकट होत असावी. भिंतीवरील व पत्रकातील अनेक राजकीय उखाणे वाचून, वाङमयाचे हे नवीन दालन निर्माण झाले आहे याबद्दल खात्री पटते. ज्याप्रमाणे 'जात्यावरील ओवी' यालां आता वाङमयीन मान्यता मिळाली आहे त्याप्रमाणे या प्रकारालाही मिळेल यात संशय नाही. या उखाण्याचे सकलन करून एक–दोन पी एच डी. व्हावयासही हरकत नाही. लोकशाहीच्या मातृभूमीत जो विस्तार झाला नाही तो आपल्या देशात झाला ही जागतिक लोकशाहीला आपली वैचारिक देणगीच समजली पाहिजे.

वरील आंग्ल विधानात प्रथम उल्लेख गरीबाच्या अनुनयाचा आहे. याचे कारण उघड आहे कारण जास्त मतदार त्या वर्गातील असतात. प्रणयात काय अथवा राजकारणात काय अनुनय म्हणजे काही आश्वासन देणे आलेच. आधुनिक राजकारणी 'रामराज्य' आणण्याच्या घोषणा करीत असला तरी 'एक वचन पुरे करण्यासाठी राज्य गमावणे व एका पत्नीचा हट्ट पुरा करताना युद्ध ओढवून घेणे' हा रामावतारीत आदर्श त्याला परवडणारा नसतो. त्याच्यापुढे आदर्श असतो श्रीकृष्णाचा. रुक्मिणी आणि सत्यभामा यासारख्या अगदी वेगळ्या वृत्तीच्या आणि शिवाय सोळा हजार याना आश्वासने देत राहणे ही केवढी कठीण कसरत. पण मुरब्बी राजकारणी या अनुनयाच्या कलेत पारंगत असतो. ज्ञानेश्वरांची 'जो जे वाछील तो ते लाभो' ही ओळ लक्षात ठेवून ज्याला जे पाहिजे ते आश्वासन देत असतो.

तेव्हा मतासाठी बहुतांश घोषणा 'गरिबी' या असुराचा वध करण्याच्या असतात. ज्याप्रमाणे लावणीतील प्रणयात 'मोहनमाळेची' ठाम मागणी असते व ते वचन पुरे केल्याशिवाय प्रसंग पुढे सरकत नाही, त्याचप्रमाणे काही वेळेस नुसते आश्वासन पुरत नाही तर कृती अपेक्षित असते, हे अनुभवी राजकारणी विसरत नाही. यापेक्षा दुसरा वर्ग जो असतो तो म्हणजे माझ्यासारखा मध्यमवर्ग, तो स्वतःला गरीब म्हणून घ्यावयास राजी नसतो. प्रणयात ज्याप्रमाणे मोहनमाळ त्याप्रमाणे 'चंद्र, चादणे, चांदरात' ही शाब्दिक नाणी पण चलनी आहेत. त्याचप्रमाणे मध्यमवर्गाला नैतिक मूल्यांवर आधारित घोषणा हव्या असतात. 'देशाला सकटातून कोण वाचवेल' 'भ्रष्टाचार निपटून कोण काढेल' याची उत्तरे पण राजकीय उखाण्यात द्यावी लागतात. वरील वचनातील मते मिळविण्याच्या कलेसबधीचा भाग येथे पूर्ण होतो.

राजकारणी माणसाचे कौशल्य पणाला लागते ते सुभाषिताचा दुसरा भाग अवलंबिताना म्हणजे थैलीसाठी अनुनय करताना. हा थोडाफार विरोधी प्रेमाचा प्रकार छुपा असतो. सामान्य जनाना दिसते ती गरीबांच्या रक्षणासाठी, श्रीमतावर केलेली कडवी टीका;

क्वचित धाडी, पकडापकड इ. त्यामुळे मते देणारी मंडळी एकदम खूष होतात. पण एखादाच हुंकार, इशारा, यात निवडणुकीपूर्वीचा समझोता होत असतो. उघड आश्वासने द्यायची–घ्यावयाची नसतात. हे उभयपक्षांना माहीत असते.

याची भरपाई होते बजेटनंतर. साधारणपणे मते देणारा वर्ग बजेटपर्यंत आश्वासने वगैरे विसरून गेलेला असतो. या खेपेला निवडणुका आणि बजेट फार जवळ जवळ आले तेव्हा मनात तुलना झाली एवढेच. खरे म्हटले म्हणजे माझ्यासारख्या मध्यमवर्गी माणसाच्या जीवनात बजेटमुळे उलथापालथ होणार नसते. पण वर्तमानपत्रे वाचून एक हवा बनते व प्रत्येकजण 'बजेटमध्ये काय' असा दुसऱ्याला प्रश्न विचारतो व स्वतःचे मत ठोकतो. माझ्यासारख्याची दृष्टी पोहोचते ती इन्कमटॅक्सची स्लॅब किती वर गेली व किती शेकडा रुपये वाचले, एवढीच. अनेक वर्षांचा अनुभव सांगत असतो की, महागाई वाढेलच व वर्तमानपत्रात छापलेली वाचलेल्या कराची रक्कम खरोखरीच शिल्लक राहणार नाही. आंग्ल वचनातील जो दुसरा रोखठोक वर्ग आहे त्याचे खरे लक्ष बजेटकडे असते.

या निवडणुकीत देशातील बिकट परिस्थितीचा उहापोह पुष्कळच झाला होता व निवडणुकीनंतर बजेट लगेच आले. त्यामुळे बजेटामुळे काय चमत्कार घडणार त्याविषयी जास्त कुतुहल होते. कशावरील अॅड व्हेलोरियम एक्सपोर्ट ड्युटी गेली व कशावरील जास्त झाली हा मध्यमवर्गीयाला न कळणारा भाग सोडून इन्कमटॅक्स या नोकरपेशाच्या मर्यादित सदराला आलो.

प्रामाणिकपणे बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की कापड घ्यायला गेल्यानंतर रु. १०० ऐवजी १५० रुपयांचा पॅंटपीस घेतला अथवा २०० चे ऐवजी ३०० ची साडी घेतली तर मन जरा सुखावतेच, पण पोस्टकार्ड १० ऐवजी १५ पैशाचे झाले म्हणजे ते ५ पैसे देणे सुद्धा कष्टप्रद वाटते. तेव्हा सरकारला कर देणे हा किती दुःख देणारा व्यवहार आहे ते सर्वांना पटावे.


आपण आता बजेटसंबंधी बोलत आहोत तेव्हा अजिबात हिशोब न मांडता कसे चालेल. तेव्हा मी खालील कोष्टक मांडतो.

| वार्षिक उत्पन्न रु. | करामुळे मानसिक अवस्था | बजेटनंतर रु. वाचले |
|---|---|---|
| ०–१५००० | कर नाही, सर्वात सुखी | – |
| १५०००–१८००० | थोडा कर थोडा दुःखी | ३००–५०० |
| ५,००,००० | फार कर अतिशय दुःखी | ५७,००० |

राष्ट्राची आर्थिक परिस्थिती कठीण आहे हे माहीत असूनसुद्धा माझे ३००–४०० रु. वाचले याबद्दल मनातून आनंदच झाला होता; पण कोष्टकाचा शेवटचा भाग पाहून माझ्या मध्यमवर्गी मनात सामाजिक न्यायाची बोच उगीचच वाढली. पण आपलेच चुकत असले पाहिजे ! कारण फार मोठा कर भरणाऱ्याचे दुःख केवढे याचे ज्ञान मला कोठे आहे ? आणि सरकारने अशा अतिशय दुःखी माणसाचे अश्रू पुसण्यासाठी धावून जावे यातही काही न्याय असलाच पाहिजेच. त्या शिवाय का श्री. नानी पालखीवाले* यांच्यासारखे नामवंत तज्ज्ञ 'बजेटने न्याय दिला' अशी उगीचच वाखाणणी करतील.

पुनः आपण मूळ विचाराकडे वळू. ज्या धोरणी लोकांना आंग्ल सुभाषितात म्हटल्याप्रमाणे राजकारणाची ही नाजूक अंगे उपांगे समजली ते राज्य करतील. ज्यांना ही उमजणार नाहीत ते 'राष्ट्राची चिंता' वाहण्यास रिकामे राहतील. □

* 'EPOCH MAKING FISCAL POLICIES' by Nani Palkhivala. टाइम्स ऑफ इंडिया दि. २३ मार्च ८५


वि. ग. कानिटकर
किंमत : १४० रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

## बेनसन अँड हेजेस । रॉथमन्स कप स्पर्धा

# कधीही न पाहिलेली बक्षिसाची रक्कम पणाला लागली तेव्हा कधीही न पाहिलेलं टीम–स्पिरिटसुद्धा निर्माण झालं

फायनलला पोहोचेपर्यंत इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि पाकिस्तानलासुद्धा अक्षरशः खडे चारणाऱ्या भारतीय संघाने चांगलीच हवा निर्माण केली होती. क्लाइव्ह लॉईडच्या वेस्ट इंडियन संघाबद्दल बोलावं तसं ऑस्ट्रेलियन समीक्षक भारतीय संघाबद्दल बोलत होते. केवळ पंधरा दिवसांपूर्वीच याच भारतीय संघाबद्दल 'Let's hang our heads in shame' अशा प्रकारचं लिखाण इंग्रजी पत्रकारानी केलं होतं. त्याच भारतीय संघाबद्दल रिची बेनॉ, इयान चॅपेल वगैरे खडुसपणाच्या बाबतीत ब्रिटिशांचे बाप शोभावेत असे ऑस्ट्रेलियन समीक्षक This side can make no mistakes वगैरे लिहू लागले. हा चमत्कार कसला ?

## एका झंझावाती यशाचं रसग्रहण

विश्वनाथ

रविवारचा दिवस, दहा मार्च. सकाळी साडेनऊची वेळ. या देशातले सगळे रस्ते सुनसान झाले होते. एरवी रविवारच्या दिवशी गर्दीने गजबजणारी दुकानंसुद्धा ओस पडली होती. एखाद्या परक्या माणसाला राष्ट्रीय सुतक वगैरे आहे की काय असा भास व्हावा इतकी शांतता. घराघरातून लोक टी. व्ही. लावून बसलेले. त्यांच्या दृष्टीने राष्ट्रीय सुतक जरी नाही तरी राष्ट्रीय कसोटीचाच क्षण होता. भारत आणि पाकिस्तानची बेनसन अँड हेजेस कपासाठी फायनल मॅच होती. दोन देशातला अंतिम सामना ऑस्ट्रेलियात मेलबोर्नला खेळला जाणार होता आणि भारत–पाकिस्तानमधील कोट्यवधी लोक अक्षरशः डोळ्याचे प्राण करून टी. व्ही. समोर बसले होते.

दोन देशातील क्रिकेटचा सामना म्हणजे लोकांच्या दृष्टीने जीवनमरणाचा प्रश्न असतो. क्रिकेटच्या मॅचमधला विजय म्हणजे पाकिस्तानच्या दृष्टीने बागला देशच्या युद्धाचा सूड असतो तर मॅचमधली हार म्हणजे इस्लामी सत्तेपुढे निधर्मी भारताची शरणागती अशी भारतीयांची भावना असते. हर हर महादेव आणि अल्ला हो अकबरच्या घोषणा नसतात एवढी बाब सोडली तर ते एक धर्मयुद्धच असतं. म्हणूनच भारत मॅच जिंको किंवा हरो भारतात कुठेतरी फटाके वाजतातच. एरवीच्या क्रिकेट मॅचची ही स्थिती, मग ज्या मॅचच्या फैसल्यावर विश्वविजेतेपद ठरणार आहे अशा मॅचच्यावेळी जबरदस्त उत्कंठा आणि टेन्शन असल्यास नवल काय ?

फायनलला पोहोचेपर्यंत इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि पाकिस्तानलासुद्धा अक्षरशः खडे चारणाऱ्या भारतीय संघाने चांगलीच हवा निर्माण केली होती. क्लाइव्ह लॉईडच्या वेस्ट इंडियन संघाबद्दल बोलावं तसं समीक्षक मंडळी भारतीय संघाबद्दल बोलत होती. केवळ पंधराच दिवसांपूर्वीची वर्तमानपत्रं वाचली असती, तर याच भारतीय संघाबद्दल 'Let's hang our heads in shame', 'They really deserved it (defeat)' अशा प्रकारचं लिखाण इंग्रजी पत्रकार मंडळींनी केलं होतं. त्याच भारतीय संघाबद्दल रिची बेनॉ, इयान चॅपेल वगैरे खडूसपणाच्या बाबतीत ब्रिटिशांचे बाप शोभावेत असे ऑस्ट्रेलियन समीक्षक This side can make no mistakes वगैरे लिहू लागले. हा चमत्कार कसला ? डेव्हिड गावरच्या दुय्यम दर्जाच्या संघाकडून ४–१, किम ह्यूजच्या संघाकडून ३–०, लॉईडच्या संघाकडून ५–० आणि पाकिस्तानकडून २–१ असा मार खाण्याचा पराक्रम आधीच्या वर्षात गाजवणारा भारतीय संघ एका महिन्याच्या आत इतका बलवान कसा बनला ? भारतीय भूमीवर ज्याची अगदी ससेहोलपट झाली होती तोच भारतीय संघ ऑस्ट्रेलियन भूमीवर शेर कसा काय झाला. याची कारणं शोधायची झाली तर गेल्या दोन–चार महिन्यातल्या घडामोडी तपासल्या पाहिजेत.

डेव्हिड गावरच्या मुकाबल्यात उभा राहिलेला भारतीय संघ दुहीने पूर्णपणे पोखरला होता. कपिल–सुनील वादाची लक्तरं जागोजाग लोंबत होती. 'रन्स अँड रुइन्स 'सारखं आपल्या सहकाऱ्यांवर गलिच्छ टीका करणारं पुस्तक प्रसिद्ध करून गावसकरनी आपल्या मनातील मळमळीचं ओंगळ प्रदर्शन घडवल तर दिल्लीच्या पत्रकारांकडून गावसकरवर

खोटंनाटं छापवून आणून कपिलने त्याचा सूड उगवला. याचा परिणाम दोघांच्याही खेळावर झाला. पाच कसोटीतून जेमतेम दीडशे धावा गावसकरने जमवल्या, तर कसोटीत अडीचशेच्यावर बळी मिळवणाऱ्या कपिलला संपूर्ण मालिकेत पाच बळी काही मिळवता आले नाहीत. फलकावर शतक लागल्याशिवाय त्यांची आघाडीची जोडी काही फुटली नाही आणि आमच्या आघाडीच्या फलदाजाना अर्धशतकी भागीसुद्धा दुर्मिळ झाली. आपल्या व्यक्तिगत भाडणापायी देशाच्या क्रिकेटचा बळी देणाऱ्या क्रिकेटपटूंची छी थू झाली.

### धक्कादायक पण योग्य !

कपिलचा परफॉर्मन्ससुद्धा इतका वाईट होता. की त्याच्या कट्टर पाठीराख्यांनासुद्धा गुडघ्याच्या दुखण्यानतर पूर्वीचा कपिल राहिला नाही अशी कबुली द्यावी लागली आणि गावसकरची बॅटिंग आणि कॅप्टनसीबद्दल मुबईच्या पत्रकारांचीसुद्धा चार शब्द बरे बोलण्याची हिंमत नव्हती. अशा परिस्थितीत बेनसन अँड हेजेससाठी कॅप्टन निवडायची वेळ आली तेव्हा या देशातल्या सर्वसामान्य माणसांचीसुद्धा अगदी प्रामाणिक प्रतिक्रिया होती की गावसकर, कपिल दोघेही नकोत, शास्त्री किंवा मोहिंदरला कॅप्टन करा. अशा परिस्थितीत निवड समितीच कौतुक केलं पाहिजे की त्यानी निर्णय घेतला गावसकरच कर्णधार राहील आणि कपिल उपकर्णधार. या दोघा असामान्य खेळाडूना त्यांच्यावरच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याचा यापेक्षा चांगला मार्ग नव्हता.जाणीव करून देण्यासाठी संघातून काढून टाकण्याचा एक डाव निवड समिती खेळली होती. पण त्यातून सघाची हानीच जास्त झाली होती.

निवडसमितीने या वेळेस आश्चर्याचे म्हणून जे जे धक्के दिले ते ते नतर अतिशय दूरदर्शीपणाचे ठरले. दुसरा निर्णय मदनलाल बिन्नीला सघात परत बोलवण्याचा. दोघांची सुमार मध्यमगती एक दिवसाच्या सामन्यात अतिशय उपयुक्त ठरते हा प्रुडेन्शियल कपचा अनुभव होताच. पण या शिवाय दोघांचं क्षेत्ररक्षण अत्यंत श्रेष्ठ दर्जाचं होतं. असाच एक वेगळा निर्णय म्हणजे दीड वर्षापूर्वीच प्रुडेन्शियलमध्ये सर्वोत्कृष्ठ यष्टिरक्षक म्हणून गौरवल्या गेलेल्या किरमाणीला वगळण्याचा. वन डे साठी अनुभवी किरमाणीपेक्षा तरुण, चपळ, उत्साही सदानद विश्वनाथला सधी देण्याचा निर्णय फार महत्त्वाचा ठरला.

यष्टिरक्षकाचं कौशल्य त्यानी किती बळी घेतले यापेक्षा किती कमी संधी वाया घालवल्या याच्यावर असतं. या बाबतीत सदानदच रेकॉर्ड किरमाणीपेक्षा सरस होतं. असाच अजून एक धक्कादायक निर्णय म्हणजे शिवरामकृष्णनला सधी देण्याचा. लेगस्पिनरला वन डे मध्ये खेळवण्याचा वेडेपणा या पूर्वी कोणीही केला नव्हता. त्यातून पुन्हा हा लेगस्पिनर चंद्रा किंवा कादिरसारखा नव्हता ज्याच्या नावाचा कुणी धसका घेतला होता. उलट हा अवघ्या अठरा वर्षाचा अननुभवी पोरगा होता. ज्याला चेंडू वळवण्यासाठी उंची देखील जास्त द्यावी लागत होती. पण मेलबोर्नच्या जगातील सर्वात मोठ्या मैदानावर लेगस्पिनरलासुद्धा षटकार मारणं सोपं नाही आणि त्या नादात कॅच उडण्याचीच शक्यता जास्त हे हेरून शिवाची निवड झाली, आणि त्याने सर्वाधिक बळी घेतले. पण या झाल्या नंतरच्या गोष्टी. हा संघ ऑस्ट्रेलियात पोचला तेव्हा महत्त्वाकांक्षा बाळगली होती फक्त उपांत्य फेरीत पोचण्याची कारण त्यासाठी त्याना ३–०, ४–१, २–१ असं लोळवणाऱ्या सघांशी सामना करायचा होता. पण पाकिस्तानशी पहिला सामना झाला आणि आश्चर्य घडलं. जगात सर्वात कमकुवत समजल्या जाणाऱ्या गोलंदाजांच्या माऱ्यापुढे फलदाजीत अत्यंत बलाढ्य समजला जाणारा पाकिस्तानी सघ पुरा पन्नास षटकं देखील टिकाव धरू शकला नाही. मिडिऑकर बिन्नी कर्दनकाळ ठरला, शिवाने दोन मोहरे टिपले आणि विशेष म्हणजे भारतीय संघाचं क्षेत्ररक्षण दृष्ट लागण्यासारख झालं. नतर भारतास सामना जिंकण्यासाठी फक्त १८६ धावा करायच्या होत्या. पण इम्रानने पहिल्या पाच षटकात तीन बळी घेऊन सनसनाटी निर्माण केली पण नतर गावसकरला फार वर्षानी सूर गवसला आणि अझरने आपली कानपूरचीच खेळी पुढे चालू ठेवली. गावसकरने ५६ आणि अझरने ९३ धावा केल्या आणि भारताची सुरुवात विजयी झाली. तेव्हा संघातील सर्वांनाच नवी जाणीव झाली.

शिवाला वाटलं, अरे आपले गुगली याना खरंच कळत नाहीत.

कपिलला वाटलं थोडा बाउन्स असलेली विकेट असेल तर आपण अजूनसुद्धा घड्याळाचे काटे दोन वर्षं मागे नेऊ शकतो.

बिन्नीला वाटलं अरे वर्ल्ड कपमधली बोलिंग नक्कीच फ्लुक नव्हती.

अझरला वाटल आपण भारताबाहेरसुद्धा फास्ट विकेटवर इम्रानसारख्याला भिरकावून देऊ शकतो.

सदानंद विश्वनाथला वाटलं किरमाणीने सुद्धा आज माझ्यापेक्षा चांगली विकेटकिपिंग केली नसती,

गावसकरला वाटलं ठीक आहे. प्रयत्न केले तर हा संघसुद्धा कप जिंकू शकेल.

**बाकी सगळ्यांनाच वाटलं आजच्यासारखी जीव तोडून फिल्डिंग केली तर बाकीच्या मॅचेससुद्धा जिंकता येतील. ३२ हजार डॉलर्स म्हणजे काही लहान रक्कम नाही. याशिवाय भारतात गेल्यावर बक्षिसांची खैरात होईल ती वेगळीच.**

कोणतीही स्पर्धा जिंकण्यासाठी लागतो तो आत्मविश्वास पाकिस्तानविरुद्धच्या विजयाने दिला.

### आणि मॅच फिरली !

त्यानंतरचा सामना इग्लंडशी होता. त्यानी नुकतेच आपल्याला सपशेल हरवलं होतं. कपिल–बिन्नीची मध्यमगतीच काय पण रवी–शिवाच्या फिरकीचीसुद्धा भारतात पिसं काढली होती. त्याच्या वन डे मधल्या अनुभवाचे आणि प्रोफेशनॅलिझमचे इतके गोडवे गायले होते की सगळ्या भारतीयाना वाटत होतं की बस बाकी काही नको आधी आपली बॅटिंग नको नाहीतर आपण अडीचशे धावा जरी केल्या तरी एक–एक, दोन–दोन करीत ते कधी आपली धावसंख्या पार करतील पत्ताही लागणार नाही. नुकत्याच भारतात झालेल्या सामन्यात त्यानी हे करूनसुद्धा दाखवलं होतं.

पण सुनील टॉस हरला आणि भारतावर प्रथम फलंदाजीची पाळी आली. मधली फळी घसरली आणि ५० षटकं टिकून राहण्यासाठी सुनीलला सदानंद विश्वनाथला मद-

तीला घ्यावं लागलं. ९ बाद २३५ धावा तशा फार नव्हत्या आणि ३२ षटकात जेव्हा इंग्लंडने ३ बाद सव्वाशेची मजल गाठली तेव्हा त्या फारच कमी वाटू लागल्या. पण फॉर्मात असलेल्या लॅम्बला शिवाच्या गुगलीने सपशेल बनवल आणि तिथेच मॅच फिरली. शिवा–शास्त्रीच्या फिरकीने मधली फळी गुंडाळली आणि मग कपिल–मदन–बिन्नीने शेपूट कापून काढलं. इंग्लडचा संघ पुरी पन्नास षटकसुद्धा टिकू शकला नाही. पाकिस्तान प्रमाणेच इग्लंडचासुद्धा पंचेचाळीस षटकात खुर्दा. यष्ठीमागे पाच बळी घेणाऱ्या सदानंद विश्वनाथचा तर प्रतिस्पर्ध्यांनी धसकाच घेतला.

त्यानंतरचा सामना होता ऑस्ट्रेलियाशी. ऑस्ट्रेलियन्स आधी दोन महिने वन डे मॅचेस खेळत होते. त्यातून त्यांच्या होम ग्राउंडवर आणि होम क्राऊडसमोर. मेलबोर्नची विकेट फास्ट होती. लॉसन, हॉग, मॅगडरमॉटसारखे तगडे तेज गोलंदाज ऑस्ट्रेलियन संघात. खरा कस आता लागणार होता. पण भारतीय सघ इतका भरात होता की त्याचा कस असा लागलाच नाही. विश्वविजेत्याच्या रूबाबात हा महत्त्वाचा सामनासुद्धा त्यानी खिशात टाकला. कपिल–बिन्नीने सुरुवातीलाच भसाभस दाडघा उडवून ३ बाद १७ अशी अवस्था ऑस्ट्रेलियाची केली. त्या धक्क्यातून ते कधी सावरलेच नाहीत. पुन्हा एकदा पन्नास षटकांच्या आत प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा उडवून भारतीय गोलंदाजानी अफलातून कामगिरी बजावली. भारताचे क्षेत्ररक्षण तर अत्युच्च दर्जाचं होतं. चेंडूचा पाठलाग, चेंडू उचलणं, त्याच ॲक्शनमध्ये थेट विकेटकीपरच्या ग्लोव्हज्‌मध्ये थ्रो. सर्वच हालचाली एखाद्या विजेच्या चपळाईने होत होत्या.

नंतर ऑस्ट्रेलियाच्या दीडशे धावा केवळ दोन गडघांच्या मोबदल्यात भारताने आरामात पार केल्या. श्रीकांत–शास्त्रीने पुन्हा एकदा प्रतिस्पर्ध्याच्या गोलंदाजीतील हवा काढून घेत शतकी सलामी दिली आणि भारताला उपांत्य फेरीत नेऊन सोडलं.

आतापर्यंतच्या तीन सामन्यात भारताचं वर्चस्व इतकं निर्विवाद होतं की उपांत्य फेरीत न्यूझीलंडला हरवून वेस्टइंडीजला आव्हान देण्याची धमक फक्त भारतीय सघात आहे याबाबत सर्वांचं एकमत झालं होतं.

तरीसुद्धा एक वेळ अशी आली होती की भारत सामना हरतो का काय अशी भीती निर्माण झाली. न्यूझीलंडच्या २०६ धावाच्या मुकाबल्यात भारताच्या ३ बाद १०२ धावा झाल्या होत्या आणि पुरी ३२ षटकं उलटली होती. उरलेल्या अठरा षटकात १०४ धावा म्हणजे षटकामागे सुमारे सहा धावा करायच्या होत्या. सबंध स्पर्धेमध्ये भारताला असं आव्हान कधीच मिळालं नव्हतं आणि त्याच वेळेला न्यूझीलंडचे गोलंदाज पूर्ण भरात होते. क्षेत्ररक्षण टाइट होत. एक–एक धाव काढणं मुष्किल, असं फलंदाजाना खिळवून ठेवलं होत. यातून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात शास्त्री आणि अझरनी ठोकाठोकी करायला सुरुवात केली आणि ते दोघही बाद झाले. अशावेळेला गावसकरनी कपिलला वेंगसरकरच्या जोडीला पाठवलं आणि जादूची कांडी फिरल्यासारखं सारं चित्रच बदललं. इतकावेळ अनप्लेअेबल वाटणाऱ्या हेडलीच्या एकाच षटकात सतरा धावा निघाल्या. कपिलच्या बॅटच्या पट्ट्यात सापडणारा चेंडू सुसाट वेगाने सीमापार जात होता. कपिल आला आणि फलंदाजी अगदी सोपी वाटू लागली.

दुसऱ्या बाजूने वेंगसरकरलाही आत्मविश्वास आला आणि षटकामागे नऊ धावांचा पाऊस पाडीत पाच-सहा षटकं राखून भारताने सामना जिंकला.

पण दुसऱ्या उपांत्य सामन्यात मात्र अघटित घडले. खऱ्या अर्थाने जगज्जेता असलेला वेस्ट इडीजचा संघ पाकिस्तानविरुद्ध चक्क चारी मुडधा चीत झाला. वन डे मॅचमधल्या अनिश्चिततेची पुन्हा एकदा सर्वांना जाणीव झाली. वेस्ट इंडीजशी फायनल होणार त्यात कोणालाच शंका नव्हती आणि अचानक पाकिस्तान उसळी मारून वर आले. तसं पाहिलं तर वेस्ट इडिजपेक्षा पाकिस्तानचा संघ फायनलमध्ये नक्कीच परवडला असता; पण तरीसुद्धा भारतीयांना फायनलला वेस्टइंडीज याव असं वाटत होतं. कारण अर्थातच वेस्टइडिजपेक्षा पाकिस्तानकडून झालेला पराभव फार झोंबतो हेच होतं. सामन्यापूर्वीच जावेद मियांदादनी जाहीर केलं– भारताविरुद्धचा सामना पाकिस्तान नक्की जिकणार. साखळी स्पर्धेत पाकिस्तान हरले कारण तो सामना म्हणे त्यानी फार गंभीरपणे घेतला नाही. सुनील बाद असताना म्हणे त्याला बाद दिला गेला नाही आणि याच षटकानंतर इम्रानची पाठ दुखायला लागली. सबबीची यादी इतकी वाढायला लागली तेव्हाच वाटलं होतं की या गप्पात काही दम नाही. गावसकरने मात्र काहीच प्रतिक्रिया दिली नाही. 'आम्ही चागला खेळ करू.' बस.

## निर्विवाद श्रेष्ठत्व

आधीचे चार सामने आपल्या झझावाती खेळानी जिंकून भारत फायनलला आला होता. फलंदाजी, गोलदाजी, क्षेत्ररक्षण, यष्टिरक्षण साऱ्याच क्षेत्रात आपल्या असामान्य खेळाच दर्शन घडवून लोकाच्या अपेक्षा या भारतीय संघानी फारच वाढवून ठेवल्या होत्या. सुनीलच्या कॅप्टनसीचं तर सगळ्याच जाणकारानी एकमुखाने कौतुक केलं होतं. शिवा आणि रवीच्या फिरकीने तर रिची बेनोलासुद्धा वेड लावलं होतं. बिन्नी कपिलच्या अचूक गोलंदाजीचा भल्या भल्या फलदाजांनी धसका घेतला होता. शास्त्री श्रीकांत आणि अझरच्या फलदाजीने आपले श्रेष्ठत्व निर्विवादपणे सिद्ध केलं होतं आणि या साऱ्यावर कळस चढवणारं भारतीयाचं टीमस्पिरिट आणि क्षेत्ररक्षण होतं. संपूर्ण स्पर्धेवर भारताची इतकी छाप पडली होती की, अंतिम सामना जरी कदाचित भारत हरला असता तरी फारसं बिघडलं नसतं; पण अंतिम सामना वेस्ट इडीजशी नव्हता. पाकिस्तानशी होता. जर हा सामना हरलो असतो तर सारे क्रिकेट शौकीन अक्षरशः शोकसागराच्या गर्तेत बुडाले असते. म्हणूनच आदल्या दिवशी सर्वांनीच देवाची प्रार्थना केली की काहीही होऊन भारत हा सामना जिंकू दे.

भारतीय वेळेप्रमाणे सकाळी पावणेदहाला सामना सुरू झाला आणि पहिला सुखद धक्का मिळाला. पहिली बॅटिंग पाकिस्तानची होती, त्यांची सलामीची जोडी मैदानात उतरली होती आणि कपिल गोलंदाजी करत होता. कपिलच्या पहिल्या षटकात तीन धावा निघाल्या आणि दुसऱ्या बाजूने चक्क चेतन शर्मा. आजारी असल्यामुळे बिन्नी खेळत नव्हता. आधीच्या चारही सामन्यात भारताने एकच संघ खेळवला होता. सबंध स्पर्धेत जास्तीत जास्त विकेटस् घेणारा बिन्नीच

होता. त्याची अनुपस्थिती हा भारतातला मोठाच धक्का होता. चेतन शर्माच्या दोन–तीन ओव्हर्स जरी फोडून काढल्या असत्या तरी एक दिवसाच्या सामन्याचा निकाल फिरवायला तेवढं पुरे होत; पण चेतननेसुद्धा उत्कृष्ट गोलदाजी केली. सर्व संघच जिद्दीने इतका पेटून उठला होता की, त्याला वाईट गोलंदाजी करणंच शक्य नव्हतं.

कपिलच्या चौथ्या षटकात पहिला हादरा पाकिस्तानला बसला. मोहसीनचा झेल अझरने पकडला. त्यानंतर उजव्या यष्टी-बाहेरच्या चेंडूचा पाठलाग करताना मुदस्सर फसला आणि सदानंद विश्वनाथने चूक केली नाही. पुढच्याच चेंडूवर कासिम उमरचा कपिलने त्रिफळा उडवला. तीन बाद एकतीस. भारतीय गोटात जल्लोष उडाला. नंतर वेस्ट इंडीजविरुद्ध पाकिस्तानला विजय मिळवून देणारा रमीस राजा आला पण त्यानी स्क्वेअर लेगला मारलेला फटका श्रीकांतने हवेतच उचलला आणि विजयाची स्वप्नं भारतीयाना दिसू लागली.

नंतर इम्रान आणि जावेदची जोडी जमायची चिन्हं दिसू लागली तोच गावसकरच्या फेकीने इम्रान धावबाद झाला. ५ बाद १०२. इम्रान गेला आणि मग गावसकरने धूर्तपणे शिवाला गोलदाजी दिली. त्याच्या हातभर भसाभसा वळणाऱ्या चेंडूनी जावेद, सलीम मलिक मडळींना चक्क मामा बनवल आणि शेवटची जोडी खेळायला आली तेव्हा फक्त १४४ धावा झाल्या होत्या. त्यांनी पचवीस–तीस धावा केल्या आणि संबंध स्पर्धेत प्रथमच प्रतिस्पर्धी संघ भारताविरुद्ध पूर्ण पन्नास षटके खेळू शकला.

जिंकण्यासाठी पावणेदोनशे धावा भारताला करायच्या होत्या. पुरी पन्नास षटकं होती. घाई कसलीच नव्हती. फक्त हाराकिरी करायची नाही. चूक करायची नाही, एवढंच पथ्य पाळायचं होत. धोका फक्त इम्रानचाच होता; पण त्याला वाझोटा ठरवण्याचं काम शास्त्री-श्रीकांतने छान पार पाडल. त्याची पहिली सात षटकं त्यांनी नुसती खेळून काढली. पण विकेट टाकली नाही. पहिल्या वीस षटकात फक्त चाळीस धावा निघाल्या. तरी काळजी नव्हती. कारण सर्व विकेटस् हातात होत्या आणि वेळ पडल्यास जगातल्या कोणत्याही गोलंदाजीच्या चिंधड्या उडवण्याची धमक असलेले श्रीकांत-कपिल शिल्लक होते. इम्रान निघाला आणि श्रीकातने तुफानी हल्ला चढवला. चक्क दोन षटकार ठोकले आणि हा हा म्हणता स्वत.च्या पन्नास आणि सघाच्या शभर धावा फळ्यावर लागल्या. एव्हाना विजयाचे वारे भारतीय कॅंपमध्ये वाहू लागले होते. पाकिस्तानच्या खेळाडूंच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसू लागली. थ्रो चुकू लागले, चेंडू सुटू लागले. शेवटचा प्रयत्न म्हणून जावेदनी अखेरच्या तीन षटकांसाठी इम्रानला आणले. त्याने २ विकेटसूही घेतल्या पण वेळ टळून गेली होती.

## आक्रमकता आली कुठून ?

वेंगसरकरने एकेरी धाव घेतली आणि सर्व मैदानात एकच जल्लोष उसळला. भारतीय कॅंपमध्ये शॅंपेनचे फवारे उसळले. आनदाने बेभान झालेले भारतीय खेळाडू मैदानावर आले.

मेलबोर्नच्या स्टेडियममधील ३५ हजार प्रेक्षकानी प्रचड उत्साहानी त्यांच स्वागत केलं. भारतीय सघाच्या वतीने सुनीलने बेनसन अँड हेजेस चषक स्वीकारला तो क्षण सर्वंच भारतीयाच्या अंगावर शहारा उठवून गेला.

'मॅन ऑफ द मॅच' ॲवॉर्ड श्रीकातला मिळालं. नंतर चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स म्हणून स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडूची निवड जाहीर होणार होती. त्यासाठी ४० हजार डॉलर्स किंमतीची दिमाखदार ऑडी मिळणार होती. स्पर्धेत १८२ धावा तीन अर्धशतकांच्या सहाय्याने काढणाऱ्या आणि ८ बळी घेऊन आपलं अष्टपैलुत्व सिद्ध करणाऱ्या रवी शास्त्रीची अपेक्षेप्रमाणे सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली. गाडीच्या किल्ल्या रवीच्या स्वाधीन करण्यात आल्या. आणि नंतर सर्व चौदा खेळाडूनी खच्चून भरलेल्या ऑडीतून भारतीय सघानी विश्वविजेत्यांच्या थाटात अभिमानाने जिंकलेला चषक उचावत मैदानाला चक्कर मारली. मोठमोठे फलक हातात उंचावून प्रेक्षकांनी भारतीयांचं कौतुक केलं.

ऑस्ट्रेलिअन समीक्षक तर भारतीयांच्या अनपेक्षित खेळाने फारच भारावून गेले होते. हा खऱ्या अर्थाने सांघिक विजय होता. तसे थोर खेळाडू प्रत्येक संघाकडे होते. सर्वोत्कृष्ट फलंदाजीचं बक्षीस मिळवणारे लॅम्ब - गावर सारखे फलदाज इंग्लंडकडे होते. वेस्टइंडीजकडे रिचर्डस्, गार्नर, मार्शलसारखे अष्टपैलू होते. न्यूझीलंडकडे हॅडली होता तर ऑस्ट्रेलियाकडे बोर्डर-लॉसनसारखे नावाजलेले खेळाडू होते. तर पाकिस्तानकडे जावेदसारखा जिगरी फलदाज आणि इम्रानसारखा झंझावाती गोलदाज होता. पण संघ म्हणून हे कधीच उभे राहिले नाहीत. तो चमत्कार फक्त भारतीयच दाखवू शकले.

सर्व सामन्यात प्रतिस्पर्ध्यांना पन्नास षटकात उखडण्याची कामगिरी भारतीयांनी केली. त्यात कपिल–बिन्नीने ९ । ९, शास्त्रीने ८ तर शिवाने १० बळी घेतले. मदनने सात बळी घेत आपला वाटा उचलला. गोलदाजांच्या या कामगिरीवर आघाडीच्या फलंदाजांनी कधीच पाणी फिरवलं नाही. पाच पैकी तीन वेळा शतकी भागी करून त्यानी विजय आवाक्यात आणला. जेव्हा एकदाच आघाडीची फळी कोलमडली तेव्हा मधल्या फळीत अझर आणि गावसकरने डाव सावरला. जे काम संथगती गावसकर–मोहिंदरला जमणार नव्हते तेव्हा धावांचा पाऊस पाडण्यास कपिल-वेंगसरकर सरसावले. पण प्रत्येक वेळेस प्रसंगास साजेसा खेळ भारतीयांनी केला. एखाद्या यंत्राप्रमाणेच चूक अशी त्यानी कधी केलीच नाही.

पण या संघाचं नीतिधैर्य इतकं उंचावलं तरी कसं ?

डेनिस लिली तर म्हणाला, 'मी प्रथमच भारतीयांना इतकं आक्रमक खेळताना पाहतोय. नेहमी त्यांचा खेळ आणि वर्तणूकसुद्धा इतकी apologetic असायची, की हेच ते भारतीय असं खरं वाटत नाही.' मुळात भारतीय रक्तातच अभावानी आढळणारं किलिंग इन्स्टिंक्ट या संघात दिसून आलं. मदनलालच्या मध्यमगती माऱ्यावर इम्रान पुढे जाऊन मारण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हा सदानंद विश्वनाथ चक्क स्टंपजवळ जाऊन उभा राहिला. नतर पुढे जाण्याची हिंमत इम्रानने दाखवली नाही. जावेदनी ती दाखवली तेव्हा त्याला परत मागे फिरण्याची गरजच उरली नाही. विश्वनाथने बेल्स केव्हाच उडवल्या होत्या. ही आक्रमकता ते दाखवू शकले कारण त्यांच्या गुणांवर संघ-

नायकाने टाकलेला पूर्ण विश्वास. वन डे मॅचेस जिथे लेगस्पिनरला अजिबात स्थान नाही अशी सगळ्या जगाची धारणा होती तिथे सर्वात जास्त बळी शिवासारख्या लेग-स्पिनरने घेतले. कारण फायनल मॅचमध्ये सर्वात शेवटचं षटक–जे नेहमी मार्शल-इम्रान सारख्यांची मक्तेदारी असते ते सुनीलने शिवाला टाकण्यास दिले.

## प्राइझ मनीच निर्णायक

हा विश्वास तरी सुनील का टाकू शकला कारण भारताबाहेर खेळत असल्यामुळे प्रेक्षकांचा आणि पत्रकारांचा ससेमिरा त्याच्या मागे नव्हता. त्याने मालिकेआधीच जाहीर केल्याप्रमाणे ही संघनायक म्हणून त्याची शेवटची स्पर्धा होती. आणि कर्णधार म्हणून आधीचा परर्फामॅन्स इतका वाईट होता की गमावण्यासारखं त्याला काहीच नव्हतं. म्हणून तो आणि बाकीचे खेळाडू कोणतेही दडपण न ठेवता खेळले आणि सुरुवातीचे १।२ सामने जिंकल्यावर त्यांना प्रुडेन्शिअलची स्वप्नं पडू लागली.

स्पर्धेसाठी असणारी बक्षिसाची प्रचंड रक्कम हे फार मोठं आकर्षण होतं. स्पर्धा जिंकल्याबद्दल बक्षिसाचेच सुमारे चार लाख रुपये त्यांना मिळणार होते. त्याशिवाय भारतातल्या क्रिकेट शौकिनांकडून आणि व्यापारी कंपन्यांकडून होणारी पैशांची उधळण वेगळीच. या सर्वांची चव प्रुडेन्शिअलच्यावेळी त्यांनी चाखली होती. नाहीतर भारताबाहेर आजपर्यंत कमी सामने झाले नाहीत. पण भारताबाहेरच्या वन डे मॅचेसमध्ये जशी कामगिरी केली तशी टेस्ट मॅचेसमध्ये कधीच केली नाही. कारण तिथे प्राइझ मनी नव्हता. दौऱ्याची हमी रक्कम ठरलेली होती. हाच संघ भारतातल्या वन डे मॅचेस इतका जीव तोडून कधीच खेळला नाही. कारण हरण्या जिंकण्यावर त्यांना मिळणारे पैसे अवलंबून नव्हते.

संघात दुफळी माजली ती बक्षिसाचे पैसे वाटण्यावरून माजली. ऑस्ट्रेलियाला जाण्यापूर्वी मोहिंदर, किरमाणी व वेंगसरकरने आपल्या वाट्याचे पैसे समान वाटण्याचे ठरल्यावर झालेली भांडणे मिटली. आणि कधीही न पाहिलेली बक्षिसाची रक्कम पणाला लागली तेव्हा कधीही न पाहिलेलं टीमस्पिरिटसुद्धा संघात निर्माण झालं. प्रोफेशनॅलिझमचा हा फायदा म्हणायचा का तोटा ?

यानंतरची शारजाची रॉथमन्स करंडक स्पर्धा भारत जिंकणार याबद्दल कुणालाच संदेह नव्हता आणि झालंही तसंच. कारण नव्याने निर्माण झालेली जबरदस्त जिद्द आणि बेनसन अॅण्ड हेजेसच्या दीडपट म्हणजे पंचेचाळीस हजार डॉलर्सची बक्षिसाची रक्कम. □


अब्राहम लिंकन
फाळणी टाळणारा महापुरुष
• वि. ग. कानिटकर
भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.
सविस्तर योजनापत्रक मागवा.
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.



परसूच्या पशुकथा
वसंत सबनीस
किंमत १२ रुपये

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी, मलायात हिंस्र श्वापदांचा व्यापार व शेवटी सर्कसबरोबर केलेली भटकंती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सांगितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्ट्यांच्या या कथा...

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

# राखीव जागा - नवे सत्यशोधन व उपाय

प्रा. बी. वाय. कुलकर्णी, जालना

दोन वर्षांपूर्वी उत्तरेकडील काही राज्यात, प्रामुख्याने गुजराथ व बिहारमध्ये राखीव जागा विरोधी आंदोलने झाली. त्यांचे लोण तेव्हा महाराष्ट्रातही येऊ घातले होते; पण त्याच दरम्यान मिनाक्षिपुरमला सामूहिक धर्मांतर झाले, आंदोलकाना राखीव जागाना विरोध केला तर आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची जाणीव झाली. काही काळासाठी का होईना राखीव जागा विरोधी आंदोलन थाबले.

आज पुन्हा एकदा राखीव जागेच्या विरोधात आदोलन सुरू झालेले आहे व त्याने आता हिंसक वळण घ्यावयास सुरुवात केलेली आहे. सुरुवातीला हे आंदोलन अगदी *निवडणुकीच्या तोंडावर सुरू झालेले असल्यामुळे* कदाचित निवडणुकीसाठी असेल असे वाटले होते. पण निवडणुकीनंतरही ते थमलेले नाही, उलट राखीव जागा विरोधी आदोलनाचा घटनाक्रम असे दर्शवतो की ते अधिक तीव्र होण्याच्या मार्गावर आहे. म्हणजे राखीव जागेचा प्रश्न अधिक चिघळणार असे दिसते.

राखीव जागांना विरोध करणाऱ्याचा विशेष मुद्दा म्हणजे 'कार्यक्षम' लोकाना डावलले जाते. अकार्यक्षम लोकाना डॉक्टर, इंजिनियर करून अनेकाच्या जिवाशी खेळले जाते तर शिक्षक, प्राध्यापक करून पिढीच्या पिढी गारद केली जाते. राखीव जागा विरोधकाचा हा मुद्दा हास्यापद आहे. कारण हा मुद्दा काल्पनिक आहे. मागासवर्गीयांच्या बाबतीत काही पूर्वग्रहावर अधारीत आहे. वस्तुस्थितीवर नाही. वस्तुस्थिती यापेक्षा काही वेगळीच आहे, आता हेच पाहाना की, आजपर्यन्त जितक्या व्यक्ती उपचार योग्य न झाल्यामुळे किंवा उपचार चुकीचा केल्यामुळे किंवा ऑपरेशन यशस्वी न झाल्यामुळे किंवा एक डोळा काढावयाचा होता व काढला दुसराच असे झाल्यामुळे किंवा ऑपरेशननंतर साहित्य आत राहिल्यामुळे, ते अधू झाल्या किंवा दगावल्या, त्याच्यावर उपचार करणारे सर्वच काही राखीव जागांच्या लाभामुळे डॉक्टर झालेले होते असे आपणास म्हणता येणार नाही. उलट ते राखीव जागा घेतलेले नव्हते तर तथाकथित 'मेरीट' ने डॉक्टर झालेले होते हे आकडेवारीद्वारे दाखविता येईल. असे असतानाही मेडिकलला राखीव जागा *असू नयेत कारण त्यामुळे* रुग्णांच्या जीवाला भीती असते या म्हणण्याला फारसा अर्थ उरत नाही. असेच इतर क्षेत्रांबद्दलही *म्हणता येईल.* उदाहरणार्थ, मोरवी धरण फुटले, इतर काही धरणांना तडे गेले व जी प्रचंड हानी झाली तेव्हा त्या धरणाच्या बाधकामासाठी नियत्रण व निरीक्षण ठेवणारे इंजिनिअर्स राखीव जागेच्या फायद्यातून निर्माण झालेले निश्चित नसणार. तसेच शिक्षणपद्धतीचा संपूर्ण बोजवारा झालेला आहे हे उघड सत्य आहे. याला काही राखीव जागेतून वर आलेले शिक्षणाधिकारी व शिक्षणतज्ज्ञ व शिक्षक जबाबदार नाही. उलट ज्यांच्याकडे सरस्वतीची मक्तेदारी आहे असा गोड गैरसमज करून घेणारेच लोक याला जास्त जबाबदार आहेत. अर्थात हे सर्व सप्रमाण दाखवता येईल. असे असतानाही दलिताच्या राखीव जागेला विरोध होत असेल तर तो विरोध विरोधासाठी होतो आहे असेच म्हणावे लागेल.

राखीव जागा सुरू होऊन तीस वर्षांपेक्षाही जास्त वर्षे झालेली असली तरी राखीव जागांचा खरा उपयोग मागासवर्गीय समाजाने दहा वर्षांनी केला. कारण आधीची दहा वर्षे ह्या समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते आणि म्हणूनच सवलतीचा फायदा घेणे त्याना शक्य नव्हते. त्या नंतरच्या २० वर्षात सवलतीचा फायदा पिढीजात झाला. '*पिढीजात*' *हा शब्द मी या* साठी वापरला की, मागासवर्गीयांपैकी ज्याना प्रथम सवलतीचा फायदा मिळाला ती कुटुबे आर्थिक दृष्टया चांगली झाली. परिणामत: ती शहरात *स्थाइक झाली व त्याच* कुटुबातील मुले शिक्षण घेऊ लागली, सवलतीच्या टक्केवारीचा फायदा घेत पुन्हा मोठी *झाली व अशाप्रकारे मागासवर्गीयात* एक नवीन प्रस्थापित मध्यमवर्ग तयार झाला.

### झारीतील शुक्राचार्य

वास्तविक या वर्गाने आपल्या इतर बांधवाना मदतीचा हात पुढे करणे आवश्यक होते *पण तो त्यानी केला नाही, उलट तो वर्ग* पूर्वीच्या स्तरापासून व जाणिवांपासून दुरावत चालल्याचे विदारक चित्र दिसते. या नवीन *वर्गाने मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सवलतीचा* स्वाहाकार केला, परिणामत: सवलती मिळत असूनही मोठया प्रमाणात गरजू मागासवर्गीय सुशिक्षित युवक त्यापासून वंचित राहिला. खेड्यातील मागासवर्गीय समाजाला सध्या अशा काही सवलती असतात असे नुकतेच समजल्यामुळे आताशी तो कुठे शिक्षण घेऊ लागला आहे. मागासवर्गीय अशिक्षित लोकांनादेखील आपल्या मुलाने शिक्षण घेऊन पिढीजात नरकवासातून मुक्त व्हावे असे वाटू लागलेले आहे. परिणामत: ग्रामीण दलित तरुण शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित झालेला दिसतो, इथेही त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याला नोकरी मिळण्यासाठी *प्रचंड प्रयत्न करावे लागतात, कारण त्यांच्या*तच निर्माण झालेला मागासवर्गीय ब्राह्मणवर्ग त्याच्यासाठी आज राखीव जागेच्या संदर्भात झारीतील शुक्राचार्यांचे *काम करत* आहे व तो खऱ्या गरजू ग्रामीण मागासवर्गीयापर्यंत सवलती जाऊच देत नाही. अशा वेळी सवलती बद करणे म्हणजे खेड्यातून विखुरलेल्या, खऱ्या अर्थाने जातिव्यवस्थेमुळे पोळलेल्या मागासवर्गीय समाजावर घोर अन्याय होईल आणि म्हणूनच राखीव जागा

सरसकट बद करू नयेत.

राखीव जागा बद करू नयेत; परंतु आता यापुढे त्या सर्वांसाठी केवळ जातीच्या आधारावर खुल्याही असू नयेत. यापुढे सवलती फक्त ग्रामीण गरजू मागासवर्गीय शिक्षित युवकानाच मिळाव्यात. ज्या व्यक्ती क्लास वन, क्लास टू ऑफिसर आहेत किंवा आमदार खासदार आहेत किंवा होते, ज्या व्यक्ती मत्री होत्या किंवा आहेत, ज्याची नियुक्ती एखाद्या मडळाच्या मोठ्या पदावर झालेली आहे अशा व्यक्ती नाही म्हटल तरी आर्थिक बाबतीत 'बऱ्या' वर्गात मोडतात. शिवाय याच्या मुलाना जातिव्यवस्थेचे चटके बसलेले नसतात. तेव्हा अशा मागासवर्गीय व्यक्तीच्या मुलाना सवलतीचा फायदा मिळता कामा नये. तसेच ज्या मागासवर्गीय कुटुबाला अद्यापही नोकरीच मिळालेली नाही अशा कुटुबातील व्यक्तींना नोकरीत व सवलतीच्या प्रत्येक बाबतीत अग्रक्रम देण्यात यावा. म्हणजे सवलतीमागील भावनाही फलद्रूप होईल व सवलतीना असलेला विरोध बराच कमी होईल.

आज सवर्णीय मुलगा सवलतीला विरोध करतो तो गरजू, ग्रामीण, गरीब मागासवर्गीय मुलाना सवलती मिळतात म्हणून नव्हे तर त्याच्याच बरोबरचा मागासवर्गीय तहसिलदार, कलेक्टर, आमदार, खासदार, मंत्री अडीच हजार पगार उचलणारा प्राध्यापक याचा मुलगा त्याला डावलून पुढे जातो म्हणून, हा त्याचा राग या संदर्भात रास्त आहे व तो कमी करण्यासाठी व सवलती अद्यापही ग्रामीण गरीब मागासवर्गीयाना चालू ठेवण्यासाठी उपरोक्त निर्देशित सधन व मध्यमवर्गीय दलिताना सवलतीच्या यादीतून बाद करावे. माझ्या या विचाराचा मागासवर्गीय पुढाऱ्यांनी देखील त्याच्या बाधवांच्या कल्याणासाठी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

शेवटी मागासवर्गीय पुढाऱ्यानी एक विचार अतिशय गभीरपणे करावा की, सवलती काही नेहमीसाठी राहणार नाहीत, त्या संपण्याचा एक ना एक दिवस येणार आहे. त्या दिवशी कुबड्या काढून घेतल्याबरोबर खाली पडण्याची पाळी आपल्यावर येऊ नये म्हणून काही उपाययोजना त्यानी आत्तापासूनच करणे आवश्यक आहे. सवलती बंद होण्याचा दिवस येणार, म्हणून समाजाची मानसिक स्थिती, सवलती गेल्यावरही आपण स्वतत्रपणे जगू शकू आणि तेही मानाने, अशी निर्माण करणे आवश्यक आहे कधीतरी आपणास इतरांबरोबर सर्व क्षेत्रात स्पर्धा करावी लागणार व त्या तयारीला लागले पाहिजे, अशी जाणीव त्या समाजातील तरुणाना करून देणे आवश्यक आहे.

सवलती एकदम बंद कधीच करू नयेत. त्या टप्प्याटप्प्याने बद कराव्यात म्हणजे त्याची तीव्रता एकदम बंद केल्यामुळे जितकी जाणवेल तितकी जाणवणार नाही. त्यासाठी सवलतीच्या प्रमाणात क्रमश. वर्षाला दिड टक्का कपात करावी. म्हणजे यावर्षी ३३ टक्के एकूण जागेच्या प्रमाणात राखीव जागा असतील तर पुढच्या वर्षी हे प्रमाण ३१½ टक्के असेल व या क्रमाने आजपासून २२ व्या वर्षी सवलतीचा प्रश्न निकालात निघेल. या योजनेचा फायदा असा होईल की, सवलती जाणार म्हणून मागासवर्गीयाना गुणात्मक मार्गाकडे वळावे लागेल, स्पर्धेला तोड द्यावे लागेल व त्यासाठी तयारीही करावी लागेल व एकदम सवलती न गेल्यामुळे पोकळीही निर्माण होणार नाही व तो समाज भावावूनही जाणार नाही.

सवलती फक्त नोकऱ्या देण्याच्या सदर्भात व व्यावसायिक शिक्षणात प्रवेश देण्याच्या सदर्भातच फक्त बद व्हाव्यात, मात्र मागासवर्गीय जातीजमातीना त्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व सवलती द्याव्यात. त्यांना फी माफ असावी, शिष्यवृत्ती असावी, पुस्तके द्यावीत, शक्यतर शहरात शिक्षण घेण्यासाठी आलेल्या मागासवर्गीय गरीब मुलाची राहण्याखाण्याची सोयही सरकारने करावी. सर्वसामान्य 'उच्चवर्णीय' मुलाना उपलब्ध असणाऱ्या सोयीपेक्षा चार सवलती अधिक द्याव्यात; पण एकदा त्या दिल्यानतर नोकरीत राखीव जागा बद कराव्यात, गुणवत्तेची कसोटी हीच अतिम कसोटी असावी.

विशेष म्हणजे सरकारने राखीव जागेच्या विरोधात सुरू झालेल्या गुजराथमधील आदोलनामुळे सवर्ण दलित याच्यात निर्माण होऊ पाहणारी भयकर दरी वाढण्याच्या आत व या आंदोलनाचे लोण इतर राज्यात पसरण्याच्या आत वरील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

अखंडत्व व एकात्मतेच्या आश्वासनावर निवडून आलेल्या सरकारवर हा प्रश्न सोडवण्याची तशी नैतिक व मोठी जबाबदारी आहे. □


## राजहंसचे नवे प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

**मंगला गोडबोले**

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दु.ख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

## पिंपरी–चिंचवड : खास वार्तालेख

# प्रशासक-निवडणुका-विकास-नव्या समस्या

गिरीश प्रभुणे

पिंपरी–चिंचवडचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून लोकप्रिय झालेल्या डॉ. श्री. श्री. घारे यांच्यापासूनच सुरुवात केली. मनात एक प्रश्न उभा रहात होता पूर्वी नगरपालिका बरखास्त करून महानगरपालिका व्हावी असे लोकाना वाटत होते आणि प्रशासकीय कारकिर्दीला अडीच वर्षे होण्यापूर्वीच लोक म्हणू लागलेत– लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हातात कारभार दिल्याशिवाय विकास होणार नाही. एकीकडे निवडणुकीला लोक कटाळलेले असताना पुन: निवडणुकीची ही हौस कशासाठी ?

टिळक विद्यापिठाची बैठक आटोपून डॉ. घारे नुकतेच परतले होते. त्याना ' माणूस ' च्या महानगर अकाची आठवण देऊन मी विचारलं. ' नगराध्यक्षपदाची सूत्रे खाली ठेवताना ज्या अपेक्षा आपण केल्या होत्यात त्याची पूर्तता झाल्यासारखी वाटते का ?'

यावर डॉ. घारे म्हणाले, ' मला ' माणूस ' चा तो अक चागला आठवतोय. चागला झाला होता तो अंक तसं पाहिलं तर आम्ही सर्व लोकप्रतिनिधींनी नगरपालिकेत एक खास ठराव करून महानगरपालिकेची मागणी केली होती. कारण पिंपरी–चिंचवडमधील वेगाने होणाऱ्या औद्योगिकरणाने येथील लोकसख्या केवळ पाच–सहा वर्षात लाख–सव्वा लाखाने वाढली होती. म्हणजे दुप्पट झाली होती. त्यामुळे एकदर नगरपालिकेने केलेल्या व्यवस्था या अपुऱ्या पडू लागल्या होत्या प्रचलित नगरपालिकेच्या कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करावे लागत होते. त्यामुळे अर्थातच नगराची वाढ आणि विकासाची गती यांचा मेळ बसत नव्हता. वस्तुत: आम्हाला जे अधिकार होते ते वापरूनही प्रत्येक मोठ्या निर्णयासाठी मा. जिल्हाधिकाऱ्याची परवानगी घेण्यासाठी पळावे लागत असे. त्याला मान्यता देण्यात त्याच्याही काही तात्रिक अडचणी असत. त्यामुळे महापालिका होण्यामुळे वा प्रत्येक अडचणीवर येथील नव्याने येणारे ' कमिशनर ' त्याना असलेल्या अधिकारामुळे सहजपणे मात करू शकतील असे वाटले होते. सामान्य माणसाच्या गरजाची पूर्तता तातडीने होईल असे वाटले होते; परतु प्रत्यक्षात गेल्या तीन पावणेतीन वर्षातील अनुभव हा तितकासा समाधानकारक नाही असेच म्हणावे लागेल. संपूर्ण भागाचा विचार केला असता समतोलपूर्ण विकासाची कामे करण्यात प्रशासकाना अपयश आलेय. ज्या गतीने आणि प्राधान्यक्रमाने (प्रायॉरिटी) आरोग्य, पाणीपुरवठा, वाहनव्यवस्था यांच्यात सुधारणा व्हायला हवी होती ती झालेली दिसून येत नाही. मैला नेण्याची भूमिगत आखणी– (अडरग्राऊंड ड्रेनेज) नगरपालिकेच्या काळातच एक महत्वाकांक्षी आणि प्राधान्य क्रमाकाने हाती घेतलेली योजना काही तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नव्हती. प्रशासकाच्या अधिकारात हे काम पूर्ण होईल अशी आमची अपेक्षा होती; परतु हे काम पूर्ण होऊनही, चालू होण्यातील अडचणी दूर करण्यात प्रशासक यशस्वी झाले नाहीत. एक गोष्ट मात्र महानगरपालिका झाल्यानंतर झाली ती म्हणजे नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामीण अविकसित भागातील सुधारणा. त्या भागातील रस्ते–पाणी–वीज गटारे या प्राथमिक गोष्टी फार झपाटयाने पूर्ण केल्यात. शिवाय वृक्षारोपणाने त्यानी या परिसराचे रूप नयनरम्य करून सोडले आहे. हे खूप चागले झाले; परंतु प्रशासकांच्या बाबतीत, त्यानी पूर्वीच्या जागी जी धडाडी दाखविल्याचे आम्ही ऐकून होतो ती मात्र इथं आल्यावर दिसली नाही असे म्हणावे लागेल. आज पूर्णावस्थेला आलेली प्रशासकीय इमारत, थेरगावचा पूल, गुलावपुष्प वाटिका इ. योजना. मुबई–पुणे हमरस्त्याचे रूदीकरणासाठी ९५ लाख रु. आम्हीच त्यावेळी शासनाकडे वर्ग केले होते. त्यामुळे ती कामे आज पूर्णावस्थेत आलेली दिसत आहेत. ती पूर्ण व्हावीत याकडे मात्र प्रशासकांनी चांगले लक्ष पुरविले आहे.'

### ' आधार शाळा ' – स्तुत्य उपक्रम

माजी नगराध्यक्षांचा निरोप घेऊन या भागातील भाजपचे नेते माजी नगरसेवक शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्ते श्री मधू जोशी यांची भेट घेतली त्याचे म्हणणे पडले की–

' मनपा झाल्यावर शैक्षणिक क्षेत्रात तसा विशेष बदल झाल्याचे जाणवत नाही. मात्र आम्ही सुचविलेल्या ' आधार शाळे ' ची कल्पना प्रशासकांनी उचलून धरली आणि राबविली आहे; परतु एका बाबतीत मात्र निराशाच पदरात पडली आहे ती म्हणजे प्राथमिक आणि माध्यमिक शाळाच्या इमारतीची संख्या अपुरी आहे. शिक्षक सख्या फारच कमी आहे. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावला आहे. ' मनपा' झाल्याचा आर्थिक फायदा शिक्षकांना काहीच न झाल्याने शिक्षकाचे मानसिक स्वास्थ्य ठीक नाही आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे खाजगी शाळाच्या वाढीमुळे मनपावरील ताण कमी पडत असे, तो प्रशासकानी खाजगी शाळाची अनुदाने बंद केल्यामुळे प्रचंड प्रमाणात वाढला आहे. शिवाय खाजगी शाळाची निकोप वाढ त्यामुळे खुटली असून ' देणगी ' पद्धतीला पालकांना तोंड द्यावे लागत आहे. शिवाय त्या शाळा आर्थिकदृष्टया अत्यत अडचणीत आहेत. त्यासाठी प्रशास-

कानी केवळ महापालिकांच्या शाळाचाच विचार न करता शैक्षणिक दर्जा वाढण्यासाठी खाजगी क्षेत्राचाही विचार करायला हवा, जो पूर्वी केला जात असे.'

मधू जोशीच्या या कळकळीच्या सूचनेवर चिंचवडचे आय काँग्रेसचे एक कार्यकर्ते व्यापारी श्री. तकथमलजी मुथा यांची प्रतिक्रिया अशी–

'शिक्षणाचा दर्जा महापालिका झाल्यावर अत्यंत खालावला आहे. मुलावर कपडे–बूट–पुस्तके–आहार याचा नुसता मारा केला जातोय. परंतु त्यांना शिकवायला याच्याकडे शिक्षक नाहीत. बसायला बाके नाहीत, वर्ग भरवायला शाळा नाहीत. एकेका वर्गात शंभर शंभर मुले भरुन शाळा म्हणजे कोंडवाडेच केलेत यानी ! मुलाना खेळायला साधने नाहीत. याच्या श्रीमंत महानगरपालिकेतली मुले पोशाखात उत्तम दिसावीत म्हणून हे लक्षावधी रुपयाचे कपडे वाटतात. आहो मुलांच्या अगांवर फाटके कपडे असले तरी चालतील पण त्याना शिक्षक द्या म्हणाव. या शाळा महानगरातल्या वाटत नाहीत.'

प्रशासकीय कामाबद्दल बोलताना मुथा शेठ म्हणाले, 'सामान्य माणसाचे काही फायदे झालेत. बांधकाम परवाने आता त्वरित मिळतात. रस्त्याच्या सोई झाल्याने वाहतूक वाढली. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकाना येणेजाणे सोईचे झाले. व्यापार वाढला. नवीन भागात वीज–पाणी, रस्ते, वृक्षारोपणाच्या सुधारणा झाल्या. पण प्रशासक म्हटले की जो दरारा लागतो तो नसल्यामुळे कारभारात गलथानपणा आलाय. त्यामुळे कर्मचारी वर्ग काम करत नाही. लवकरात लवकर निवडणुका घेऊन लोकप्रतिनिधीच्या ताब्यात कारभार द्यावा. कारण लोकप्रतिनिधी हे नागरिकाच्यात मिसळणारे असतात त्यामुळे कामे झाली नाहीत तर त्यांना जाब विचारता येतो.'

## 'पर्यावरण' एवढीच समस्या

तकथमलजीच्या प्रमाणेच या भागातील एक उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते, चिंचवड विकास मंडळ, क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके आणि लहुजी वस्ताद पुतळा समिती, क्रां. चापेकर पुतळा समितीचे अध्यक्ष, प्रदुषणाला आळा बसावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या 'परिसर' या निसर्गप्रेमी संस्थेचे कार्यकर्ते श्री. अशोक गुमास्ते यांना भेटलो. पिंपरी चिंचवडच्या विकासासबंधी असमाधान व्यक्त करताना श्री. गुमास्ते म्हणाले–

'विनापरवाना बाधकामाचे प्रमाण वाढल्याचे दिसते. भोसरीत गेल्या दोन वर्षात प्रचंड प्रमाणात विनापरवाना बांधकामे झालीत. प्रशासकाचा दरारा नसल्यामुळे असे घडले उद्योजकाच्या दृष्टीने पूर्वी औद्योगिक वसाहतीत रस्ते अत्यंत खराब होते. आता त्यांचे डांबरीकरण झाले आहे. परंतु त्या ठिकाणी नागरी वाहतुकीची साधने अपुरी आहेत त्यामुळे रिक्षावाले अक्षरशः लुटत असतात पूर्वीच्या लोकप्रतिनिधीचे औद्योगिक परिसराकडे संपूर्ण दुर्लक्ष होत असे. प्रशासकीय कारकिर्दीत मात्र सुधारणा घडून आल्यात. पर्यावरणाच्या बाबतीत प्रशासकांच्याकडून जे कार्य झाले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावयास हवेत. आज जरी दिसत नसले तरी पुढील वीसपचवीस वर्षानंतर याचे महत्त्व लोकांना पटेल. हे फार मोलाचे कार्य आहे. प्रशासकाकडून अजूनही काही सुधारणा अपेक्षित होत्या, ज्या गोष्टी राजकारणामुळे लोकप्रतिनिधी करू शकत नाहीत. अशी सार्वजनिक कामे प्रशासकानी करायला हवीत ती झालेली दिसत नाहीत. त्यासाठी प्रशासक अजूनही तीन वर्षे हवेत. किमान त्यानी आज हाती घेतलेली कामे पूर्ण होणे आवश्यक आहेत. वृक्षारोपणाचा कार्यक्रम अजूनही राबविण्याची गरज आहे'

## वेगळं काय केलंय ?

पिंपरी–चिंचवडमधील स्वा. विवेकानंद मंडळ आणि 'लोहगड' या गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी हे गाव दत्तक घेतलेल्या लोहगड उत्कर्ष समितीचे प्रमुख कार्यकर्ते, एक लघुउद्योजक श्री. अनंतराव कुल-

---

लोकसभा, विधानसभांच्या पाठोपाठ नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका अपेक्षेप्रमाणे जाहीर झाल्या. लोकही आता सरावलेत. 'घेऊन टाका एकदाच्या सगळ्या निवडणुका' असा सूर बोलण्यातून येऊ लागलाय. पिंपरी–चिंचवड, ठाणे, औरंगाबाद, नाशिक या नव्याने झालेल्या महानगरपालिकांची नावे या निवडणुकांच्या यादीत नसल्याने पिंपरी–चिंचवडबाबत कानोसा घेतला असता समजले की, महापालिका झाल्यानतर करायची वॉर्डपुनर्रचना पूर्ण झाली असून नागरिकांच्या आक्षेप–सूचनासाठी ही व्यवस्था लवकरच जाहीर होईल. त्यानंतरच सर्व प्रकारच्या प्रक्रियेचा कालावधी धरून आणि 'बारामती' ची लोकसभेची मध्यावधी निवडणूक लक्षात घेता त्याचे निकाल वगैरे लागून त्यानंतर साधारण महिना दीड महिन्याने, म्हणजे जूनमध्ये या निवडणुका होण्याची शक्यता आहे.
पिंपरी-चिंचवड ही पूर्वी नगरपालिका होती. ११ ऑक्टोबर १९८२ ला तिचे रूपांतर महापालिकेत होऊन पहिले प्रशासक म्हणून श्री. हरनामसिंग यांची नेमणूक झाली. महापालिका होण्यापूर्वीच फेब्रुवारी ८२ मध्ये 'माणूस' चा 'महानगर पिंपरी-चिंचवड' विशेषांक निघाला होता. त्या अकात पिंपरी–चिंचवडच्या विकासाशी संबंधित अशा अनेक व्यक्तींच्या मुलाखती प्रसिद्ध झालेल्या होत्या. या व्यक्तीना पुन: भेटून त्याचे गेल्या अडीच-तीन वर्षातील महानगरीच्या वाटचालींबद्दलचे काय अनुभव आहेत, पुढच्या वाटचालीसंबंधी काय अपेक्षा आहेत ते जाणून घेणे उपयुक्त वाटले. या भेटीगाठींचा हा आलेख. . .

---

कर्णी याचे म्हणणे पडले की, 'महानगरपालिका झाल्यावर अपेक्षित असे पहिले पाऊल पडायला हवे होते, ते म्हणजे बेकायदा बांधकामाच्या विरोधी कारवाई करण्याचे. परंतु अनधिकृत बांधकामांबरोबरच बेकायदा उद्योगधंद्यातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे झोपडपट्ट्यातही वाढ झाली. त्यामुळे झोपडपट्टीतल्या रस्त्यावर खळणाऱ्या मुलामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. 'मनपा' क्षेत्रातील औद्योगिक विभाग अद्यापही निश्चित न झाल्यामुळे निवासी क्षेत्रातील उद्योगधंदे हलविण्यात अडचणी आहेत. आज सपूर्ण महानगरात 'टपरी संस्कृती' अस्तित्वात येत असून त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. सांडपाण्याच्या प्रश्नाकडे अद्यापही गांभीर्याने न पाहिल्यामुळे आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. औद्योगिक तसेच निवासी परिसरात सांडपाण्याची मोठमोठी डबकी साठलेली आढळतात. मनपाचे याकडे दुर्लक्ष आहे.'

काही कामे झाल्याचे सागून अनंतराव कुलकर्णी पुढे म्हणाले, 'अॅक्विझिशनमधील मोकळ्या जागावर तारकुंपण घातल्यामुळे झोपडपट्ट्यांना आळा बसेल असे वाटते. मुंबई-पुणे हमरस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अद्यापही सिरियस पेशंटस-अपघातात जखमी झालेल्याच्यावर त्वरीत उपचार होण्याची सोय पिंपरी-चिंचवड परिसरात झालेली नाही. त्यामुळे 'ससून'च्या वाटेवर असतानाच अनेकांचे निधन झाल्याचे आढळते. या भागाला वेगळेपण येण्यासाठी वेगळी न्यायालये, औद्योगिक न्यायालये, पोलीस कमिशनर यांचे कार्यालय असणे आवश्यक आहे. एस. टी. स्टॅण्ड नसल्यामुळे पिंपरी-चिंचवड महाराष्ट्रातील इतर शहरापासून तुटल्यासारखेच आहे.'

## नोकरशाहीचा विळखा

यानंतर या भागातील एक कामगार नेते कॉ. सुभाष सरीन यांना गाठले असता ते म्हणाले 'याप्रकारे 'माणूस' या भागावरच्या प्रश्नांबद्दल आस्था दाखवित आहे हे चागले आहे. इथला आजचा प्रश्न फार वेगळा झाला आहे. नोकरशाहीच्या विळख्यात आम्ही महानगरी सापडलीय. राजकीय नेत्यांच्या पद्धतीने नोकरशाही निर्णय घेत असते. त्यामुळे कामगार वर्गात, नागरिकात नोकरशाहीबद्दल अविश्वास निर्माण झाला आहे. ड्रेनेज व्यवस्थेकडे इतके दुर्लक्ष का केले जाते हेच समजू शकत नाही. आज त्यामुळे पिंपरी-चिंचवडचे आरोग्य धोक्यात आले आहे. 'गॅस्ट्रो' सारखे रोग मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. प्रशासकाना साधी हॉस्पिटल्स सुधारता नाही आली. चिंचवडच्या तालेरा हॉस्पिटलमध्ये नगरपालिका असताना आलेले एक्सरे मशीन तीन वर्षे झाली, धूळ खात पडले आहे. अॅक्सिडेंट हॉस्पिटलचा उपयोग होत नाही. कारण तातडीची सेवा तातडीने उभीच रहात नाही.'

सरीन बोलत होते– 'मनपा झाल्यानंतर खात्याचे प्रमुख सर्व तज्ज्ञ मंडळी होती. परंतु वर्षभरातच त्याचा प्रभाव वाढतोय असे पाहून त्याच्या बदल्या करण्यात आल्या. डे. कमिशनर श्री. अनिल पवार, डॉ. सोनटक्के, वाहनव्यवहारचे जनरल मॅनेजर गणेश जोशी यासारख्या कार्यक्षम अधिकाऱ्याची आवश्यकता असताना त्याच्या बदल्या केल्या. त्यांच्या रिक्त जागांवर दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्याना काम पहाण्यास सांगितल्यामुळे महापालिकेच्या प्रथम दर्जाच्या अधिकाऱ्यांची कुचंबणा झाली आहे. महापालिकेच्या प्रशासनात भोंगळपणा आला आहे. नागरिकांच्या सोईकडे दुर्लक्ष होऊन अधिकारीवर्ग केवळ तोंडपुजा बनला आहे. केवळ वृक्षारोपणाने इथले प्रश्न सुटणार नाहीत. त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधीच्या ताब्यात लवकरात लवकर कारभार जाणे आवश्यक आहे. नोकरशाहीच्या ताब्यात फार काळ सत्तास्थाने ठेवणे धोक्याचेच असते. त्यामुळे विकास एका ठराविक साचेबंदपणे होत रहातो.'

श्री. सरीन याच्या प्रमाणेच जनता पक्षाचे एक नेते. श्री. गौस लाजम अब्दुल करीम इनामदार (जी. ए. इनामदार) यानी सागितले की, प्रशासकाच्या कारकिर्दीत विकासाचा वेग मंदावला. हाताखालचे अधिकारी मनमानी कारभार करतात. नगरपालिकेची महानगरपालिका होऊनही काही विशेष बदल जाणवत नाही.

## खरे प्रश्न वेगळेच आहेत

पिंपरी-चिंचवड वडार समाजाचे एक प्रमुख कार्यकर्ते आणि वेताळनगर झोपडपट्टीतील रहिवासी श्री. काळूराम शिंदे यांनी महानगरपालिका झाल्यानंतर झोपडपट्ट्यांमधून झालेल्या कामासंबंधी बोलताना सांगितले की, 'आज सर्व झोपडपट्ट्यामधून मुबलक पाणी पिण्याचे नळ आहेत. डांबरी रस्ते, गटारे, संडास झालेले आहेत. रस्त्यांवर हॅलोजनचे दिवे असल्यामुळे सर्वत्र 'लखलखाट' आहे; परंतु झोपडपट्टीवासियांच्या दृष्टीने महत्त्वाची कामे झालेली नाहीत. उद्योगधद्याना एन. ओ. सी. (ना हरकत दाखला) मिळत नाही. पुणे-मुंबईत मिळतो, मात्र इथे नाही. त्यामुळे पिठाच्या गिरण्यांसारखेही उद्योग नाहीत. त्यासाठी खूप लांब जावे लागते. झोपडपट्टी निर्मूलनातील गाळ्याचे वाटप अद्याप झालेले नाही. त्याचे सूत्र ठरलेले नाही. त्याची योजना पुणे महानगरपालिकेप्रमाणे ठरविल्यास लोकाना आणि महानगरपालिकेलाही ते सोईचे होईल.

झोपडपट्टीमधील बालवाड्याबद्दल बोलताना शिंदे म्हणाले, प्रशासकांनी अनुदान पूर्णतः बंद केल्यामुळे झोपडपट्ट्यामधून चालणारी संस्कार केंद्रे, बालवाड्या बंद पडल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या 'अंगणवाडी' योजनेप्रमाणे योजना आखायला हवी. पूर्वी नगरपालिका असताना झोपडपट्टीतून स्वच्छतेसाठी स्लाईडद्वारा शिक्षण दिले जाई. सध्या या भागाकडे पूर्णतः दुर्लक्ष असल्याने अस्वच्छता दिसते. पुण्याप्रमाणे झोपड्यांना नंबर दिले गेले असते, तर झोपडपट्टीतल्या वाढीस आळा बसला असता; परंतु वरवरच्या सुधारणांव्यतिरिक्त प्रशासनाचे या प्रश्नाकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले आहे. अधिकाऱ्यांनी अडचणी कधी समजूनच घेतल्या नाहीत. त्यामुळे प्रश्न अधांतरीच राहिलेत. काळूराम शिंदे याच्या सारख्या कार्यकर्त्यांच्या मनात महानगरपालिका झाल्यानंतरच्या काही अपेक्षा होत्या; परंतु त्याची पूर्तता होण्याऐवजी नव्या अडचणीच निर्माण झाल्यामुळे झोपडपट्टीतले जीवन अस्वस्थ बनले आहे.

झोपडपट्टी विभागात प्रथमपासून कार्य करणारे माजी नगरसेवक श्री. गोविंद प्र. पानसरे यांच्या म्हणण्याप्रमाणे झोपडपट्टीत सुधारणा चांगल्या झाल्या. नळकोंडाळी गटारे आणि डांबरी रस्ते यामुळे झोपडपट्टीवासीयाचे जीवन सुसह्य झाले आहे. झोपडपट्टीवासीयांच्या

दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला तो म्हणज सर्व झोपडया कायदेशीर झाल्या आहेत. त्यामुळे आता सुधारणा करता येताहेत. खाजगी जागावरील झोपडपट्ट्या शासनाच्या मालकीच्या झाल्या आहेत. डेव्हलपमेंट प्लॅन व्यतिरिक्त जमिनीवरील झोपडपट्ट्यामधून सुधारणा झाल्यात. १०० एकरातील झोपडपट्टी निर्मूलन प्रकल्पाचे काम कोणताही अडथळा न येता वेगाने चालू आहे. एक एक झोपडपट्टीचे क्षेत्र घरून त्या ठिकाणी हलवावे. त्यासाठी बँकांचे सहकार्य घ्यावे आणि झोपडपट्टीवासीयाना कर्ज मिळवून द्यावे म्हणजे हा प्रकल्प पूर्ण होईल नाहीतर त्या ठिकाणी सुद्धा मोठी झोपडपट्टीच निर्माण होईल.'

## बेकायदा बांधकामात वाढ कशाने ?

या परिसरातील विद्यार्थी वर्गाचे नेते श्री. मानव कावळे (एम कॉम) याची भेट घेऊन त्याचे काय म्हणणे आहे हे ऐकावे म्हणून ते चालवीत असलेल्या टेलिफोन बुथवर गेलो. श्री. कावळे हे दोन्ही पायानी अपंग आहेत.

झोपडपट्टीच्या सदर्भात बोलताना मानव कावळे म्हणाले. 'झोपडपट्ट्यामध्ये सध्या ज्याप्रकारे खर्च होत आहे तो पहाता तो खर्च अनाठायी आहे. झोपडपट्टी सुधारणेऐवजी निर्मूलन करावे. दुसऱ्या पर्यायी जागांवर सोई उपलब्ध करून द्याव्यात; परतु राजकीय कारणासाठी झोपडपट्ट्यांची वाढ सुरू आहे. झोपडपट्ट्यामधील लोकाचा राजकीय पक्ष-विशेषतः सत्ताधारीपक्ष वापर करतो. त्याना खोटया आश्वासनाच्या नादी लावून विकासात अडथळे निर्माण करतात.' महानगरासंबधी बोलताना कावळे म्हणाले-

'अनधिकृत बाधकामाचा वेग पहाता पिंपरी-चिंचवड म्हणजे केवळ आशियाखडातील सर्वात श्रीमतच नव्हे तर आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी होईल कारण सध्या कोणत्याच बाबतीत नियोजन दिसत नाही. ठराविक विकासाची-रस्ता, वीज इ. कामे सोडली तर बाकी इतरत्र अंधारच आहे. प्रशासकाकडून धडाडीची अपेक्षा होती; परंतु आजतरी चित्र निराशाजनक आहे कर्मचारी कामात हयगय करताना आढळतात. कोणत्याही अर्जाला उत्तर मिळत नाही वा निकाल लागत नाही.' महानगरातील विद्यार्थी वर्गाविषयी बोलताना कावळे म्हणाले,

'येथील विद्यार्थी हा परिपक्व वाटत नाही. नोकरी करणारा विद्यार्थी वर्ग बऱ्यापैकी आहे; परंतु विद्यार्थी चळवळ या अर्थाने इथे अद्याप काही रुजलेली नाही. कोणताही वर्ग इथं एकत्रित सघटित नसल्याने जातीयवाद किंवा दंगली नाहीत. इथले जीवन साधारणपणे सुखवस्तूपणाकडे झुकणारे आहे. त्यामुळे नागरिकामध्ये कोणत्याही प्रश्नावर लढा देण्याची वृत्ती नाही. पुढे सुद्धा येईल असे वाटत नाही.'

## अस्वच्छ तिर्थक्षेत्र...पवना

कावळे यांच्यानतर पिंपरी-चिंचवडचे सांस्कृतिक केंद्र बनलेल्या चिंचवड मोरया गोसावी संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. विघ्नहारी देव महाराज याची भेट घेतली असता ते म्हणाले. 'महानगरीय जीवनातला सुधारणांचा-विकासाचा वाटा आमच्या परीने आम्ही उचलीत आहोत. इतराचे काय सांगू ? आम्ही देव संस्थानतर्फ मागे 'माणूस' महानगर 'विशेषांका'च्या वेळी संकल्प म्हणून सागितल्याप्रमाणे 'मोरया हॉस्पिटल' सुरू केले आहे. त्याची दुसरी शाखा प्राधिकरणात आहे. आज या ठिकाणी किडनी, कॅन्सर अशा रोगावरील शस्त्रक्रिया यशस्वीपणे होतात. तज्ज्ञ डॉक्टर मंडळीची सेवा उपलब्ध आहे. वाडयात सध्या व्याख्याने-प्रवचने होत असतात. याठिकाणच्या संस्थामंडळांना जागेची अडचण भासते त्यावेळी मुख्य सभामंडप विनामूल्य उपलब्ध करून दिला जातो. चिंचवड देवस्थान हे सास्कृतिक केंद्र व्हावे हा प्रयत्न होता आणि त्यात आम्हाला यश येत आहे आमची एकच अडचण आहे. आम्ही सर्व प्रकारचे सहकार्य महानगरपालिकेस देत असतो; परंतु या ऐतिहासिक प्राचीन पवित्र स्थळाचे पावित्र्य रहावे यासाठी आम्ही केलेल्या सूचनांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असते. त्यामुळे देवस्थानचा परिसर हा दुर्गंधीयुक्त गलिच्छ बनत चालला आहे.'

याचे उदाहरण देताना देव महाराज म्हणाले 'चिंचवडची पूर्वीची वस्ती दोन एक हजार होती. त्यामुळे कपडे धुण्यामुळे घाटावरचे पाणी खराब होत नसे; परतु आता तीस-चाळीस हजार लोकवस्ती झाली असून बहुतेकाचे कपडे याच ठिकाणी धुवायला येतात. वस्तुतः समाधीमागचा घाट हा स्नानासाठी आहे, परतु तो आज पहाटेपासून रात्रीपर्यंत धोबीघाट बनला आहे. त्यामुळे आज याठिकाणी तीर्थक्षेत्र म्हणून येणाऱ्याच्या स्नानाची अडचण होते. शिवाय चिंचवड गावातील निम्म्या भागातील साडपाण्याचे गटार समाधीच्याच वरच्या भागात सोडल्यामुळे या पवित्र क्षेत्रास गलिच्छपणाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. पाण्यास दुर्गंधी येत असते, महासाधू मोरया गोसावी याच्या जिवत समाधीची ही विटंबनाच आहे. आम्ही त्यासाठी अनेक वेळा सूचना केल्या परंतु ते गटार बंद करून त्याचे तोड समाधीच्या अलिकडून असलेल्या रस्त्यावरून नेऊन, धनेश्वराच्या मदिरापलिकडे न्यावे याकडे दुर्लक्ष होत आहे. हे खर्चिक असले तरी चिंचवडची, प्रत्येक चतुर्थीच्या यात्रेत नदीतील घाणपाण्यामुळे आज बदनामी होत असते. याशिवाय आज जिथे स्मशान आहे त्याच्या बाजूला नागरी वस्ती आहे. शिवाय प्रेत जाळल्यानंतर कुत्री त्यातील अस्थि देवस्थानच्या आवारात टाकतात. एका प्रकारे प्रेताची विटंबना होतेच देवस्थानचे पावित्र्यही बिघडते. हे स्मशान हलवून चिंगाव गणपतीजवळ न्यावे अशी सूचना होती. या समाधीजवळ 'राजबिंडा' म्हणून एक चबुतरा खडक आहे. ते ऐतिहासिक ठिकाण आहे. छत्रपती शाहू महाराज या ठिकाणी बसून देवमहाराजाशी गप्पा-गोष्टी सल्ला-मसलत करीत असत. असा हा ऐतिहासिक परिसर महापालिकेच्या दुर्लक्षामुळे आज अपवित्र बनत चालला आहे. धोबीघाटासाठी आम्ही जागा देण्यास तयार आहोत. त्या ठिकाणी धोबीघाट हलवावा आणि गटारीचे तोड खालती न्यावे म्हणजे या क्षेत्राचे पावित्र्य राहील.

एकीकडे नवे 'दुर्गादेवी' क्षेत्र निर्माण करीत असताना या ऐतिहासिक परिसराकडील हे दुर्लक्ष न समजण्यासारखे आहे. चिंचवडच्या या तीर्थक्षेत्राला महाराष्ट्रातून भाविक दर्शनास येतात आणि नदीच्या घाण पाण्याची 'महती' गावोगाव नेतात असेच म्हणावे लागेल. पुण्यातील तळ्यातील गणपतीचे (सारसबाग) उदाहरण घेता येईल. पूर्वीचे स्वरूप आणि आजचे स्वरूप यात किती फरक आहे ! योजकस्तत्रदुर्लभः हेच खरे.

## निवडणूका नकोत !

महाराजांकडून निघून मी पिंपरी-चिंचवड परासरातील एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, क्रांतीवीर चाफेकर स्मारक समिती, ग्रामविकास सेवा केंद्राचे कार्यकर्ते श्री. मधुसूदन रामचंद्र जोशी यांच्या भेटीस गेलो, रहाटणी या गावी ग्रामविकास सेवा केंद्राच्या भेटीला जाऊन ते नुकतेच परतले होते. 'माणूस'च्या महानगर विशेषांकाची आठवण काढून ते म्हणाले. 'येथील समाज जीवनात अद्याप काही बदल झाल्यासारखे जाणवत नाही. अलिकडे माझे असं मत बनत चालले आहे की, समाज जीवनात राजकारण व्यापून राहिले आहे. राजकारणामुळे सामाजिक कार्याची हानीच होत आहे. राजकारणाचा जीवनावरील प्रभाव जेवढा कमी होईल तितके येथील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन निर्मळ होईल महानगरपालिका झाल्यानंतरचा एक विशेष बदल मला जाणवला. मला जाणवला तो मी सागतो. रोज नगरपालिकेत, रस्त्यावर, चौदाचौकातून चालणारा राजकारणी लोकांचा-कार्यकर्त्यांचा घुडगुस-चर्चा कमी झाल्या-बंद झाल्या. त्यामुळे लोकाच्या जीवनात थोडी स्वस्थता आली. संस्थात्मक कार्यांना अधिक चालना मिळालीय. कार्यकर्ते संस्थात्मक कार्यात, रस घेऊ लागलेत. पी. सी. एम. टी. चा सप, काही कारखान्यातील सप सोडले तर समाजजीवन गढूळ करणाऱ्या घटना घडल्या नाहीत. महानगरीचे प्रशासक आणि त्याचे सहकारी-कर्मचारी यांनी ठरविलेल्या योजना राजकारणी मंडळीच्या अनुपस्थितीमुळे विनासायास पार पाडताना दिसत आहेत. सर्व सामान्याची कामे जलदगतीने होत आहेत. प्रशासक महानगरातील वेगवेगळ्या सस्थाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने नागरिकात मिसळतात. त्याच्या अडचणी समजावून घेताना दिसतात. वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड परिसरातील असख्य सस्थाना सहभागी करून घेऊन एक प्रकारे सामाजिक सस्कारच त्यानी घडविला. राजकारणी मंडळीची उणीव भासत नाही. दुर्गादेवी प्रकल्प, रस्तारुंदीची कामे, रस्त्यावरील दिवे, झोपडपट्टी सुधारणा, पाणीपुरवठ्याची स्वतंत्र योजना, प्रशासकीय इमारती नवीन भागातील सुधारणा ही महानगरपालिका त्यानतरची जमेची बाजू असून सर्वांना मान्य होईल असे एखादे काम कदाचित झाले नसेल; पण ते त्यांचे अपयश नव्हे. न झालेल्या कामापैकी महत्त्वाचे काम म्हणजे 'ड्रेनेज'ची व्यवस्था अद्यापही बदच आहे.'

मधुसुदन जोशी येथील सांस्कृतिक जीवनासंबंधी बोलताना म्हणाले– 'सास्कृतिक जीवनावर छाप पडेल असे विशेष काही इथं घडत नसले तरी आता सामाजिक सस्था या मूळ धरू लागल्यात वेगवेगळे उपक्रम, व्याख्यानमाला, रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, साहित्यिक गप्पाचे कार्यक्रम या ठिकाणी होत असतात. सगीत महोत्सव होत असतात. राजकीय क्षेत्रातील अस्थिरता-गोधळ सोडल्यास सामान्य माणसाला आता स्थिरता लाभू लागली आहे. निवडणुकाच्या बाबतीत माझे असे मत बनले आहे की, लोकसभा, विधानसभा आणि जिल्हापरिषदांच्याच फक्त निवडणुका घ्याव्यात. नगरपालिका, ग्रामपंचायती सारख्या सस्थातून ज्या प्रकारे निवडणुका होतात, वेळ आणि सामान्य माणसाचा पैसा खर्च होतो ते पहाता, या ठिकाणी निवडणूका असू नयेत. त्यातुन नवीन वैरच निर्माण होते. आणि विकास बाजूलाच रहातो. दिखावू कामाकडे कार्यकर्त्यांचा कल असतो. प्रशासकच असावा. लोकप्रतिनिधीच्या तुलनेने जरी काम कमी झाले तरी जे होईल ते निश्चित, उत्तम आणि कमी गोंधळात कमी भ्रष्टाचारात होईल.

मधुसूदन जोशी यांच्या विचारांमधून येथील सुशिक्षित, विचारी, सामान्य नागरिकाचेच विचार व्यक्त होत होते.

## समस्या...समस्या...! ... जबाबदारी कुणाची ?

११ ऑक्टोबर १९८२ ला महानगरपालिका अस्तित्वात आली आणि श्री. हरनामसिंग हे प्रशासक म्हणून काम पाहू लागले. गेल्या अडीच तीन वर्षात महानगरपालिकेच्या संबंधी झालेल्या बदलासंबधी नागरिकांतील विविध थरातील लोकांची काय मते आहेत हे पाहिल्यावर एक प्रश्न उभा राहतो तो म्हणजे–

महानगरपालिका अस्तित्वात आल्याने हे महानगर झाले का...? महानगर समजून येथील अडचणीकडे येथील अधिकारी-सामाजिक कार्यकर्ते पहातात का ? त्याच्या सोडवणुकीमागे हे माझे नगर मी या नगराचा अशी भावना आहे का ? येथील नागरिकात असा एकात्म भाव निर्माण झाला आहे का ?...

आज पिंपरी-चिंचवडचे जे दर्शन आपल्याला घडते, वरील सभाषणांमधून आपल्याला जे पिंपरी-चिंचवडचे मन समजले त्यावरून अजून तशी भावना प्रकर्षाने जाणवत नाही. याचे कारण पिंपरी चिंचवड हे औद्योगिक शहर आहे नव्या मूल्यावर आधारित येथील सस्कृती आकारास येत आहे. येथे प्रत्येकजण स्वत:च्या हक्कांसाठी भांडताना दिसतो. झोपडपट्टीतले रहिवासी, नागरिक, कारखानदार सस्थामधून काम करणारे कार्यकर्ते हे सर्वचजण महानगरपालिकेकडून शासनाकडून सतत कशाची ना कशाची तरी मागणी करताना दिसतात काही संस्था काही अपवादात्मक व्यक्ती देवसस्थानसारखे सस्थान स्वत हून कार्य करीत आहेत. विकासास हातभार लावीत आहेत. जसजसा यात एकजिनसीपणा येईल तसतशी या विस्काळित महानगरातली 'महानगरीय सस्कृती' आकाराला येईल.

आज या ठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाण वाढू लागले आहे. झोपडपट्ट्यातून दारूचे व्यवसाय, वेश्या व्यवसायाचे प्रमाण वाढीस लागले आहे. पोलिस यत्रणा आणि संख्या जुनीच आहे. लोकसख्येच्या प्रमाणात त्यात आवश्यक ती वाढ झाली नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवड हे महानगरपालिका होऊनही महानगर वाटत नाही. प्रशासकीय कारकिर्दीत बेकायदा बाधकामे वाढलीत ही बाब गंभीर आहे. ज्या प्रमाणे रस्तारुंदी-वीज-पाणी, वृक्षारोपण याकडे लक्ष दिले गेले त्याचप्रमाणे, शिक्षण आणि अनधिकृत बांधकामे याकडे लक्ष द्यायला हवे. शिक्षणाकडील हेळसांड हे पण एका प्रकारचे प्रदूषणच आहे. जसे वृक्षारोपणाचे महत्त्व वीस एक वर्षांनी समजेल त्याचप्रमाणे शिक्षणाचे आहे. त्याकडे वेळीच लक्ष देणे आवश्यक आहे.

□

# भोपाळ दुर्घटना

## 'न्यूयॉर्क टाइम्स'चा अहवाल काय सांगतो ?

अलिकडेच भोपाळ दुर्घटनेसंबंधी 'इंटरनॅशनल हेराल्ड ट्रिब्युन' या वृत्तपत्रात आलेले काही लेख वाचण्यात आले. या लेखांत दुर्घटनेस जबाबदार कोण व कसे; सरकार किती प्रमाणात दोषी आहे अशा प्रश्नांना उत्तरे शोधण्याच्या अनुषगाने अनेक मूलभूत प्रश्न माडले आहेत. सरकारी शास्त्रज्ञ, कंपनीचे आजी, माजी कर्मचारी व तंत्रज्ञ व काही तज्ज्ञ यांची मते वाचायला मिळाली. कंपनीच्या अधिकृत वक्तव्यांचा उल्लेख आहेच शिवाय परदेशी तज्ज्ञांची भूमिकाही कळली. अशा समस्या गुंतागुतीच्या असतातच, पण गुतागुंत कमी करण्याऐवजी तिचा फायदा घेऊन वैचारिक गोंधळ माजवण्याचा तर प्रयत्न होत नाही ना अशी शका हे सर्व वाचल्यावर मनात येते.

### 'न्यूयॉर्क टाइम्स' चा अहवाल

'न्यूयॉर्क टाइम्स' चा सात आठवड्यांच्या चौकशीअंती आलेला अहवाल स्पष्टपणे म्हणतो की, सध्याचे व पूर्वीचे कंपनीचे कर्मचारी, कंपनीची कागदपत्रे व भारताचे प्रमुख शास्त्रज्ञ श्री. वरदराजन या सर्वांच्या मते प्रक्रिया हाताळण्यातील चुका ( operating erors ) सदोष डिझाईन (design flaws), अपुरी देखभाल (maintenance failures), व अप्रशिक्षित कर्मचारी (training deficiencies ) एकत्रितपणे अपघातास कारण आहेत. कमीतकमी दहा ठिकाणी प्रमाणित पद्धतीचे उल्लघन केले गेले असे आढळून आले. त्याची काही उदाहरणे–

१) मिथाईल आयसोसायनेट ( एमआयसी) वायूस थंड ठेवण्यासाठी नियोजलेले रेफ्रिजरेशन युनिट बद होते; कारण ते चालवणे कंपनीस 'अनावश्यक' वाटले.

२) तीन सुरक्षा यत्रणांपैकी एक नादुरुस्त, तर दुसरीची देखभाल गेले अनेक आठवडे होत नव्हती.

३) मिथाईल आयसोसायनेट साठवण्यास एक जादा टाकी आहे, ती रिकामी असायला हवी, ती नव्हती.

४) दाबमापकादी यंत्रे विश्वासार्ह नव्हती.

याखेरीज कर्मचाऱ्यांच्या सख्येत ५०% कपात, आवश्यक पात्रतेपेक्षा कमी पात्रतेचे कर्मचारी नियुक्त करणे ही कारणे आहेतच.

कंपनीने यासबंधी काहीही सांगायला अर्थातच नकार दिला. कंपनीने हे सर्व मान्य करणे अपेक्षित नाही पण कंपनीच्या अधिकृत वक्तव्यावरून आपणाच तथ्य कितपत आहे हे अजमावू शकतो. युनियन कार्बाइडचे वरिष्ठ अधिकारी श्री. गोखले यानी कंपनीच्या खर्चात कपात करण्याच्या मोहिमेचे 'अनावश्यक व वाया जाणारे खर्च टाळण्याचा प्रयत्न' असे वर्णन केले. खर्चाकडे इतक्या काटेकोर पहाणारी कंपनी 'अनावश्यक' असे रेफ्रिजरेशन युनिट बांधणे शक्य आहे का ? हे युनिट चालू असते तर अपघातक्षणी झालेली क्रिया होण्याचा वेग खूप मंदावला असता व धोका टाळण्यास दोन दिवस इतका पुरेसा वेळ मिळाला असता असे कपनीच्या वरिष्ठाचेच म्हणणे आहे. असे असूनही हे युनिट चालविण्याचा खर्च 'अनावश्यक' समजला जावा का ?

मिथाईल आयसोसायनेट वायूच्या साठ्याबाबतही कपनीचे अधिकृत वक्तव्यच प्रमाणित साठ्याहून अधिक प्रमाणात वायू असल्याचे दाखवते. एकूण साठा ९,००० गॅलन इतकाच हवा होता. कंपनीचा प्रवक्ता ११,००० गॅलन वायू असल्याचे म्हणतो; प्रत्यक्षात १३,००० गॅलन वायू आढळला ते वेगळेच कंपनीच्याच सशोधन पथकास टाकीत पाच दूषितेही आढळली.

### काही मूलभूत मुद्दे

या पार्श्वभूमीवर उभे केले जात असलेले मुद्दे पहाण्यासारखे आहेत. ते असे–

१) विकसनशील देशात धोकादायक उत्पादनप्रक्रिया पुष्कळदा अधिकच धोका उभा करतात. कारण कुशल कामगार उपलब्ध नसतात. लोकांमध्ये अज्ञानही अधिक असते.

२) तांत्रिक इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध नाही ही बाब महत्त्वाची आहे.

३) कर्मचाऱ्याना विशेष प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

४) अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा; ज्या औद्योगिक जगात वापरल्या जातात; त्यांचीही गरज आहे. कारण कर्मचारी अकुशल आहेत.

या सर्व मुद्यांशी कोणीही सहमत होईल पण त्यातून असे सुचविले जात असेल की कुशल कामगार, इन्फ्रास्ट्रक्चर, अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा इत्यादींचा अभाव ही वस्तुस्थिती भोपाळ दुर्घटनेनतरच बहुराष्ट्रीय कपन्याच्या ध्यानात आली तर ते मान्य करणे चूक ठरेल. थोडा विचार केल्यावर लक्षात येईल की ही वस्तुस्थिती बहुराष्ट्रीय कंपन्यांना पुरेपूर माहीत होती. पण त्यांना त्यात समस्या, अडचणी, संभाव्य धोके न दिसता उत्पादनमूल्य कमी करण्यास उपयुक्त अशा सवलतीच आढळल्या. अकुशल श्रम म्हणून मूल्य कमी, अज्ञानी कर्मचारी तेव्हा त्याना सुखसोयी कमी दिल्या तरी तक्रार नाही, समाजात जागरूकता कमी तेव्हा काहीही केले तरी विरोध होण्याची शक्यता कमी अशी परिस्थिती फक्त आर्थिक फायदा पाहणाऱ्या बहुराष्ट्रीय कपन्याना उत्साहित करते. शिवाय उच्च प्रतीचे तांत्रिक ज्ञान देण्याच्या नावाखाली सरकारकडून जवळजवळ हक्काने मिळविलेल्या सवलती आहेतच. हे सर्व 'डोळसपणे पाहूनच' बहुराष्ट्रीय कपन्या औद्योगिक जगातील 'जाचक' बंधने टाळण्यासाठी विकसनशील देशात येतात ही वस्तुस्थिती आहे. पण आता चित्र असे रंगवले जात आहे की कठीण समस्या असतानाही बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशात कामे करतात, परकीय गुंतवणूक मिळवून देतात, नोकऱ्या निर्माण करतात, त्या त्या देशांना अत्यावश्यक असलेले उत्पादन करतात; तेव्हा त्या कंपन्याविरुद्ध एक उणा शब्द काढणेही न्याय्य नाही. दुर्दैवाने आपल्या देशातील काही तज्ज्ञही हीच भावना व्यक्त करतात, तेव्हा परकीयांनी एक पाऊल पुढे टाकले तर आश्चर्य ते काय ? भोपाळ दुर्घटनेनंतर त्यापैकी काहीनी स्पष्ट म्हटले–

'युनियन कार्बाईड भारतात नसतीच तर अपघाताने मरण्यासाठी लोक जिवतच राहिले नसते; भूक व दुष्काळ यानी त्याचा बळी केव्हाच घेतला असता. तेव्हा अन्यथा भूक-बळी ठरले असते असे किती जीव युनियन कार्बाईडने वाचवले हे पाहा!' या तर्कदुष्ट विधानापुढे मान डोलावली तर उद्या असेही म्हटले जाईल की भारतापुढे लोकसंख्येचा किती गंभीर प्रश्न आहे, तो सोडविण्यास युनियन कार्बाईडने मदत केली आहे, त्याचे थोर उपकारच आहेत!

## महत्त्वाचा धडा

आताच वर्णन केल्याप्रमाणे कुशल कामगार, अत्याधुनिक सुरक्षा यत्रणा इत्यादीचा अभाव या व अशा अनेक समस्या असताना मुळातच विकसनशील देशांनी उच्च तांत्रिक ज्ञानाची गरज असलेल्या, धोकादायक ठरू शकतील अशा प्रक्रिया त्यांच्या देशात हाताळाव्यात की नाही हाही चर्चेचा विषय ठरला आहे. विकसनशील राष्ट्राच्या सरकाराना असे सुचविण्यात येत आहे की त्यानी आगामी अनेक वर्षे सुरक्षितपणे हाताळता येईल असेच तंत्रज्ञान त्याच्या देशात येऊ द्यावे.'

'आम्ही तुम्हाला किती जपतो', 'तुमच्याच भल्यासाठी सांगतोय' या विकसित राष्ट्राच्या भलेपणाच्या आत विकसित व विकसनशील जगातील तफावत कायम राखण्याचाच हेतू लपला आहे. एकदा का तफावत कायम राहिली की उत्पादित माल भरमसाठ दराने विकण्यात काहीच अडचण राहत नाही. आपल्या देशांत इतक्या बहुराष्ट्रीय कंपन्यानी उत्पादन केले पण तंत्रज्ञान आपणास दिले नाही याचे कारण तफावत कायम ठेवणे हेच आहे.

आपल्या देशात अनेकांना वाटते की आपल्याला साध्या तंत्रज्ञानाची व ते तंत्रज्ञान सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे, सबब अत्याधुनिक तंत्रज्ञान वा प्रक्रिया नकोतच. सर्वांनीच असा विचार करून आधुनिक तंत्रज्ञान नाकारले तर गोष्ट वेगळी पण आपली क्षमता नाही म्हणून वा विकसित देशाने 'तुमचं काम नव्हे' म्हणून ते नाकारणं यात अतर आहे. एखादी प्रक्रिया धोकादायक म्हणून नाकारावी पण त्याच प्रक्रियेने निर्माण केलेली उत्पादने आयात करावी हे तर अजिबात पटण्यासारखे नाही. आपला परकीय चलनाचा साठा नेहमीच तुटपुंजा असतो; तेव्हा ते परवडणारेही नाही.

कोणत्याही कारखान्यात तेथे होणाऱ्या प्रक्रियेतील अपघाताकडे पाहिले तर असे लक्षात येईल की, बहुसख्य अपघात 'निष्काळजीपणा', 'दुर्लक्ष' वा 'अज्ञान' यामुळे होतात. सुरक्षा नियमाकडे दुर्लक्ष करावयाचे, बेफिकीरपणे काम करावयाचे व अपघात झाले की प्रक्रियाच धोकादायक म्हणायची हे निव्वळ ढोंग आहे. अज्ञानी म्हणून प्रयत्नच केला नाही तर आपल्याला कधीच ज्ञान मिळणार नाही. विकसित देशात आता अपघात कमी आहेत; पण एकेकाळी तेही विकासाच्या प्रक्रियेत होते. त्या काळात त्यांना ज्या अपघाताना तोड द्यावे लागले, ज्या समस्या त्याना आल्या व त्यानी सोडवल्या वा अधिक गुतागुतीच्या केल्या या सर्वांपासून आपण काही शिकणे जास्त महत्त्वाचे आहे.

## सरकारची भूमिका

या दुर्घटनेसबधी सरकार कितपत दोषी या संबधातही काही नमूद केले पाहिजे. सर्व सरकारी सस्था, ज्यांनी नियत्रण करावयाचे, त्या सर्वांनी व्यवस्थित काम केले, कर्मचारी सचोटीने वागले, अशा आदर्श परिस्थितीतही सर्व कारखान्यावर प्रभावी नियंत्रण ठेवता येणे कितपत शक्य होईल याची शंकाच वाटते. अपुरी साधनसामुग्री, अपुरे मनुष्यबळ ही कारणे आहेतच. शिवाय विविध क्षेत्रातील विविध प्रक्रियांमध्ये इतक्या वेगाने वाढ होत आहे की त्यावर नियत्रण ठेवणे, त्यात लपलेले धोके हेरणे शक्य होत नाही. इतक्या वेगाने विविध रासायनिक द्रव्ये निर्माण केली जात आहेत की त्यातील हानीकारक कोणती व कशी याचा अभ्यास शक्य होत नाही. अमेरिकेसारख्या विकसित देशातही सध्या वापरात असलेल्या रासायनिक द्रव्यांपैकी फक्त २०% द्रव्यांचा अभ्यास करणे जमले आहे.

फक्त नियम कडक करून वा नवेनवे नियम करून काही साध्य होते का ह्याचाही विचार व्हायला हवा. अमेरिकेत पर्यावरण-संरक्षणाची लाट आली व 'पर्यावरण संरक्षण समिती' ने दूषिते टाकण्यासबधी अनेक कडक नियम केले. परिणामत: अनेक अनधिकृत जागा ही दूषिते टाकण्यासाठी वापरल्या गेल्या. पूर्वी निदान अभ्यासूना दूषिते कोठे व किती प्रमाणात टाकली जात आहेत याची माहिती असे आता तीही नाही.

एकूणच नियंत्रण पद्धतीत मला नवा मार्ग वापरावासा वाटतो. प्रदूषण करणाऱ्या कारखान्यास दोषी सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादीवर असते. त्यासाठी दूषिते त्याच कंपनीतून आलीत व त्यानीच हानी होते आहे हे सिद्ध करावे लागते. कंपन्याना हे माहीत आहे की असे सिद्ध करणे अतिशय कठीण आहे व म्हणूनच त्या बेफिकीर राहू शकतात. यात आमूलाग्र बदल करावा व 'निर्दोषी' सिद्ध करणे ही प्रदूषण खटल्यातील आरोपींवर टाकावी अशी जबाबदारी अगावर आल्यावर सर्वच कंपन्या काळजी घेतील, सावध राहतील. त्या कंपन्याना फक्त त्याचीच प्रक्रिया नीट अभ्यासायची असल्याने ते शक्यही होईल. त्यांच्या स्वतःच्या प्रक्रियेसंबंधी व उत्पादनांविषयी अधिक ज्ञान त्यांना असावे ही अपेक्षा रास्तही आहे.

प्रदूषणाचा दुष्परिणाम अनेकांवर होतो. अशा दुष्परिणाम भोगणाऱ्या लोकाना एकत्रित लढा देण्यासही यामुळे उत्तेजन मिळेल. लोकाची चळवळच सरकारी नियमापेक्षा परिणामकारक ठरते, वेळप्रसंगी सरकार-विरूद्धही. याबाबत नुकतीच ऐकलेली बातमी— स्कॉटलंडमध्ये युनियन कार्बाईडला कारखाना उभारण्याची परवानगी नाकारली गेली. सरकार परवानगी देण्यास तयार होते पण लोकानी आंदोलन करून यश मिळविले— नक्कीच आश्वासक आहे!

— प्रमोद कऱ्हाडकर

(पर्यावरण अभियंता, आयआयटी)

### संदर्भ

१) इंटरनॅशनल हेराल्ड ट्रिब्युन (पॅरिस आवृत्ती)
६ डिसेंबर १९८४,
२९ जानेवारी व १, ४ फेब्रु. १९८५
२) न्यूजवीक, १७ डिसेंबर १९८४
३) इंडिया टूडे, ३१ डिसेंबर १९८४

पुस्तके

# द्रौपदीच्या व्यक्तिमत्त्वातले सर्व पैलू जाणवतात हे याकादंबरीचे यश आहे

वि. ग. कानिटकर

आपल्या कथाकादंबरीतून मराठवाड्यातील महायुद्धपूर्व जीवनाचे समर्थपणे चित्रण करणारे लेखक म्हणून, वि. शं. पारगावकर यांचा वाचकांना परिचय आहे. मराठी साहित्यातील कथा–कादंबऱ्यातून, मुंबई-पुणे या परिसरातील मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण अनेक वर्षे वाचकांना भेटत आलेले असले, तरी, इतक्या विपुलतेने वऱ्हाड–मराठवाड्यातील जीवन सामोरे येत नसे. श्री. माडखोलकर, वामनराव चोरघडे, पु. भा. भावे, शांताराम अशा लेखकांनी वऱ्हाडी वातावरणाला उजाळा दिला; परंतु मराठवाडा, खूप वर्षे वाचकांना 'पारोसा'च राहिला. मराठवाड्यातून पुढे आलेल्या प्रमुख लेखकांपैकी वि. शं. पारगावकर हे एक.

लेखक हा भारतीय संस्कृतीचा नकळत का होईना अभ्यासक असतोच आणि म्हणूनच केव्हा ना केव्हा तरी भारतीयांच्या मनावर हजारो वर्षे अधिराज्य चालवणाऱ्या महाभारतासारख्या कलाकृतीकडे, तो हमखास वळतोच. श्री. पारगावकर यांनाही ते टाळता आले नाही 'अयोनिजा' ही त्यांनी लिहिलेली द्रौपदीच्या जीवनावरील अलिकडील कादंबरी. महाभारतावर कसेही; परंतु रसभरीत लिहिले तर वाचकांना ते आवडते व खपते असा कोणताही हिशोब लेखकाच्या मनात संभवत नाही, कारण लोकप्रियतेचे आडाखे बांधून लेखन करण्याचे श्री पारगावकरांनी आतापर्यंत कटाक्षाने टाळलेलेच आहे. दृष्टिकोन काहीही असला तरी द्रौपदीच्या बहुचर्चित जीवनावर कादंबरी लिहिणे हेच मुळात एक साहस आहे आणि कोणत्याही साहसाबद्दल जी उत्सुकता मनात निर्माण होते, तशी ही कादंबरीही निर्माण करते. या मागचा आपला हेतू स्पष्ट करताना प्रस्तावनेतच लेखकाने म्हटले आहे–

'द्रौपदीच्या जीवनाला असे अनेक पैलू आहेत की ज्याचा कोणालाही मोह पडावा. त्या जीवनाचे यथाशक्ती दर्शन घडवावे, हा ही कादंबरी लिहिण्यामागचा माझा एक उद्देश आहे.'

प्रस्तावनेत लेखकाने असेही निर्देशित केले आहे, की महाभारतात ज्या प्रमुख व्यक्ती आहेत, त्यांना स्वतंत्र जीवनच नाही. प्रत्येकाची जीवने एकमेकात इतकी मिसळून गेली आहेत की, त्यामधील एखाद्या जीवनाचा स्वतंत्र आलेख काढणे ही केवळ अशक्य गोष्ट आहे. लेखकाने असे का म्हणावे? वस्तुतः कादंबरी ही अनेकांची जीवने परस्परात मिसळून टाकण्याचा वाङ्मयप्रकार आहे. हे परस्परांचे आत्मार्पण जेवढे अर्थपूर्ण, जेवढे गुंतागुंतीचे, तेवढे ह्या कादंबरीचे मूल्य वाढण्याची शक्यता नाही का? मला वाटते लेखकाचा आपले हृद्गत सांगताना गोंधळ उडालेला आहे. आपल्या देशात एवढे नटसम्राट आणि एवढे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सिनेमा निर्माते आणि दिग्दर्शक असताना, महाभारतावर चित्रपट निघू शकलेला नाही. सत्यजित रे याची ती महत्त्वाकांक्षा होती; परंतु त्यांनी ती सोडून दिलेली आहे. खरी अडचण ही आहे की कोणत्याही प्रकारच्या साहित्यिक व्यवहारी चौकटीत सामावू शकेल असा महाभारत हा ग्रंथ नाही. रोखठोक सांगायचे तर या विस्तीर्ण ओबड धोबड नीतीकथेत, ललितरम्य भाग अतिशय थोडा आहे. इतिहासात जेवढे लालित्य आणता येते, तितपतच यात आहे. कारण मूलतः 'महाभारत' हा इतिहास आहे. कौरव–पांडवांच्या राजकारणाचा, धर्मशास्त्राचा, तत्त्वज्ञानाचा; परंतु तो इतिहास वाचकांना घट्ट धरून ठेवतो की ज्यात आयुष्यातली शोकात्मकता सतत प्रत्ययाला येते. करुणरसाचा अखंड शिडकावा या इतिहासात आहे आणि व्यासांची थोरवी अशी की, शोकांतिका वाचून मनावर चढणारा वैफल्याच्या गंजही महाभारत वाचून अनुभवाला येत नाही. महाभारत सर्वांना आवडते, कारण आंग्ल कवीने म्हटल्याप्रमाणे– 'Our sweetest songs are those that tell us our saddest thoughts'. आता असे हे जबरदस्त रसायन, केवळ द्रौपदीच्या जीवनाला प्राधान्य देऊन दीडशे–दोनशे पानाच्या कादंबरीच्या व्यावहारिक चौकटीत बसवणे मोठे कठीण आहे, असे काहीतरी लेखकाला म्हणावयाचे असावे.

लेखकाने-द्रौपदीची कथा विकसित करण्यासाठी महाभारतातील जी अष्टदले निवडली आहेत, ती म्हणजे (१) लाक्षागृहाचा प्रसंग (२) द्रौपदी स्वयंवर (३) अर्जुनाचा वनवास (४) मयसभा व द्यूत प्रसंग (५) कीचक वध (६) कृष्णशिष्टाई व भारतीय युद्ध (७) यादवांचा अंत (८) पांडवांच्या महानिर्वाणापूर्वीचा द्रौपदीचा मृत्यू. हे प्रसंग महाभारतात जसे येतात, तसेच ते आपल्या शब्दात कादंबरीकाराने रंगवले आहेत. फक्त द्यूतानंतर कृष्ण, कौरवांच्या दरबारात, द्रौपदीला विवस्त्र केले जात असता वस्त्रे पुरवतो, हा प्रसंग लेखकाने टाळला आहे. एका वस्त्राआत सतत वस्त्रे निघत रहाणे हा 'चमत्कार' असल्याने द्रौपदीच्या वास्तव चित्रणात त्याला स्थान नसावे. हा लेखकाचा निर्णय चांगला म्हणायला हवा. कारण वस्त्रहरण प्रसंगाच्या चित्रणाच्या परिणामात यामुळे कसलाही विक्षेप त्यामुळे निर्माण झालेला वाचकांना जाणवत नाही.

द्रौपदीच्या जीवनाचा आलेख काढण्यासाठी ज्या आठ कथा घटनांचा वापर कादंबरीकाराने केला आहे तो करताना, कादंबरीकार म्हणून लेखकाने आपल्या प्रतिमेचा कोणताही नवा धुमारा प्रगट केलेला नाही. मला स्वतःला ही गोष्ट निराशाजनक वाटली. लाक्षागृहात ज्या एका निष्पाप स्त्रीला व तिच्या पाची मुलांना पांडवांनी हेतूतः कोंडून जाळले, त्या स्त्रीचा कोणी नातेवाईक या घटनेने चिडून पांडवांच्या घातासाठी प्रयत्नशील होणे शक्य होते. या सूडाने पेटलेल्या व्यक्तीचा उपयोग कादंबरीत चपखल बसू

*शकला नसता का ? द्रौपदी व कृष्ण याचा* कसलाही सहवासोत्तर सबंध द्रौपदीच्या विवाहपूर्व काळात आलेला आढळत नाही. मूळ महाभारतच याबद्दल मूग गिळून आहे. तिच्या स्वयंवराला तो एक प्रेक्षक म्हणून आला होता की एक स्पर्धक म्हणून ? द्रौपदीचा पाडवांशी विवाह झाल्यानंतर वस्त्रहरणप्रसंगापर्यंत उभयतांचा सबध आलेला नाही. परतु कादबरीकाराने मुळात वस्त्रहरणाच्या वेळी कृष्णसखा वस्त्रे पुरवतो या प्रसगालाच काट मारल्याने, कादंबरीत कृष्ण हा द्यूतप्रसंगी देखील सहाय्याला आल्याचे दाखवलेले नाही. लेखक असे न करता तर द्रौपदीची अब्रू घेतली जात असताना कृष्ण काय करीत होता हा प्रश्न लेखकाला पडला असता. तेव्हा 'कादबरीच्या वास्तवात' वस्त्रहरण प्रसगी द्रौपदीला आठवण होत नाही. लाक्षागृहातून निसटल्यानंतर ब्राह्मण वेषात पांडव भिक्षा मागून रहात असताना स्वयंवरात त्यांना द्रौपदीची प्राप्ती होते. ती पाडवांची पत्नी होते. त्या वेळी कृष्ण पाडवाच्या भेटीला येतो असा एक प्रसग कादबरीकाराने दाखवला आहे. त्यावेळी तो एकटा नसतो तर बरोबर बलरामही आहे. कुतीबरोबर दोघांच्या पुष्कळ वेळ गप्पा झाल्याचे सांगितलेले आहे. परतु या प्रसंगातही कृष्ण व द्रौपदी याचे सभाषण झाल्याचे दाखवलेले नाही.

दोघाचे संभाषण घडते ते कृष्ण हा इंद्रप्रस्थाला भेट देतो. कृष्ण त्यावेळी म्हणतो,

'द्रौपदी तू एकटी नाहीस. तू द्रुपदाची कन्या, पाच पांडवांची भार्या, कुरुकुलाची महाराणी, कुंतीची लाडकी सून व माझी सखी नाही का ?'

हाच उभयताचा सभाषणाचा अगदी पहिलाच प्रसंग. कृष्ण हा नात्याने, द्रौपदीचा क्षीर आहे. असे असताना या दीराशी द्रौपदीची इतकी आंतरिक सलगी कसकशी निर्माण होत गेली याबाबत व्यास काही सांगत नसले तरी द्रौपदीच्या जीवनावरील कादंबरीत, लेखकानेही मुग्धता का पाळावी? *कादंबरीकाराच्या प्रतिभेला व निर्मिती क्षमतेला* हे मोठे आव्हान होते, ते लेखकाने पत्करलेलेच नाही. हे आव्हान स्वीकारण्यात धोका होता. परंतु हे आव्हान पेलण्यातले अपयशही कदाचित कादंबरीचे काही प्रमा*णात यश ठरण्याची शक्यता होती. कारण* जिथे इतिहास मुग्ध असतो, तिथेच ललित लेखकाला काही वाव असतो.

या कादबरीची जाणवलेली ही मर्यादा एकदा स्पष्ट केल्यानतर, प्रिया, सौंदर्यवती, पतिव्रता आणि पडिता या द्रौपदीच्या सर्व भूमिका महाभारतातल्या चौकटीतच, लेखकाने निर्देशिलेल्या आठ प्रसगातून चित्रित केल्या आहेत. द्रौपदीला सीता अथवा सावित्रीप्रमाणे संस्कारक्षमतेचे बल व्यासानी दिलेले नाही. ती तेजस्विनी आहे. मानिनी आहे धर्मचर्चेत प्रवीण आहे. घोर अपमानित अवस्थेतही ती सहजोद्गार काढते,

'जिच्यात वृद्ध बसलेले नाहीत ती सभा नव्हे. ज्यांना धर्म सागता येत नाही ते वृद्ध नव्हेत. ज्याच्यात सत्य नाही तो धर्म नव्हे. ज्याच्यात कपट आहे ते सत्य नव्हे.'

कोणा पुरुषाला जवळ करावा, कोणाला दूर लोटावा हे ती स्वतःच्या बुद्धीने ठरवते. कर्णाला ती त्वरित झिडकारते या अर्थाने ती स्वतंत्र वृत्तीची, विचारी आहे. परंतु पाडवाची पत्नी म्हणून दुःखाचे कढ अनुभवणेच तिच्या नशिबी आलेले आहे. द्रौपदीच्या, व्यक्तिमत्त्वातले हे सर्व पैलू कादंबरी वाचतानाही जाणवतात, हे या कादंबरीचे यश आहे. ज्या उद्देशाने आपण या लेखनाकडे वळलो असे कादंबरीकार सुरुवातीच्या निवेदनात सांगतो, तो एकच उद्देश सफल झालेला आहे. ☐

अयोनिजा
वि. श. पारगावकर
प्रतिमा प्रकाशन
मूल्य चाळीस रुपये.

---

## चक्र गुंतले चक्रात

---

संसार हे मोठे चक्र आहे. त्यात आई, वडील, पत्नी, मुलं, भाऊ, भावजय, मित्र, मैत्रिणी ही लहानमोठी चक्रं एकमेकात *गुंतलेली आहेत.* चक्रातील ज्या मोठ्या अगर लहान, मधल्या अशा दांड्याला अगर पट्ट्याला जी प्रेरणा—गती मिळते (त्याला आपण नियती म्हणू) तो दांडा म्हणजे या कादंबरीतला नायक (विजय). त्याच्या बऱ्या-वाईट वागणुकीमुळे इतर चक्रे (पात्रे) त्याच्याभोवती फिरत राहतात. ही मध्यवर्ती कल्पना धरून लेखकाने या कादंबरीचे शीर्षक दिले असावे. याच अनुरोधाने कादंबरीतील पात्रे, प्रसग यांची गुफण केलेली दिसते.

कै. राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला' नाटकातील सुधाकर व सिंधू यांच्या जवळपास येणारी या कादंबरीतील दोन मुख्य पात्रे म्हणजे नायक विजय व त्याची पत्नी माधवी. सुधाकराप्रमाणे विजय प्रथम सुखवस्तू, हुशार, शिकलेला, (सुधाकर-वकील, येथे विजय मेकॅनिकल इंजिनियर फर्स्टक्लास फर्स्ट) मानी, अहकारी (प्रेमभगामुळे) व्यसनात गुरफटलेला—त्यातून सुटका नाही इतका गुतलेला असा एकच प्यालातील सिंधू शिकलेली नव्हती. पण येथे माधवी एम. कॉम.पर्यंत शिकलेली. तरीही (दुर्व्यसनी) पतीला (जोरदार) विरोध न करणारी आणि परिस्थितीशी मुकाट्याने झगडत सहन करणारी, त्याच्या दुर्गुणांबद्दल चीड न येणारी तर उलट समजावण्याच्या भावनेने त्याच्याकडे पाहणारी, प्रेमळ दाखविली आहे. अशा स्त्रिया (सुशिक्षित, विचारी असूनसुद्धा) आजच्या काळात दिसतील का ? शका आहे. असो. माधवीला महाप्रयासाने एक जुजबी नोकरी मिळते. पण असा नवरा, अशी परिस्थिती यांच्याशी झगडत मोठ्या धैर्याने ती शेवटपर्यंत जाते आहे असेही ठळकपणे दाखविलेले नाही.

विजयचा जिवलग मित्र महेश — हा एकातात विजयचा विचार करीत बसलेला असताना विजयच्या पूर्व आयुष्यापासून सुरुवात झालेला विजयसबंधीचा विचार-प्रवाह—फ्लॅशबॅकचे तत्र वापरून कादंबरीत आणलेला प्रकार आणि तोसुद्धा कादंबरीची पन्नास पाने झाल्यानंतरच हे आढळते. त्यामुळे सलगता, सुसंगतपणाचा अभाव भासतो.

या कादबरीतील लेखकाने दिलेले जीवन-विषयक तत्त्वज्ञान त्याच्याच शब्दात देण्याचा मोह होतो. पण विस्तारभयाने ते देणे शक्य वाटत नाही. मात्र जे वाचक हे कादबरी वाचतील त्यांनी प्रकरण १३–पृ. १७३ (सुरवात) व प्रकरण १४–पृ. १८८ (सुरवात) वाचावे म्हणजे कादंबरीतील मध्यवर्ती कल्पना कळेल.

व्यक्ती, त्याची प्रकृती, त्याची परिस्थिती आणि त्याची नियतीही त्याला खेळवत असते. *अमूक एक व्यक्ती अशी का याचे* उत्तर शोधणे कठीण. अशी व्यक्तिदर्शने अनादीकालापासून (रामायण, महाभारत, शेक्सपियर, कालीदास, खाडिलकर, गडकरी याच्या वाङमयातून) आपणाला दिसतात. त्यामुळे कादंबरीकाराने नवीन काही दाखविले आहे असे आढळत नाही. पण त्याची गुंफण कशी आहे याचा विचार करता कादंबरी मामुली वाटते. कारण पात्राचे स्वभाववर्णन, प्रसंग याची पुनरुक्ती झालेली आहे. विजयच्या भोवती फार पात्रे आहेत; *पण त्याच्या स्वभाव* रेखाटनावरून *त्याच्या*-संबंधी काही लक्षात राहील असे वाटत नाही. अपवाद फक्त महेश या पात्राचा.

कादंबरीचा शेवट शोकांत होणार याचे भान चाणाक्ष वाचकाला केव्हाच कळून चुकते. कथेला कलाटणी देणे वगैरे लेखकाने काही केले नाही. सरळ धोपटमार्गाने लिहिलेली वाटते. त्यामुळे कादंबरीला एकसुरीपणा आलेला आहे. मात्र स्थळे, प्रसंग याची वर्णने जिवंत वाटतात.

लेखक जन्माने महाराष्ट्रियन मुस्लीम असला ( चाकण–महाराष्ट्र ) तरी मराठी भाषा आणि मराठी वाङमय याच्याशी चांगलाच परिचित आहे. इतकेच नव्हे तर तो रसिक आहे त्यांनी एक–दोन नाटके लिहिली आहेत व नव्या कादंबरीची जुळवाजुळव त्यानी केली आहे, असे मनोगतात लिहितात. पण ती नाटके अगर कादंबरी केव्हा प्रकाशित झाली का ? त्याची नावे काय ? हे लिहिलेले नाही. त्याची ही पहिलीच कादबरी असेल तर त्यांनी निराश होण्याचे कारण नाही. त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल राहील.

—वसंत फाटक

लेखक : महंमद नैसर्गी
प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे : ४ + २३७
किंमत : पंचवीस रुपये.

## महत्त्वाकांक्षेची बळी

कुठली न कुठली महत्त्वाकांक्षा माणसाला असेल तर त्याच्या आयुष्याची दिशा निश्चित होते आणि या महत्त्वकांक्षेला सखोल विचाराची साथ मिळाली म्हणजे या दिशेनं जाण्याचा मार्गही सुस्पष्टपणे डोळ्यासमोर येतो. या वाटचालीवरून योग्य पावल पडली म्हणजे आयुष्याच्या प्रत्येक वळणावर धुंद यशाची अनुभूती घेता येते; पण या वाटचालीवरची विवेकाची पकड सुटली की आयुष्याला दिशा देणारी महत्त्वाकांक्षा आयुष्यच दिशाहीन करून टाकायला मागपुढं पाहात नाही. त्या स्थितीत हाती उरतं ते शून्य आणि वेदना, अवहेलना, अपमान याची साऱ्या कक्षा व्यापून उरणारी भणभणती साथसंगत. ‘ मी प्रतिभाची आई लिहिते. ’ हे शकुंतला दिवाणजी यांनी लिहिलेलं आत्मकथनस्वरुप पुस्तकही महत्त्वाकांक्षेन घेरलेल्या एका स्त्रीच्या (स्वत: लेखिका) आयुष्यात आलेल्या जळजळीत अनुभवावर आधारलेलं आहे.

आपण आयुष्यभर जिचा पाठपुरावा करत आलो त्या महत्त्वाकांक्षेनच आपल्या देखण्या आणि नृत्यनिपुण अशा मुलीचा बळी घेतला. ही टोचणी मुलीच्या मृत्यूनंतर शकुतलाबाईचं सारं जीवन व्यापून उरली, ‘ सचित का कुणाला टळलंय ? दैवानं डाव साधला आणि हे घडलं ’ म्हणत बाईंनी स्वत:च्या खुळ्या मनाची किंवा इतरांनी बाईची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला; पण सचिताच्या धुक्यात स्वतःला हरवून टाकणं आणि *स्वतःच्या कृत्याचं* एक वेडं समर्थन करणं— हे काही शकुतलाबाईंना पटेना आणि मनाला लागलेली टोचणीही कमी होईना. उलट उतारवयाकडे झुकताना या टोचणीची काळी छाया अजूनच गडद झाली. यातून कुठून तरी सुटका करून घेण्याचा एक प्रयत्न म्हणून बाईंनी साहित्यमाध्यमाचा आधार घेतला आणि ‘ मी प्रतिभाची आई लिहिते—’ हे कन्फेशनवजा पुस्तक पुढं आलं.

पुस्तकाचं स्वरूप आत्मकथनाचं असलं तरी खरी नायिका आहे— प्रतिभा. शकुंतलाबाईंची मुलगी. देखणी, नृत्यनिपुण आणि मनस्वी. हे त्यांचं चौथं अपत्य, चार मुलाना *समवेत घेऊन हसता खेळता ससार मार्गी* लागतो न लागतो तोच शकुंतलाबाईंच्या पतीचं अपघाती निधन झालं आणि तिथपासून ससाराचा भार डोक्यावर घेऊन शकुंतलाबाईंनी एकट्यानं वाटचाल सुरू केली. साहजिकच या नादात बाईचं मुलाकडे दुर्लक्ष झालं. बाईंची नोकरी, एम.ए. बी.टी.चं शिक्षण या नादात प्रतिभा त्यांच्यापासून कायम दूर राह्यली. ज्या सवेदनक्षम वयात मुलीचं आयुष्य आईच्या सहवासानं आकाराला येत, आई मुलीतल्या सुसवादानं *मार्गी लागत, त्या काळातच* प्रतिभा आईपासून दुरावली आणि परिणामी एकटी पडली. त्या काळात तिच्याकडे झालेल्या दुर्लक्षाचा परिणाम तिला पुढ चांगलाच भोवला. हे शकुतलाबाई पहिल्यांदाच कबूल करतात. ही कबुली वाचल्यानंतर त्यांच्याभूमिकेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतो; पण ही कबुली त्याच्या कृतीचं समर्थन देण्यात मात्र अपयशी ठरते. अर्थात अशा प्रकारे समर्थन व्हावं अशीही त्यांची कुठं भूमिका नाही.

सदर पुस्तक वाचून प्रतिभाची जी प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते, त्यानुसार प्रतिभा ही मूळची महत्त्वाकांक्षी नाही. ही महत्त्वाकांक्षा तिच्या अगोपांगी भिनवली ती बाईंनी. कारण त्यांचा अतिमहत्त्वाकांक्षी स्वभाव. त्यांच्या शिक्षणाचा, सुखी संसाराचा, हुशारीचा नकळत आजूबाजूच्या मंडळीकडून उदोउदो झालेला. त्यामुळं आपोआपच फुलत गेलेली अस्मिता आणि या अस्मितेला धक्का लागू नये, या रीतीनं वाटचाल करण्याची

**खुलासा**

मागील अंकात ‘ पुस्तके ’ या सदरात साखरपेरणी, प्रस्थान व मनोवेध या तीन पुस्तकावरील अभिप्राय प्रसिद्ध झाले. सदराच्या मथळयात नजरचुकीने या तीन पुस्तकांबरोबर ‘ मी प्रतिभाची आई लिहिते ’ याही पुस्तकाचे नाव छापले गेले आहे. पण जागेच्याअभावी त्या अंकात या पुस्तकाचा अभिप्राय छापला गेला नव्हता. तो या अंकी दिला आहे.

मनाला लागलेली सवय. स्वतःचं आयुष्य घडवण्याचं वय गेल्यानंतरही बाईंच्या मनाची महत्त्वाकांक्षी भूक मात्र संपली नाही आणि ही स्वप्नं पाहिली, रुजवली ती प्रतिभात. ही लोकमान्यतेची, प्रतिष्ठेची भूक इतकी जबरदस्त होती की, त्यांचं सगळं लक्ष केंद्रित झालं ते तिच्या नृत्यातील कौशल्यावर, त्यातील प्रगतीवर. त्याला जी आहार-विश्रांतीची गरज होती, ती मात्र कधीच पूर्ण होत नाही. तिच्या नृत्यावर खूश असणाऱ्या शकुंतलाबाईंकडून तिच्या शरीराची आणि मनाची उपेक्षा कशी झाली हे लक्षात येत ते या पुस्तकात प्रसिद्ध झालेल्या तिच्या कवितांवरून. जगण्याची विलक्षण आस असलेल्या प्रतिभाच्या, उदासिन रंग आणि एकलेपणाचा दाह घेऊन येणाऱ्या कविता तिची ही मानसिक गरज उघडी करतात. वास्तविक शकुंतलाबाई शिकलेल्या, बाहेरच्या जगात वावरलेल्या, प्रतिभाच्या लहानपणी एक वेळ तिच्याकडं लक्ष पुरवणं शक्य झालं नसलं तरी नंतर सुस्थिती आल्यावर तिच्याकडे संपूर्णपणे लक्ष देण्याची संधी हातात आलेल्या, तसंच फुफ्फुसाचा क्षय हा तसा अगदी अनोळखी आजार नाही. या रोगाची प्राथमिक लक्षणं कामाच्या व्यापात किंवा महत्त्वाकांक्षेच्या नादात खुद्द शकुंतलाबाईंच्या लक्षात आली नसली तरी त्याचे आप्तस्वकीय, प्रतिभाचे शिक्षक वगैरे कुणाच्याही लक्षात आली नसावीत का ? का लक्षात आली पण त्यांच्याकडे लक्ष देण्याचं महत्त्व पटलं नाही ? का प्रतिभाच्या नाजूक प्रकृतीत ही लक्षणं खपून गेली ? या प्रश्नांची उत्तरं शोधणं जसं अवघड जातं तसं या साऱ्यात एकट्या शकुंतलाबाईंचा दोष किती आणि दैवगतीचा भाग किती — याचा शोध घेणंही अवघडच जातं !

त्यापेक्षा हे पुस्तक आहे त्या स्वरूपात स्वीकारणं अधिक योग्य ठरेल. कारण लेखिका म्हणून शकुंतलाबाईंनी पुरेसा प्रामाणिकपणा दाखवलाय. स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा, अस्मितेचा, महत्त्वाकांक्षेचा ध्यास घेताना 'आई' म्हणून पराभूत होण्यातली चूक त्यांनी निर्भय मोकळेपणान प्रेक्षकांसमोर ठेवलीय. मग प्रेक्षकानी दोष दिलाच तर सोसायची मानसिक तयारीही आहे. हे सगळं कागदावर उतरवून मनात कोंडलेल्या विचारांना बाहेरची वाट दाखवून मन हलकं करण्याचा एक हेतू असला तरी त्याबरोबरच या पुस्तकाच्या निमित्तानं सगळ्यांच्या डोळ्यासमोर एक उदाहरण राहावं आणि असं आयुष्य, अशी टोचणी दुसऱ्या कुणा आईच्या नशिबी येऊ नये हीही एक भावना या पुस्तकामागं आहेच. या पार्श्वभूमीवर पुस्तकात आलेला पसरटपणा मात्र अडचणीचा ठरतो. शकुंतलाबाई मराठीच्या प्राध्यापिका तेव्हा भाषा आणि विचाराचं सौंदर्य व मोकळेपणा त्यांच्या लिखाणात आहे; पण नेटकेपणा नाही तशी एकसंघता नाही. आपलं कन्फेशन आणि प्रतिभाच्या जीवनाची वाटचाल याची सांगड घालताना गडबड झालीय. संदर्भ पुढं-मागं झाल्यानं पुस्तकाचा प्रवासही रेंगाळत होतो. कन्फेशन देण्याच्या दृष्टिकोनातूनच हे पुस्तक लिहिलंय. हा हेतू प्रस्तावनेत एकदा स्पष्ट झाल्यानंतर आत्मकथनात वारवार त्याचा उल्लेख करण्याची काहीच गरज नव्हती. वाचताना या सगळ्या गोष्टी खटकत राहतात आणि त्यामुळं एकदर परिणाम मात्र उणावतो.

—भद्रा

मी प्रतिभाची आई लिहिते
शकुंतला दिवाणजी
प्रपच प्रकाशन
पृष्ठे : २१२, मूल्य : ३२ रु.

सांस्कृतिक दिल्ली

## कवितांच्या सुरांची बेहोशी

दिल्लीतील मावळंकर सभागृह. या सभागृहात अलिकडेच श्री. पु. ल. देशपांडे आणि सौ. सुनिताबाई देशपांडे यानी कै. बा. भ. बोरकराच्या कवितांच्या गायन-वाचनाचा 'एक आनंदयात्रा' हा कार्यक्रम सादर केला. तसे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमाचे वृत्त वाचनात आले होते. तरीही तो पाहण्या-ऐकण्याची उत्सुकता लागून राहिली होती. कारण बोरकरांसारख्या निसर्गवेड्या कवीच्या कविता आणि त्या वाचणारा पु. लं. सारखा त्याचा दर्दी, संवेदनशील आणि रसिक मित्र, असा मणिकांचन योग होता. सध्याकाळी ५ वाजता सुरू होणारा हा कार्यक्रम सलग दीड तास चालणार होता. कार्यक्रमाला मध्यतर नव्हते. अर्थात 'काव्यसुधापानी रंगून' मन जर धुद झाले तर मध्यंतराची आठवण होणे कठीणच आणि तसा मध्यतर असल्यास रसभंगाचीच शक्यता जास्त.

मावळंकर सभागृह काव्यरसिकानी गच्च भरले होते. बोरकराच्या पहिल्या भेटीच्या आठवणीपासून पु. लं. नी कार्यक्रमाला सुरुवात केली. लहानपणी त्यावेळी ऐकलेल्या बोरकराच्या प्रकाशगीताचे सूर त्याच्या मनात अजून किती तीव्रतेने घर करून राहिलेले आहेत, हे तेव्हा जाणवले. आठवण रंगून सागता सागताच पु. ल. नी विवेचनाचा ओघ बोरकराच्या कविताकडे अगदी नकळत वळविला. चिरयौवनाचे देणे लाभलेल्या बोरकराची 'या नदीच्या पार वेड्या यौवनाचे झाड आहे, अमृताचा चद्र त्याच्या पालवीच्या आड आहे' ही रसरसती कविता पु. ल. नी सुनिताबाईंना म्हणायला सांगितली आणि सभागृहात एकदम मैफिलीचे वातावरण निर्माण झाले. बोरकरांच्या कवितांवर थोडे थोडे भाष्य करीत पु. ल. आणि सुनिताबाई दोघानी एकामागून एक कविता सादर करण्यास प्रारभ केला, तशी मैफल रगू लागली.

बोरकरांच्या धुद प्रेमकविता, रगानी बहरलेल्या त्याच्या निसर्ग कविता, गोव्याच्या भूमीविषयी त्याना वाटणारी आत्मीय ओढ, त्याच्या ठायी असलेले दिव्यत्वाचे आकर्षण, जीवनाच्या उदात्ततेविषयी त्याच्या कवितातून प्रगट होणारी भाविकता असे विविध पैलू त्या दोघाच्या काव्यवाचनातून चमकत गेले. कविता वाचत असताना त्यावर पु. ल. आणि सुनिताबाई करीत असलेले भाष्य कवितेला कुठेही गुदमरवत नव्हते उलट त्या त्या कवितेतील सौंदर्यस्थळे, मार्मिकता उकलून दाखवण्याचे, कवितेतील खास 'जागा' श्रोत्यापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यानी बहारीने केले.

बोरकराच्या कवितेतील प्रणयधुंदीच्या विविध छटाचा आविष्कार करताना, 'तव नयनाचे दल हलले ग, पानावरच्या दवबिंदूपरी त्रिभुवन हे डळमळले ग' यासारख्या भावुक प्रीतीच्या अनुभवापासून 'जपानी रमलाची रात्र' यासारख्या धुंद प्रीतीच्या

उन्मुक्त आविष्कारापर्यंत अनेक काव्यचषक त्यांनी भरभरून सादर केले.

' वाढत्या सांजवेळे नव्हे ग पाण्या जाऊ
भरल्या कळशीला वेढिती शनी राहू '

अशा सूचक आळवणीतून व्यक्त होणारे युवतीचे भावचित्र,

' गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले
शीतल तनु चपल चरण अनिलगण निघाले '

असे नाचऱ्या गतीने भारलेले ढगांचे, वाऱ्याचे, पावसाळी वातावरणाचे रमणीय निसर्गचित्र, अथवा

' मध्यरात्री नभ घुमटाखाली
शांत शिरी तम चवऱ्या ढाळी
व्यक्त बहिष्कृत मी ज्या काळी
एकांती डोळे भरती '

असे करुणामय उदास अनुभवचित्र बोरकरांच्या काव्यात कसे प्रभावीपणे साकार होते, हे उभयतांच्या काव्यवाचनातून सहजपणे जाणवत होते.

बोरकरांच्या कोकणी कवितादेखील पु. लं. नी खास कोकणी ढंगात गाऊन दाखवल्या. विशेषत:

' मंद मंद वाजत आली तुझी गो पैंजणा ऽ'

ही कविता त्यांनी अशा नजाकतीने गायिली की श्रोतेही तन्मयतेने डोलू लागले.

पु. लं. चे काव्यवाचन, गायन आणि त्यावरील भाष्य ' अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी ' या वृत्तीने आतून उचंबळून आलेले, झुळझुळत्या झऱ्याप्रमाणे सहजरमणीय आणि दिलखुलास होते. तर सुनिताबाईंच्या नाट्यपूर्ण काव्यवाचनाने आणि सुस्पष्ट शब्दोच्चारांनी बोरकरांच्या कवितेचा आशय श्रोत्यांना आकलनीय बनत होता.

तसा दिल्लीचा श्रोतृवर्ग हा मराठी मायभूमीपासून दुरावलेला, मधून मधूनच मराठी कार्यक्रमांची लाभणारी पर्वणी साधणारा. तिकिट काढून कविता ऐकायला येणारा श्रोतृवर्ग म्हणजे ज्यांना आश्चर्याची गोष्ट वाटते अशा हिंदी भाषिकांच्या प्रदेशात राहणारे हे मराठी लोक काव्यास्वादापासून बरेच वंचित राहिलेले. नुसत्या कवितांचा कार्यक्रम कंटाळवाणा तर होणार नाही ना, अशी शंका कार्यक्रमाच्या संयोजकांजवळ किती तरी लोकांनी बोलून दाखविली होती. अशा पार्श्वभूमीवर पु. ल. आणि सुनिताबाई यांनी आपल्या काव्यवाचनाने केलेला परिणाम वैशिष्ट्यपूर्ण होता. ही मैफल हळूहळू कशी रंगत गेली ते पाहिल्यावर या कार्यक्रमाचे यश आणि अशा कार्यक्रमांची आवश्यकता एकाच वेळी मनाला जाणवली. काही श्रोत्यांची प्रतिक्रिया या दृष्टीने बोलकी होती तेव्हा मला असे प्रकर्षाने जाणवले की कवितेसारख्या तरल, हळुवार साहित्य प्रकाराचा आस्वाद घेण्याची आवडही जोपासावी लागते. फार थोड्या लोकांत ती स्वाभाविकपणे फुलते, तथापि अशा कार्यक्रमांनी ही आवड निर्माण करायला, ती जोपासायला बरीच मदत होऊ शकते.

बोरकरांच्या कवितेतील विविध सौंदर्यस्थळे श्रोत्यांपर्यंत पोहोचवता, पोहोचवता पु. ल. आणि सुनिताबाई पुन्हा ओघाओघाने बोरकरांच्या आठवणींकडे वळले. बोरकरांच्या अखेरच्या दिवसांतील हकीगत सुनिताबाई सांगू लागल्या तेव्हा श्रोत्यांची मनेही त्यांच्या बरोबरच भारावून व्याकुळ झाली. आयुष्यभर काव्याच्या धुंदीत ' आनंदाची यात्रा ' करणारा हा कवी शेवटी कविता म्हणता म्हणताच कसा शुद्ध हरवून शेवटच्या प्रवासाकडे निघाला, ते ऐकताना खरोखरीच मन हेलावून गेले. ' प्रकाशाचे स्तोत्र ' गाणाऱ्या बोरकरांच्या पहिल्या भेटीच्या आठवणीने पु. ल. नी कार्यक्रमाला प्रारंभ केला आणि बोरकरांची शेवटची कविता 'तिमिराचे स्तोत्र' त्यांनी शेवटी ऐकवले. अर्थात बोरकरांच्या पार्थिव जीवन यात्रेच्या समाप्तीबरोबर त्यांच्या कवितेची आनंदयात्रा संपत नाही. बोरकरांच्या कवितांचे सूर रसिकांच्या मनाला रिझवत, सुखवत राहणारच आहेत, हे सांगताना बोरकरांची सुप्रसिद्ध कविता—

' सरीवर सरी आल्या ग ऽ
गोपी दहिदुध न्हाल्या ग ऽ'

पु. लं. नी तिच्या धुंद लयीत टाळ्यांच्या तालावर म्हणण्यास सुरुवात केली तेव्हा नकळत श्रोतृवृंदाने तो ताल उचलून धरला. एक क्षणभर त्या कवितेच्या सरी त्या प्रेक्षागृहात सर्वत्र बेहोषीने कोसळत आहेत आणि रसिक श्रोते त्यात चिंब भिजून हर्षनिर्भर झाले आहेत असा भास झाला.

या कवितेपाशी कार्यक्रम संपला. परंतु तो ताल, ते शब्द आणि काव्यास्वादाची ती मनस्वी वृत्ती मनात रुणझुणत, झंकारत राहिली.

—ललिता मिरजकर


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**


सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

## लीला पाटील




# शाळेची सवय

अडीच वर्षांच्या पवनला हाताला धरून त्याची आई चालली होती. आईने डब्यात काय दिले आहे, ती चित्रांचे पुस्तक उद्या आणणार आहे की नाही असे नाना प्रश्न तो विचारत होता. 'शाळेत बसायचं, रडायचं नाही, बाईचं ऐकायचं मोठा होणार ना तू ?' असे आई सारखे बजावीत होती. आईच्या ह्या साऱ्या आज्ञा आणि प्रश्नांच्यापेक्षा पवनचे मन होते आईने डब्यात काय घातले होते ते पाहण्यात. ते खाण्यात. आपल्याला हवे असलेले चित्राचे पुस्तक उद्या आई आणणार म्हणते त्यात. माय–लेकांचा हा संवाद चालू असताना शाळेची इमारत जवळ आलेली पवनला दिसली आणि त्याने केवढे मोठे भोकांड पसरले. 'मी नाही जाणार शाळेत' असे ओरडून तो आईच्या हातातून आपला हात सोडवून घेण्याचा प्रयत्न करू लागला. शाळेच्या जवळपास उभ्या असलेल्या इतर बायका ते दृश्य पहात होत्या. जाणतेपणाचे मंद स्मित त्यांच्या चेहऱ्यावर होते. गोंधळलेल्या पवनच्या आईला त्यांनी दिलासा दिला. 'शाळेची सवय झाल्यावर नाही रडायचा पवन' त्या स्त्रियांच्या त्या शब्दांनी माझ्या मनात प्रश्न उभा केला की शाळेची सवय म्हणजे नेमके काय ? ह्या सवयीच्या अंतर्गत आणखी इतर कोणत्या सवयी आहेत ?

घडलेला हा प्रसंग पुष्कळ दिवसांपूर्वीचा. त्यानंतर असे किती तरी पवन आणि पवनच्या आई मी पाहिल्या. शाळेची सवय झालेली लहानथोर मुलेही पाहिली. मात्र तरीही शाळेची सवय म्हणजे नेमके काय हे अचूकपणाने माझ्या लक्षात येत नव्हते. एके दिवशी Teaching is नावाचे एक पुस्तक माझ्या हातात पडले आणि माझ्या अनेक प्रश्नांची उत्तरे मला त्यात सापडली. शाळेची सवय म्हणजे काय त्याचे उत्तर त्या पुस्तकातील एका कवितेत वाचायला मिळाले. वाचायची आहे का तुम्हाला ती कविता ? कवितेचा स्वैर भावानुवाद करू या आपण.

त्याला नेहमीच काही सांगावसं वाटायचं
पण कोणालाच नाही समजायचं बोलणं त्याचं
नेहमीच काही समजावून सांगावसं त्याला
वाटायचं
पण त्याच्याकडे द्यायचं नाही लक्ष कोणीचं.
......मग त्यानं सुरुवात केली
चित्रं रेखाटायला
काही वेळा तो नुसता रेखाटत राही
जे नसे खास काही.
तरीसुद्धा वाटायचं त्याला
कोरावं ते
दगडात नाही तर आकाशात
कधी कधी गवतावर लोळत
पहात राही तो आकाशात
आणि मग तिथं उरे
फक्त ते आकाश, त्याच्या अंतरंगातला
कल्लोळ आणि तो
की ज्यांना काही सांगायचं होतं.
यानंतरच काढलं त्यानं एक चित्र
एक सुंदर चित्र.
पण ठेवलं लपवून उशीखाली
दाखवायचं नाही म्हणून कोणालाही.
त्याचाच एक भाग झालेलं ते चित्र
दररोज रात्री पाही तो ते चित्र.
विचारही करी त्या चित्राचाच.
डोळे झाकल्यावरही दिसत राही

ते चित्रच.
शाळेत नाव घालायच्या दिवशीही
घेऊन गेला तो बरोबर ते चित्र
एखाद्या मित्रासारखं.
मात्र वाटली शाळा विचित्र त्याला.
सगळ्याच एकासारख्या एक खोल्या.
सगळ्याच तपकिरी.
बंदिस्त आणि कठोर.
बसायची डेस्कंसुद्धा.
एकासारखी एक
सारीच तपकिरी रंगाची.
वाटायचं त्याला
काय हरकत आहे ही असायला लाल रंगाची?
डेस्काखाली ठेवलेले पाय एकसारखे जुळवून
टीचरची रोखलेली नजर सतत सोसून
आवडायचं नाही त्याला मुळीच
पेन्सिल किंवा खडू हातात धरून
काढणं निरर्थक आकडे.
एक दिवस
आली टिचर त्याच्याजवळ
सांगितलं तिनं
'घातला पाहिजेस टाय
इतरांसारखा ?'
'आवडत नाही मला घालायला टाय'
या त्याच्या वाक्यावर
म्हणाली टीचर
'तुझ्या आवडीचं महत्त्वच काय ?'
यानंतर टिचरनं
काढायला सांगितली चित्रं,
सगळ्यांनाच.
त्यान चितारली
हळदुली, पिवळीजर्द, सकाळ
जशी भासत होती सुंदर
त्याला ती सकाळ.
हसून बघितलं टिचरनं चित्राकड
अन् विचारलं
'का काढत नाहीस तू
चित्र इतरासारखी ?
आहेत ना सुंदर
आणि एकसारखी ?
त्यानंतर आईनं त्याला
आणला टाय
आणि मग तो लागला काढायला
चित्र इतरांसारखी
विमानं, जहाजं
आणि काय काय.
भिरकावलं त्यानं
आपलं ते पूर्वीचं चित्र.
नंतर मग नेहमी प्रमाणं
लोळत पडला तो गवतावर
पहात त्या आकाशाकडं
दिसलं त्याला ते निळं आणि अफाट
आणि सर्व काही असलेलं आकाश
फक्त नव्हता त्यात त्याच्यातला 'तो'.
आता तो बनला आहे
इतरांसारखाच एक.
चौकोनी अतरंगाचा
ताठर हातांचा.
आता नाही जरूर त्याला
अंतरंगातला कल्लोळ इतराना सागाण्याची.
कारण– अंतरंगात उठतच नाहीत आता
कल्लोळ
त्या कल्लोळांनी ढोसणं आपल]
आहे थाबवलं
इतर अनेकांच्या अंतरंगातल्या
कल्लोळासारखं.
शाळेची सवय झाल्यावर.

शाळेचा कटाळा मुलाना का येतो व शाळेची सवय झाल्यावर काय होते याचे मार्मिक वर्णन वर दिलेल्या भावानुवादात आहे. कामानिमित्त आनंदवनला गेले होते. अपंग मुलांसाठी बांधली जाणारी शाळा मी पाहिली. शाळा कसली ? बंगलाच तो ! माझा हा विचार बाबा आणि साधनाताई याना सांगितल्यावर ते म्हणाले, 'शाळेची इमारत शाळेसारखी दिसू नये, वाटू नये याची खबरदारी घेतली आहे आम्ही' केवढे मोठे शैक्षणिक सत्य बाबांनी सहजपणाने पेलले आहे. आपल्या शाळा चौकोनी, तपकिरी, कठोर. बांधून घालणाऱ्या त्याच त्या शब्दाची फोलपाटे मुलांकडे भिरकवणाऱ्या आणि त्याच्या अंतरंगातले नाना कल्लोळ लुप्त करणाऱ्या आहेत एका शाळेत ऐकलेला सवाद सागते, 'बाई, पुन्हा सांगा लेखनाचा विषय' 'मी उन्हाळयाची सुट्टी कशी घालविली.' 'आयलाऽऽ असले विषय कुठून शोधतात हे शिक्षक कोणास ठाऊक !' तुम्हाला आठवत असेलच की तुम्हीसुद्धा याच विषयावर लहानपणी लेखन केले आहे. पिढ्यान्पिढ्या लेखनाचे तेच तेच विषय दिले जातात. एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनाशी ज्यामुळे संबंध येणार नाही असे शाब्दिक विषय शोधण्याकडे शिक्षकाचा कल अधिक आहे. माझ्याकडे शिकायला येणाऱ्या मुलीना मी लिहिण्यासाठी विषय दिला 'कचरा'. मुलीना विषय अजिबात आवडला नाही. कचरा तो काय आणि त्यावर लिहावयाचे ते काय ! मग आम्ही त्या विषयावर बोलू लागलो.

कचरा कशाला म्हणायचे ?

आज मौल्यवान वाटणारी गोष्ट उद्या कचरा होते का ?

एकाला कचरा वाटणारी वस्तू दुसऱ्या कोणाला महत्त्वाची वाटते का ?

घरात तयार होणारा कचरा कोणता ?

आई, बाबा, भाऊ, ताई, आजी यांचे कचरे वेगवेगळे असतात काय ?

कचरा साठवायचा कशासाठी आणि कुठे ?

कचऱ्याचे काही उपयोग असतात ?

कोणते ? आणि कोणाकोणाच्या बाबतीत ?

काही माणसांनासुद्धा कचऱ्यासारखें वागविले जाते का ? का बरे ?

अशा वेगवेगळया मुद्यांबद्दल आम्ही बोललो आणि कचरा या विषयाबद्दल सुद्धा खूपसे लिहिण्यासारखे आहे हे मुलींच्या लक्षात आले. या विषयावर लिहिण्यापूर्वी त्यानी घरातील कचरा, कुडीतील कचरा, कचरा कुडीसभोवती दिसणारी दृश्ये आणि आपण काही वेगवेगळया माणसाना जी कस्पटासमान वागणूक देतो यासंबंधी विचार करावा असे सुचविले.

हे केवळ एक उदाहरण. असे कितीतरी जीवनलक्ष्यी विषय आपल्याला लेखनासाठी देता येतील. परंतु शाळा म्हणजे क्रमिक पुस्तक, त्यात दिलेले प्रश्न व त्याची ठराविक उत्तरे. शाळा म्हणजे जयन्ती मयन्तीच्या दिवशी ऐकावी लागणारी कंटाळवाणी भाषणे. चित्रकलेसाठी दिले जाणारे तेच ते ठोकळे. शारीरिक शिक्षणाचे ठराविक व्यायाम प्रकार. साचेबंद वेळापत्रके...शाळेत विद्यार्थ्यांच्या सृजनाला व आनंदाला मुळी जागाच नाही. शिक्षणाची इतकी ठरीव समीकरणे आम्ही बनवून ठेवली आहेत की, त्या समीकरणाच्या चौकटीत विद्यार्थ्यांना कोंबून कोंबून बसविले जाते. शिक्षण नावाच्या प्रक्रियेद्वारा मुलांमधले कुतुहल, आश्चर्यच निपटून काढतो आपण. त्याच्या बोलण्यातली, लिहिण्यातली उद्गारचिन्हे वाढत्या वयाबरोबर नाहीशी होतात. जसजशी शाळेची सवय होत जाते तसतशी मुले शिकतात की प्रश्न विचारावयाचे ते फक्त शिक्षकांनीच व पालकांनी उत्तरे द्यावयाची असतात ती मुलांनी आणि तीही क्रमिक पुस्तकातली किंवा प्रौढांना हवी असलेली ! इयत्ता पार करता करता मुलांजवळ उरतो फक्त पूर्णविराम. 'दुहेरी अवतरण चिन्हांमुळे इतरांचे बोलणे जसेच्या तसे सांगता येते हे घोकता घोकता मुलाच्या मनातले त्यांना जे म्हणायचे असते ते पुसले जाते. एकेरी अवतरण चिन्ह विशेष महत्त्वाच्या वाक्यासाठी किंवा शब्दांसाठी वापरावयाचे असते हे समजून घेता घेता संपून जाते, मुलांच्या मनातले सारे खास महत्त्वाचे आणि या साऱ्यालाच म्हणतो आपण शाळेची सवय ! □

मागील अंकात वाचकाच्या पत्रात ' ऐलमा पैलमा ' या शिक्षणविषयक सदरावरील प्रा. अ. ल. देशपांडे याची प्रतिक्रिया दिली होती. त्यानी कळवलेला जॉन होल्टचा हा शिक्षण विषयक वेगळा प्रयोग

# शिकविणे आणि शिकणे

१९२३ साली न्यूयॉर्क शहरात जन्मलेला जॉन होल्ट हा एक अत्यंत सवेदनशील शिक्षक आहे. वास्तविक शिक्षण हा त्याचा प्रमुख व्यवसाय नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्याने नाविक दलात कामगिरी बजावली व नंतर जागतिक सरकार चळवळीत काम केले. पण लहान मुलांना शिकविणे हा त्याचा छंद आहे. अमेरिकेतील कॉलोरॅडो व मॅसॅच्युसेटस् येथील काही उत्कृष्ट खाजगी शाळांतून त्याने शिकविण्याचे काम केले आहे. या शाळांमधील हुशार विद्यार्थी देखील त्यांच्यामधील सुप्तगुणांचा, सर्जनशील वृत्तीचा विकास करण्यास असमर्थ ठरतात असे त्याला आढळून आले. ही स्थिती बघून जॉन होल्ट अस्वस्थ झाला. त्याच्यातील चिकित्सक शिक्षक जागा झाला. त्याने ठरवले की या समस्येचे उत्तर शोधून काढायचे. त्याप्रमाणे तो कामाला लागला. त्याने अत्यंत धैर्याने व सहनशीलतेने केलेल्या या शोधाचे फलित म्हणजेच त्याचे पुस्तक ' How children fail. ' हे पुस्तक पॅग्वीनने नुकतेच प्रसिद्ध केले आहे.

जॉन होल्ट असे मानतो की मूल जन्मल्यापासून सुरुवातीच्या दोन-तीन वर्षात अत्यंत सर्जनशील असते. म्हणजेच सर्जनशीलता हा त्यातील उपजत गुणच असतो. एवढेच नव्हे तर या काळात त्याच्या सभोवतालच्या जगातून फारच जलद गतीने ज्ञान प्राप्त करीत असते, या काळातील नव-नवीन ज्ञान प्राप्त करण्याची त्याची शक्ती केवळ आश्चर्यकारक असते. शिक्षणाने, खरं म्हणजे, मुलामधील या उपजत गुणाची जोपासना करून त्याना अधिक सर्जनशील व चौकस बनवावयास हवे. पण चुकीच्या शिक्षण पद्धतीमुळे या उपजत गुणांचा विकास होण्याऐवजी लोप होताना त्याला दिसला. ही तर खरं म्हणजे शिक्षणाची शोकांतिका होय. या परिस्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने त्याने काही प्रयोग केले.

दिवसभर जॉन या शाळामधील मुलाचे निरीक्षण करी, कधी त्याना शिकविण्याचे काम करी आणि सायकाळी दिवसभरातील आपल्या निरिक्षणांचा गोषवारा लिहून काढी. आपली ही टिपणे मग तो काही पालक व शिक्षक यांचेकडे त्याच्या सुचनांसाठी, त्याच्या मतांसाठी पाठवी. या सगळ्या विचारमंथनातून निर्माण झालेले पुस्तक म्हणजेच How children fail हे होय.

हे पुस्तक म्हणजे एका संवेदनशील शिक्षकाने लिहिलेली रोजनिशी होय. ह्या पुस्तकाच्या वाचनाने कोणत्याही शिक्षणप्रेमी पालकाला किंवा शिक्षकाला जॉन होल्टचे कौतुक वाटल्याशिवाय राहणार ,नाही. जॉन होल्ट हा जितका तळमळीचा शिक्षक आहे तितकाच किंबहुना जास्तच चिकित्सक व सूक्ष्म निरिक्षक आहे. याचे प्रत्यंतर ह्या पुस्तकाच्या पानापानावरून निदर्शनास आल्याशिवाय रहात नाही. जॉन होल्टचे हे पुस्तक म्हणजे केवळ तात्त्विक विवेचन नसून ते एका बुद्धीमान व संवेदनशील शिक्षकाच्या प्रत्यक्ष निरीक्षणावर व अनुभवांवर आधारलेले असल्याने त्याचे महत्त्व काही आगळेच आहे शिक्षक हा स्वत: विद्यार्थी असल्याशिवाय तो उत्कृष्ट शिक्षक कधीच होऊ शकत नाही याचे प्रत्यंतर या ग्रंथाच्या वाचनाने आल्याशिवाय राहात नाही. जॉन होल्टने मुलाना तर शिकविलेच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो त्याच्यापासून खूप काही शिकला. अशी परस्पर शिकण्याची वृत्ती जोपासल्याशिवाय विद्यार्थी व शिक्षक दोघेही ' तेजस्वीनावधीतमस्तू ' ही औपनिषदिक संकल्पना साकार करू शकणार नाहीत.

जॉन होल्टला असे आढळून आले की बुद्धिमान मुले सर्जनशीलतेचा विकास करण्यास असमर्थ ठरतात कारण ते घाबरलेले असतात, कंटाळलेले असतात व गोंधळलेले असतात. त्यांच्या भीतीचे कारण म्हणजे वडिलधाऱ्या मडळींच्या त्यांच्याकडून असलेल्या अमर्याद अपेक्षा. त्यांना सारखी भीती वाटत असते की आपण आपल्या वडिलधाऱ्यांच्या अपेक्षा तर भग करणार नाही ना ? त्यांच्या कंटाळण्याचे कारण म्हणजे शाळेतील शिकविण्याची पद्धत, त्यांच्यातील बुद्धिमत्ता, पात्रता किंवा सुप्तगुण यांना मुळीच आव्हान देत नाही आणि गोंधळण्याचे कारण हे की त्याना शाळेतून मिळणारे शिक्षण व वास्तव जीवनातील परिस्थिती यात असलेली भयकर तफावत. साहजिकच अशा विपरीत परिस्थितीत मुलांमधील सुप्तगुणाचा लोप होतो.

जॉन होल्टला नवीन पिढी बुद्धिमान व्हावी अशी तळमळ आहे; पण बुद्धिमत्तेची त्याची व्याख्या प्रचलित व्याख्येपेक्षा वेगळी आहे. तो म्हणतो की खरी बुद्धिमत्ता ती की जी त्या व्यक्तीजवळ असलेल्या माहितीच्या साठ्यावर अवलंबून न राहता ती व्यक्ती तिला अपरिचित असलेल्या अडचणीतून कसा मार्ग काढते यावर अवलंबून असते. (It is not how much we know how to do, but how we behave when we don't know what to do ! ) ज्या व्यक्तीला सर्वस्वी अपरिचित परिस्थितीचा हिमतीने, कल्पकतेने, आत्मविश्वासाने व उपलब्ध साधनाचा जास्तीतजास्त उपयोग करून ताबा घेता येईल ती व्यक्ती बुद्धिमान. साहजिकच अशी बुद्धिमान व्यक्ती, जीवनात पदोपदी येणाऱ्या नवीन, अपरिचित व गोंधळात टाकणाऱ्या समस्यांनी गोंधळून जाणार नाही, उलट त्याना समर्थपणे तोंड देऊ शकेल. ती जीवन जगण्यास समर्थ ठरेल.

अशी समर्थ पिढी तयार करण्यासाठी सकस शिक्षणाची गरज आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. ह्या सकस शिक्षणाने मुलाच्या मनात जीवननिष्ठा दृढ केली पाहिजे. जॉन होल्टने या जीवननिष्ठेची व्याख्या पुढील शब्दात व्यक्त केली आहे. हे विश्व व त्यातील (मानवी) जीवन हे मूलत: पूर्ण, अर्थपूर्ण, तर्कसंगत व विश्वासार्ह आहे. हे जग अर्थहीन, फसवे व तर्कदुष्ट नाही. बुद्धिमत्तेच्या योग्य विकासातून ही जीवननिष्ठा दृढ होणे शक्य आहे. सकस शिक्षणाने ही निष्ठा दृढ होणे शक्य आहे असा जॉन होल्टचा विश्वास आहे.

अभ्यासक्रमात मुलांना काही संकल्पना समजावून दिल्या जातात; पण त्याला ती संकल्पना खरोखर समजली किंवा नाही हे कसे शोधून काढायचे ? पारंपारिक पद्धतीत

आपण त्याला व्याख्या लिहिण्यास सांगतो किंवा एखाद दोन उदाहरणे देण्यास सांगतो; पण जॉन होल्ट म्हणतो, एखादी संकल्पना मला खरोखर समजली असेल तर खालील-पैकी निदान काही गोष्टी मला करता याव-यास हव्या–

१) ती संकल्पना मला माझ्या स्वतःच्या शब्दात मांडता आली पाहिजे.

२) ती स्पष्ट करणारी उदाहरणे देता आली पाहिजेत.

३) त्या संकल्पनेची विविध रूपातील अभिव्यक्ती ओळखता आली पाहिजे.

४) त्या संकल्पनेचे इतर संकल्पनांशी असलेले संबंध–नाते ओळखता आले पाहिजे.

५) त्या संकल्पनेचा अनेक प्रकारे उपयोग करता आला पाहिजे.

६) तिचा उपयोग केल्यास होणाऱ्या परिणामांची पूर्व कल्पना यावयास हवी.

७) त्या संकल्पनेचा (शक्य असल्यास) व्यत्यास सांगता यावयास हवा.

एकूण 'आकलन' ही क्रिया एकेरी नसून बरीच गुंतागुंतीची आहे. सकस शिक्षणाने अशा प्रकारचे आकलन विद्यार्थ्यांमध्ये रूजवावयास हवे.

जॉन होल्टचा हा चिकित्सक व प्रासादिक शैलीतील ग्रंथ पालक–शिक्षकांना अतिशय बोधप्रद सिद्ध होईल यात मुळीच शंका नाही.

–प्रा. अ. ल. देशपांडे

---

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# स्पायडर मॅन

**आ**ज मला माझा एक प्रश्न तुमच्यापुढे मांडायचाय्. शोनील आमचा मुलगा. तो सध्या ५ फ्रूटस् आणि स्टार ट्रेकचे स्टॅम्पस् जमवतोय्. ही दोन चॉकलेटस्‌ची नावं आहेत. ५ फ्रूटस्‌चं पाकीट एक रुपयाला असतं. त्यात पाच स्वादांची पाच छोटी चॉकलेटस् असतात आणि एक प्राण्यांच्या पक्ष्यांच्या चित्राचा स्टॅम्प असतो. त्याचा एक अल्बम, मिळतो. त्या अल्बममध्ये अशी अठ्ठेचाळीस चित्रं चिकटवायला जागा असते. दरवेळी ५ फ्रूटसचं एक पाकीट घेतलं की एक चित्र मिळतं. ते त्यावर असलेल्या नंबरावर चिकट-वायचं. एकदा मुलं ही चित्रं जमवायला लागली की त्यांना केव्हा एकदा अल्बम पुरा होतो याची उत्सुकता असते त्यामुळे काही तरी कारणं काढून ती ही चॉकलेटस् घ्यायच्या मागं लागतात. कारण हा अल्बम पुरा झाला की त्यांना त्यांचं नाव छापलेली १०० कोरी पत्रं मिळणार असतात.

स्टार ट्रेक हे ३५ पैशाला एक चॉकलेट मिळतं. त्यातही प्रत्येकात एक स्टॅम्प असतो. टी. व्ही. वर स्टार ट्रेक असायचं त्यातली चित्रं ह्या स्टॅम्पस्‌वर असतात. त्याचाही एक फॉर्म मिळतो. त्यावर साठ स्टॅम्पस् चिकट-वायचे असतात. साठ स्टॅम्पस् चिकटवून फॉर्म पूर्ण भरून दिला की एक टी शर्ट त्यावर मिळतो.

यापूर्वी अशीच थम्स अपच्या झाकणाच्या आत क्रिकेटियर्सची चित्रं असायची. ती दोन टीम्सची चित्रं जमली की त्यावर एक छोटी फन बॉटल मिळायची. दोन फन बॉटल्सवर एक फ्लिकर मिळायचा. तशा आठ फन बॉटल्स जमवायच्या की एक छोटी बॅट मिळा-यची. शोनील ह्या बिल्ल्यांच्या मागे लागला तेव्हा आम्हाला त्यातलं गांभीर्य फारसं लक्षात आलं नाही. आपणही लहानपणी बिल्ले जमवायचो की, पण त्यासाठी काही दर वेळी ते पेय विकत घेऊन पिणं हा कार्य-क्रम नसायचा.

शोनील हे बिल्ले जमवायला लागला आणि त्यापायी दरवेळी अडीच–तीन रुप-यांचं थम्स अप पोटात ढकलणं सुरू झालं. पुन्हा त्यात आपल्याजवळ असलेलंच चित्र असलं तर तेवढा उपयोग नाही. मग अशी चित्रं जमवत असलेला भिडू शोधायचा. त्याच्याशी चित्रांची अदलाबदल करायची हा विनिमय सुरू होतो.

त्यानंतर आली मॅगी नूडल्सची स्कीम. मॅगीची बारा पाकिटं जमवली की त्यावर एक टी शर्ट मिळतो. त्यासाठी भराभर घरात मॅगी आणलं जायचं. एरवी शोनीलला त्या नूडल्स फारशा आवडत नसल्या तरी 'मला खूप आवडतात' असं तो आग्रहानी म्हणू लागला. खाऊ लागला. शेवटी एकदाचा तो टी शर्ट आला. तो एका धुण्यात विस-विशीत झाला ही गोष्ट वेगळीच !

हे थम्स अप, मॅगी नूडल्स, ५ फ्रूटस्, स्टार ट्रेक हे सगळं आहारशास्त्राच्या दृष्टीनी पाहिलं तर निरुपयोगी, इतकंच नव्हे तर अपायकारक अन्न. हे मुलांनी घ्यावं, खावं, प्यावं, त्यामुळे त्याच्या उत्पादकांचा प्रचंड फायदा व्हावा हा या मागचा मूळ हेतू आणि याला मुलं आणि पर्यायानी आपण पालक बळी पडत असतो.

आपलं राज्य हे लोककल्याणकारी राज्य आहे असं म्हणतात. अशा प्रकारे जाहिराती करून नव्या नव्या आमिषांच्या योजना काढून काय कल्याण साधतं ? आई वडलांनी कष्टानी मिळवलेला पैसा फुकट घालवायचा मुलांच्या पोटात नको त्या गोष्टी कोंबायच्या आणि उद्योजकांच्या तिजोऱ्या भरायच्या हा काय धंदा आहे ?

शोनीलला हा सगळा प्रश्न असा आहे हे समजावून सांगत असताना तो म्हणाला ५ फ्रूटस्‌च्या अल्बममधली प्राण्यांची माहिती समजून घ्यायला मला आवडते. त्यासाठी याहून चांगली पुस्तकं असतात. असं मी म्हटलं. ती आपण आणू असं आश्वासन दिलं पण अशा प्रकारे ती चित्रं जमवण्यातली जी गंमत आहे ती नुसतं पुस्तक आणून वाच-ण्यात नाही असं शोनीलचं म्हणणं.

अशी नवी नवी आमिषं कायम बाजारात येत रहाणार, त्याच्या मोहात पडून आपण कायम ह्या ना त्या प्रकारे आपलं नुकसान करून घेत राहायचं हा एक प्रकारचा जुगार आहे. असं बोलणं निघाल्यावर शोनील म्हणाला आता मी हे जमवतो आहे ते शेवटचं. यापुढे बंद करून टाकतो. हा निश्चय तात्पुरता ठरू शकतो.

त्याला आणखी ते पक्कं कळावं म्हणून त्याचे वडील म्हणाले ही सगळी–ह्या वस्तू निर्माण करणारी मंडळी म्हणजे 'स्पायडर मॅन' आहेत. ती अशी जाळी कायम टाकत राहणार आणि तुम्हाला त्यात पकडायचा प्रयत्न करणार. आपण त्यात शिरलो की त्यांचं काम झालं. म्हणून यापासून सावध रहायला हवं.

यानंतर असा प्रश्न पडतो की, अशा प्रकारे जाहिरातीतून आपल्यावर हे घ्या ते घ्या असा जो दबाव येतो त्याला नाहीसं करणारी काही शक्ती आपण सामान्य माणसं नाही का निर्माण करू शकणार ?

अशा योजनांना बळी पडायला नको हे आपण ठरवू शकतो ही एक गोष्ट; पण अयोग्य जाहिरातीचं योग्य ते मूल्यमापन मुलांपुढे मांडायला हवं.

हजमोला घ्या आणि हवं तेवढं खा ही अशीच अत्यंत अपायकारक जाहिरात आहे. हवं तेवढं खा काय ? जास्त खाऊ नका हा खरा योग्य संदेश आहे, पण मग हजमोला खपायचं कसं ? हे मुलांशी बोललं जायला हवं.

साबण, सौंदर्यप्रसाधनं, शीतपेयं, ऐषआरामाची साधनं अशा अनेक वस्तूंच्या जाहिरातींकडे डोळे उघडे ठेवून पाहायला हवं. लक्झरी हा सध्या परवलीचा शब्द बनलेला आहे. आराम, अधिक आराम, उपभोग जास्तीत जास्त उपभोग, मजा, गंमत हेच जाहिराती शिकवतायेत. साधेपणा, कष्ट, काटकसर हे सगळे चेष्टा करायचे शब्द बनतायत. याबद्दल अनेक क्षेत्रातल्या मंडळींनी जागं व्हायला हवं आहे.

सामाजिक जबाबदारी काय फक्त मूठभर कार्यकर्त्यांनीच मानायची ? ती उद्योजकांनाही कळायला हवी, कलावंतांनाही कळायला हवी, अधल्या मधल्या दलालांनाही कळायला हवी. कुणाला नाही तरी पालकांना कळायलाच हवी. कारण हे स्पायडर मॅन आपल्या पैशांचा आणि आपल्या मुलांच्या शारीरिक–मानासिक, बौद्धिक आरोग्याचा बाजार मांडतायत ! आपण काय काय करूया याविरुद्ध ?

हे लिहीत असेपर्यंत शोनोल आणि त्याच्या बरोबरीनी आभा एक नवा फॉर्म घेऊन आलेत. हा अठ्ठावीस स्टॅम्पस्चा आहे. एक्लेअर्स चॉकलेटमध्ये हे स्टॅम्पस् मिळतात. आता हा फॉर्म शेवटचा असं दोघंही म्हणतायत. हा फॉर्म पुरा झाला की क्रिकेटचा सेट मिळणार म्हणे......

कथा

# एक पिनू, हरवलेले

रमेश दा. गाडे

जवळपास सव्वादोनशे रुपयांचा तो लेमनसेट खरेदी करताना त्याने तडकाफडकी निर्णय घेतला असे नव्हे. ‘फिक्स्ड् रेट’ असे बिरूद मिरविणाऱ्या, एकदा सांगितलेली किंमत म्हणज ब्रह्मवाक्य आहे अशा प्रकाराने बोलणाऱ्या, गिऱ्हाइकाच्या नजरेतली एखाद्या वस्तूविषयीची पसंती अचूक हेरून त्या वस्तूच्या किंमतीत एका पैची ही तडजोड न करणाऱ्या, निर्घृण पण अतिसॉफिस्टिकेटेड अशा दुकानदाराजवळ त्याने चारदा तरी किंमत कमी करण्याविषयी विनवणी केली होती. अन् प्रत्येकदा दुकानदाराने, ‘साहेब, तुम्ही हवे तर भाव बघून या इतर दुकानात, मग घ्या !’ असे ठरीव ठशाचे उत्तर दिले होते. ‘भाव बघणे’ हा प्रकार तर आयुष्यात कधी जमलाच नव्हता त्याला अन् मुख्य म्हणजे अति शुभ्र नितळ काचेच्या, वर सोनेरी बॉर्डर व मध्ये अति नाजूक असा पुष्पगुच्छ काढलेल्या पेल्यांचा व तसल्याच डिझाईनच्या ‘जार’ चा भाव करणे म्हणजे त्यांनी त्या सुंदर सेटची कल्पना केली त्याच्या कलादृष्टीचा अधिक्षेप करणे आहे, अशी केवळ अतोनात भावूक माणसांनाच येणारी भावना त्याला येऊ लागली होती. त्या नाजूक लाजऱ्या फुलांच्या बाबतीत वापरलेले ‘दाम’, ‘कम’, ‘रुपये’, ‘रेट’ आदी शब्द एका क्षणी त्याला फार बोचले व त्याने झटकन् मान फिरवीत सांगून टाकले, ‘ओ. के. पॅक कर दो जल्दी’.

‘साहेब, ह्याला गिफ्ट पॅकिंग हवे का ?’

‘त्याचे वेगळे चार्जेस असतील ?’ सावध, वर्गीय पातळीवर येत त्याने विचारले.

यावर दुकानदार गडगडाट करीत हसला व म्हणाला, ‘नाही साहेब, आम्ही ते फ्री देतो. तुम्ही एवढी महाग वस्तू घेता, ही तर मामुली गोष्ट आहे !’ कर्णाच्या औदार्याने असे म्हणत त्याने नोकरास फर्माविले, ‘अरे, गिफ्ट पॅक कर लेमन सेटचा !’

नोकराने ताबडतोब तो लेमनसेट गुलाबी कागदात पॅक करून दिला व त्याच्यासमोर भेटकार्ड टाकले. ‘शुभेच्छांसह’ अशा मजकुराच्या त्या कार्डावर त्याने लिहिले, ललितास, आणि आता तो खाली आपले नाव लिहिणार–पण तो थांबला. त्याच्या चेहऱ्यावर अस्फुट स्मिताची एक झाक तरळली आणि त्याने लिहिले, ‘पिनू’.

त्याने पैसे दिले आणि तो पॅक घेऊन दुकानातून बाहेर पडला.

‘पिनू’ लिहायचे कसे सुचले हे त्याला स्वतःलाच समजेना. पिनू. पिनू. त्याला वाटले, हां, वीस वर्षांमागे एक पिनू होते खरे, पण नंतर ते कुठे गेले कुणास ठाऊक. अन् ते आजच अकस्मात कसे आले. एखाद्या परिचित पण विस्मृत सुगंधासारखे? ललितेला तरी आठवेल का ? त्याच्या नजरेपुढे भूतकाळातला तो प्रसंग उभा राहिला.




लग्नानंतरच्या काही दिवसात तो तिला फार छळत असे, तेव्हा ती फार वैतागून जाई; पण नंतर स्त्रीसुलभ क्षमाशीलतेने सारे विसरत असे, गंमतीने काहीबाही बोलून उलट त्यालाच खुलवीत असे. अशाच एका प्रसंगी तिने त्याला म्हटले होते, ‘पिनू’ आणि तो तेच धरून बसला होता. तिने ‘पिनू’ म्हटल्याशिवाय ‘ओ’ देणेच त्याने बंद केले होते. प्रेमात आपण अशा संबोधनाने त्याच्या हाती कोलीत दिले आहे, हे तिला कळले होते; पण उशिरा. ‘पिनू’ चा अर्थ त्याला पुरेपूर कळला होता अन् तो त्याचा

पुरेपूर फायदा घेई. एकदा असेच एका चावट खोडीचे वेळी ती झटक्याने त्याच्यापासून वेगळी झाली होती नि त्याच्यावर नापसंतीचा कटाक्ष टाकीत काहीतरी रागाचे बोलणार, एवढ्यात तो तिला निरूत्तर करीत म्हणाला होता, 'मी पिनू नाही का? मग पिनासारखंच तर केलंय मी!' तेव्हा तिने त्याच्या डोक्यावरचे केस तो किंचाळेपर्यंत ओढले होते आणि त्याला ढकलून दिले होते. अन् मग ती दोघेही यावर चाळीत ऐकू जाईल एवढ्या मोठ्यांदा गडगडाट करीत हसले होते.

अठरा–वीस वर्षांपूर्वीची ती घटना त्याला आठवली व वाटले, आपण 'पिनू' लिहिले ते बरोबरच आहे. ललिताला किती आनंद होईल हा लेमनसेट पाहून...

□

त्याने बेल दाबली तशी ललिताने दार उघडले. तिचे हात कणकेने माखले होते व केसांनाही कणीक लागली होती. मुले घरी नाहीत हे त्याने सवयीने ओळखले व पुन: एकदा 'पिनूपणा' करावा असे त्याला वाटून गेले; पण आत काहीच चळवळ झाली नाही व दाताचे बोळके झालेल्या म्हातारीला वडे खाण्याची वासना व्हावी, अशी एक हतबल आणि शरमेची किंचित पण फार स्पष्ट अशी जाणीव त्याला झाली व तो वरमला.

ललितेने त्याच्या हातातल्या खोक्यावर झडपच घातली व विचारले, 'काय आणलंत?'

'ओळख बघू?'

'सांगा नं?'

'बरं तूच बघ!'

हात धुवायला म्हणून ती लगबगीने स्वयंपाकघरात गेली अन् साडीच्या पदराला हात पुशीत बाहेर येऊन तिने ताबडतोब ते पॅकेट उघडायला सुरुवात केली.

त्याला वाटलं होतं, ती विचारेल 'आजच का आणलंत हे?' पण तिने तसे काही केले नाही. आतली वस्तू बघण्याचीच तिला अनावर उत्सुकता होती. तिचे प्रयोजन काय ह्याचेशी तिला मतलब नव्हता. त्याला वाटले आज आपल्या लग्नाचा एकविसावा वाढदिवस आहे हे खरोखर विसरली की काय ही?

तिने लगबगीने वरचा वर्तमानपत्राचा कागद काढला. आतल्या गुलाबी वेष्टनावरचे भेटकार्ड तिला दिसले. ते वाचत ती पुटपुटली, 'हे काय? टू ललिता फ्रॉम पिनू?'

तो तिच्याकडे एकाग्रतेने पाहात होता.

चकमकीवर ठिणगी उडावी अन् तत्काळ विझून जावी तसे तिचे डोळे एकदा चमकले अन् मग पूर्ववत झाले आणि तिने भराभर तो कागद काढायला सुरुवात केली.

तो सुरेख लेमनसेट दिसताच तिचे जणू भानच हरपले. तो तिने छातीशी धरीत म्हटले, 'किती सुरेख आहे हो हा सेट! आपल्याला किती दिवसांपास्नं घ्यायचा होताच. सुरेख! किती छान! किती पडले?'

त्या शेवटच्या प्रश्नाने तो खट्टू झाला. साऱ्या सुंदर गोष्टींना पैशाचे शेपूट चिकटविणाऱ्या त्या प्रश्नाकडे त्याने पूर्ण दुर्लक्ष केले आणि तो म्हणाला, 'आलो एक मिनिटात.'

हातपाय धुवून तो स्वयंपाकघरात आला तेव्हा त्याला ललिताने तो सेट टेबलावर व्यवस्थित मांडून ठेवल्याचे दिसले. दोन्ही हात कंबरेवर ठेवून ती त्या सेटकडे कौतुकाने पाहत होती. तो आत येताच तिने त्याला म्हटले, 'छान आहे, नाही?' अन् पुन: ती सेट निरखण्यात दंग झाली.

तो शोधक नजरेने इकडे तिकडे पाहत होता. मग त्याने विचारले, 'कागद फेकलेस?'

'कुठले कागद?'

'त्या सेटवर गुंडाळलेले?'

'हो,' त्याच्या प्रश्नाने जणू व्यत्यय येत असल्याच्या सुरात ती उत्तरली.

'ते कार्डसुद्धा?'

'कुठलं कार्ड?'

'अग, ते गिफ्ट कार्ड!'

'हो,' तिने पुन: एकदा तोडून टाकल्यासारख्या सुरात जबाब दिला व त्याच्याकडे पाठ वळवून ती पुन: त्या सेटकडे कौतुकाने पाहू लागली.

त्याने एक सुस्कारा टाकला.

नजरेने कम्युनिकेट होणारे महासागर दुराव्याच्या अगस्तीने प्राशून कोरडे ठक्क केले होते आणि पासपोर्ट हरविलेल्या अतिदूरदेशस्थ प्रवाश्याच्या हताश नजरेने तो तिच्याकडे पाहत राहिला होता.

□

## रंगभूमी

# शासन आयोजित – कला महोत्सव

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने मार्च महिन्यात विविध गावी, विविध कलांचे महोत्सव आयोजित करण्यात आले. ११ ते १७ मार्च या सप्ताहात बीड, सोलापूर, अकोला आणि नागपूर ह्या चार गावी हे महोत्सव संपन्न झाले. परंतु त्याच काळात रशियाचे अध्यक्ष निधन पावल्याने पहिले तीन दिवस कोणतेच कार्यक्रम होऊ शकले नाहीत. उरलेल्या चार दिवसात ठरल्याप्रमाणे कार्यक्रम झाले. यातल्या सोलापूर केन्द्रात झालेल्या १५ ते १७ मार्च या तीन दिवसांच्या महोत्सवाला एक निरीक्षक म्हणून मी उपस्थित होतो.

सोलापूरला १५ मार्चला 'अथ मानुस जगन हं' हे महाराष्ट्र राज्याच्या नाट्यस्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजेते असलेले नाटक पेश झाले. १६ मार्चला लोककला महोत्सव झाला. यामध्ये सांगलीच्या श्रीपतराव अगरकर आणि मंडळींनी रणशिंग वादनाचा कार्यक्रम केला. आज रणशिंग ही संग्रहालया-

तील वस्तू झाली आहे. ती पाहायला आणि दमदार पद्धतीने ऐकायला मिळणे दुर्मीळ गोष्ट झालेली आहे. या मडळीनी अतिशय ऐटबाज पद्धतीने शिंगवादन केले. कोल्हापूरच्या अण्णाप्पा कोष्टी यांचे 'करंढोल' वादन झाले. वाद्याच्या नावावरूनच कल्पना येते की हे ढोल पद्धतीचे वाद्य आहे. तीन–चार करंढोल वादनाचा अनुभव स्मरणीय असाच होता त्यानला ताल आणि लय धरून ठेवणारी होती. याच्या जोडीला सांगलीच्या तुकाराम जाधवांचे 'मुखवटधाचे सोंगीभजन' 'टिपरी'चा तसेच आनदराव सूर्यवंशीचा दांडपट्टा, नागपूरच्या माणिकराव मोटघरे याचा 'डहाका, दंडार, खडी गंमत', कोल्हापूरच्या भानुदास वाघमोडेंचा 'वाघ्यामुरळी' इत्यादी कार्यक्रम होते.

ह्या सर्व कार्यक्रमात सर्वात लक्षवेधी कार्यक्रम झाला असेल तर परभणीचे राजाराम बापू कदम याच्या 'गोंधळ आख्यानाचा.' ह्या राजारामबापूंचे वय ९९ वर्षांचे आहे हे सांगूनही खरे वाटणार नाही. शंभरीला स्पर्श करणारा हा 'तरुण कलाकार' रंगमंचावर आल्यावर चैतन्यमयी कसा होतो हे साक्षात अनुभवण्याजोगेच आहे. या कदम घराण्यात परपरेने तुळजाभवानीचा गोधळ आलेला आहे. हे देवीचे गोंधळी आख्यान गोधळी म्हणून प्रसिद्ध आहेत. विशिष्ट आख्यान लावून ते आपला कार्यक्रम पेश करतात. तुणतुणे, संबळ आदी वाद्याच्या साह्याने गोधळ आरभित होतो. राजारामबापूनी त्या दिवशी कार्यक्रमात परंपरेचे देवीस्तवन करून कृष्णाचे छोटेसे आख्यान लावले. ते आख्यान दृश्यरूपात पाहताना या कलाकाराने केलेला मुद्राभिनय, किंवा एकूणच आगिक, वाचिक स्तरावरचा अभिनय अनेकाना वस्तुपाठ ठरावा अशी स्थिती आहे. ज्याना जिथे शक्य असेल तिथे त्यानी या कलाकाराला 'डोळा भरून' पाहावा, एकदा तरी अनुभवावा असे आग्रहाने सांगावेसे वाटते.

१७ मार्चला झालेल्या शाहिरी महोत्सवात कोल्हापूरचे शाहीर कुंतीनाथ थरके, साताऱ्याचे शाहीर पुंडलिक फरांदे, सांगलीचे शाहीर विभूते आणि शकिलाबानू हे होते. यातल्या प्रत्येक शाहीराचा एक स्वतंत्र बाज होता. लोकरंजन आणि लोकप्रबोधन ही त्यांच्या कार्यक्रमामागची सूत्रे होती. थरके यानी प्रहसनाच्या अंगाने तर फरांदे, विभूते यांनी सामाजिकतेच्या अंगाने शाहिरी कवने पेश केली. आता अस्सल रूपातले शाहीर आणि शाहीरी कवने सपलेल्या अवस्थेत आहेत. त्यातल्या त्यात जे शाहीर उपलब्ध आहेत त्यांच्या तोंडून ऐकणे हेच महत्वाचे. या कार्यक्रमात शकिलाबानू याची आंबेडकरी कवने होती. त्याचा सारा बाज कवालीढंगाचा होता. रचनाही सामान्य होत्या. शाहिरी महोत्सवात या कार्यक्रमाचा अंतर्भाव का झाला हा प्रश्न पडावा इतका तो वाईट होता.

सोलापूरच्या एकूणच महोत्सवाची सारी देखभाल नाट्य आराधना या स्थानिक नाट्य संस्थेने केलेली होती. अतिशय परिश्रमपूर्वक ह्या मंडळीनी संयोजन केले. त्यामध्ये डॉ. वामन देगावकर, गुरुनाथ अवधानी, हर्षे, बीना जवळगेकर, श्री. सौ. काणे, बाळ दैनी इत्यादी अनेकजणांची नावे सांगता येतील.

२५, २६ आणि २७ मार्चला पुण्यात युवा सगीत नृत्य महोत्सव झाला. हा महोत्सव महाराष्ट्र शासन सास्कृतिक कार्य आणि दिल्लीची संगीत नाटक अकादमी यांच्या सहयोगाने घडला. अशा तऱ्हेचा संयोग प्रथमच घडला असावा. हे वर्ष आंतरराष्ट्रीय युवा वर्ष असल्याने योग जुळून आलेला असावा. या महोत्सवाच्या जोडीला एक प्रदर्शन आणि परिसवाद याचेही आयोजन होते.

या महोत्सवात पुणे, मुबई, गोवा, हैद्राबाद सोलापूर अशा ठिकाणच्या युवा कलावंताचे हे समेलन झाले. जवळजवळ पन्नास युवा कलावंत यामध्ये समाविष्ट होते. त्याची संगीत आणि नृत्यकला पाहात असताना गुणवत्तेचा प्रत्यय तर येत होताच, पण त्यातल्या अनेकांना उत्तम भविष्य आहे याचीही साक्ष पटत होती. यात जसे अगदी नवखे कलावत होते तसेच थोडेफार नाव मिळवून उदयोन्मुख असेही होते. उदा. पद्मजा फेणाणी, आरती अकलीकर, अर्चना जोगळेकर इत्यादी या युवा कलाकाराच्या बरोबरीने ज्याचे कार्यक्रम झाले त्यामध्ये प्रथितयश सस्था आणि व्यक्ती होत्या. सस्थामध्ये रोहिणी भाटे यांची नृत्यभारती, प्रभा मराठे यांची कलाछाया, मनीषा साठेंची संस्था, कनक रोळे यांची नालदा महाविद्यालय इत्यादी. व्यक्तीमध्ये मनीषा साठे, सुचेता भिडे–चाफेकर, राजा काळे, अश्विनी भिडे इत्यादी महत्त्वपूर्ण कलाकार होते. यानी कार्यक्रमाची शान वाढवली.

परंतु हे सारे महोत्सव अवेळी झाले. एक तर मार्च महिना परीक्षांचा महिना. या काळात तसे सास्कृतिक वातावरण नसते. परिणामी सोलापूरला काय किंवा पुण्याला काय प्रेक्षकाची उपस्थिती ही विशेष उत्साहवर्धक नव्हती. त्याचा परिणाम कलावंतांवर होतोच. युवा कलाकारावर तर नक्कीच. पुढच्या वर्षी हे महोत्सव नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये होतील असे सास्कृतिक कार्याचे संचालक प्रा. कमलाकर सोनटक्के यानी जाहीर केले आहे. पाहू या काय काय होते ते ! □

चित्रपट

# सेन्सॉरचा पक्षपात

सेन्सॉरविरुद्ध जी तक्रार होताना दिसते तिचा रोख हा सेन्सॉरच्या धोरणाविरूद्ध किंवा मार्गदर्शक सूत्राविरूद्ध नसून या मार्गदर्शक सूत्राचा किंवा धोरणांचा सेन्सॉरकडून अवलंब ज्या प्रकारे केला जातो, तिकडे आहे. त्यामुळच सध्या सेन्सॉरनं कलात्मक चित्रपट आणि व्यावसायिक चित्रपट किंवा एन. एफ. डी. सी. निर्मित–वितरीत चित्रपट आणि बाहेरच्या निर्मात्याचे चित्रपट याबाबतीत जे उघड उघड पक्षपातीपणाचं धोरण स्वीकारलय ते पाहता चित्रपटवर्तुळातच काय पण सर्वसामान्य लोकांच्या मनातही सेन्सॉरबद्दल गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे. एन. एफ. डी. सी. अस्तित्वात आलं ते चागल्या चित्रपटाला प्रोत्साहन मिळावं म्हणून. पण सेन्सॉरनं एन. एफ. डी. सी. निर्मित चित्रपटाना जे झुकतं माप दिल आणि एन. एफ. डी. सी. चा चित्रपट या शिक्क्याचं सरक्षक आवरण घेऊन सहसा सेन्सॉरच्या कात्रीतून सहीसलामत सुटू न शकणारे चित्रपटही जेव्हा सेन्सॉरच्या कात्रीतून अलगद निसटले, त्यामुळं पुन्हा एकदा सेन्सॉरविरूद्ध टीकेचा गदारोळ उठला. सर्वसामान्यपणे चित्रपटात मात्र आक्षेपार्ह ठरत नाहीत, उलट याच प्रसगांना महत्व देऊन प्रसिद्धीसाठी त्यांचा वापर केला जातो, ही गोष्ट



कोडयात टाकणारी आहे. वानगीदाखल काही प्रसंग–प्रामाणिक पोलिस इन्स्पेक्टरची कहाणी म्हणून गाजावाजा झालेला 'अर्धसत्य' हा चित्रपट गुन्हेगाराकडून सत्य काय ते वदवून घेण्यात अपयश आलेला पोलीस इन्स्पेक्टर त्या गुन्हेगाराला करतो ती प्रचंड मारहाण आणि त्यापायी या गुन्हेगाराचा झालेला मृत्यू. 'चक्र'मध्ये स्मिता पाटीलची उघडयावर मन लावून केलेली आंघोळ. 'आक्रोश'मधील स्मिता पाटील आणि ओम पुरी यांच्यातील शयनदृश्ये. वगैरे अशी उदाहरणांची यादी बरीच लांबवता येईल. या उदाहरणांवरून एक गोष्ट सहजी लक्षात येते की, इतर चित्रपटांच्या बाबतीत कात्रीच्या पात्याची धार अधिक तेज करणाऱ्या सेन्सॉरची भूमिका एन. एफ. डी. सी. च्या चित्रपटांच्या बाबतीत मात्र डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराची असते. फक्त विशिष्ट प्रसंगच असं नाही तर कल्पनेच्या बाबतीतही एन. एफ. डी. सी. च्या चित्रपटांना अधिक स्वातंत्र्य आहे आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हे स्वातंत्र्य ओरबाडून घेतलेलं नसून सेन्सॉरनंच दिलेलं आहे.

### पळवाटा–समर्थनं

हेच सेन्सॉर बोर्ड इतर चित्रपटांच्या बाबतीत मात्र सगळी मार्गदर्शक सूत्रं परजत उभं राहातं. मध्यंतरीच्या काळात हिंसाचाराच्या नावाखाली सेन्सॉरनं एकापाठोपाठ एक 'आजकी आवाज', 'औरतका इन्तकाम' यांसारख्या चित्रपटांना आक्षेप घेतला होता. चित्रपटात हिंसाचाराचं स्तोम माजवलेलं असू नये, हे सेन्सॉरचं मूळ मार्गदर्शक तत्त्व. तेव्हा चित्रपटात हिंसाचाराचा अतिरेक नसावा, त्याचा कळतनकळत समाजावर वाईट परिणाम होतो, वाईट प्रवृत्तींना चालना मिळते या दृष्टिकोनातून सेन्सॉरनं या चित्रपटांना आक्षेप घेतलेला असेल तर सेन्सॉरचा निर्णय हा केव्हाही स्वागतार्हच आहे. पण म्हणून एका चित्रपटातील हिंसाचाराला सेन्सॉर अटीतटीनं विरोध करतं आणि त्याच वेळेस दुसऱ्या चित्रपटातील हिंसाचार मुकाटयानं खपवून घेतला जातो, असं परस्परविरोधी दृष्टिकोन स्वीकारणं हे सेन्सॉरच्या दृष्टीनं घातकच ठरेल. 'औरतका इन्तकाम' या नावानं प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचं मूळ 'रेप' हे नावही सेन्सॉरला सहन झालं नव्हतं. तिथं त्यातील प्रसंग कसे सहन होणार? साहजिकच या चित्रपटाविरुद्ध सेन्सॉरनं थयथयाट केला तर नवल नाही. पण त्याचबरोबर 'अर्धसत्य', 'आक्रोश' मात्र सहीसलामत सुटले होते. अमजदखानच्या 'चोरपुलिस' मधील बलात्कार दृश्याला कडाडून विरोध करणारं सेन्सॉर बोर्ड 'आक्रोश' मधील स्मिता पाटील–ओमपुरी यांच्यातले प्रसंग नजरेआड करत होतं. चित्रपटातील नायिकेच्या 'इंदिरा' या नावाला विरोध दर्शवून दुसरं नाव नायिकेला देण्याचा आग्रह धरणारं सेन्सॉर बोर्ड 'अल्बर्ट पिंटोको घुस्सा क्यों आता है?' चित्रपटातलं 'इंडियामें क्या रखा है? होपलेस कंट्री' सारख्या वाक्यालाही आक्षेप घेत नव्हतं.

कलात्मक चित्रपट आणि व्यावसायिक चित्रपट हा वाद जुनाच आहे. पण आपल्या पक्षपाती धोरणानं सेन्सॉरनं या वादाला आणखीनच खतपाणी घातलंय वास्तविक चित्रपटाच्या जातकुळीबाबत न्यूट्रल राहून सगळीकडे एकच नियम लावण्याचं धोरण सेन्सॉरनं स्वीकारलं पाहिजे. पण तसं होताना दिसत नाही. अध्यक्ष विक्रमसिंग यांच्या मते 'कलात्मक चित्रपटनिर्माते हे अधिक जबाबदार आहेत. त्यांच्या चित्रपटांना सामाजिक दृष्टिकोन आहे. तशी सामाजिक मूल्यांची जपणूकही आहे. मग त्यांना का झुकतं माप देऊ नये? 'अर्धसत्य'लाही 'ए' प्रमाणपत्र देण्यात आलं होतं आणि 'अर्धसत्य' मधला तो मारहाणीचा प्रसंग काढून टाकला तरी चित्रपटावर काही परिणाम होणार नाही. उलट 'आजकी आवाज' मध्ये हिंसाचाराच्या अतिरेकानं सेन्सॉरच्या मार्गदर्शक सूत्रांचं उल्लंघन केलं होतं. ज्या 'डेथ विश' मालिकेवरून हा चित्रपट घेण्यात आला आहे, ती मालिकाही हिंसाचाराच्या अतिरेकामुळंच बंदी घातली गेली होती.' याशिवाय परीक्षण समितीतील सदस्यांच्या दृष्टिकोनावरही चित्रपटाचं भवितव्य अवलंबून असतं असंही एक कारण दिलं जातं. म्हणजे परंपरावादी विचारांच्या सदस्यांचं प्रमाण जास्त झालं की, चित्रपटातील छोटया छोटया गोष्टीला विरोध होणार आणि उदारमतवादी विचारांचं मतैक्य झालं की, चित्रपट सहजी सुटणार. वास्तविक अशा प्रकारची कारणं देणं यासारखी पळवाट नाही. कारण याचा अर्थ सेन्सॉरची मार्गदर्शक सूत्र कितीही चांगली योग्य असली तरी त्यांचा अवलंब कुठल्या पद्धतीने होतो यावरच सेन्सॉरचा निर्णय निश्चित होणार. आणि ही मार्गदर्शक सूत्र वापरण्याची दिशाच जर चुकत असेल, तर मार्गदर्शक सूत्रांना तसा काही अर्थही राहात नाही. तेव्हा कलात्मक चित्रपटवाले अधिक जबाबदारीनं चित्रपटनिर्मिती करत आहेत किंवा परीक्षण समितीतील सदस्यांच्या दृष्टिकोनावर चित्रपटाचं भवितव्य अवलंबून असतं वगैरे कारणांमुळे या प्रकारच्या चित्रपटातील हिंसाचारचं किंवा अश्लीलतेचं समर्थन मात्र होत नाही.

अशाच प्रकारचं तोकडं समर्थन दिलं जातं ते हिंसाचार आणि अश्लीलतेनं ठासून भरलेल्या इंग्लिश चित्रपटांच्या बाबतीत. 'रायव्हल्स' 'दी मॅरेज ऑफ मारिया ब्राऊन' 'डिस्पेअर', 'दी साबिना' हे अलिकडच्या काळात प्रदर्शित झालेले मसालेदार इंग्लिश

चित्रपट एन. एफ. डी. सी. तर्फे वितरीत झालेले. हिंदी चित्रपट सेन्सॉरकडून ज्या पद्धतीने पास केले जातात ती पद्धत या किंवा तत्सम इंग्लिश चित्रपटांना लावायची म्हटली तर हे चित्रपट भारतात कधीच प्रदर्शित होऊ शकले नसते. कारण हिंसाचार आणि अश्लीलता याबाबतीत परदेशी चित्रपट हिंदी चित्रपटांपेक्षा कित्येक कोस पुढं गेलेले आहेत. वास्तविक इंग्लिश किंवा दाक्षिणात्य चित्रपटांसाठी सेन्सॉरची मार्गदर्शक सूत्रं वेगळी नाहीत. पण ही मार्गदर्शक सूत्रं वापरताना त्या लोकांची संस्कृती, जीवन पद्धती यांचा विचार केला जातो. तसंच हे चित्रपट बघणारा प्रेक्षकवर्ग निराळा आहे, असंही एक सेन्सॉरच्या सैलावलेल्या धोरणाचं समर्थन दिलं जातं. पण यात एका गोष्टीचा घोळ घातला जातो की, त्यांच्या संस्कृतीची जपणूक करताना आपल्याही सांस्कृतिक मूल्यांची जपणूक व्हायला हवीय. तसंच प्रेक्षकवर्ग वेगळा आहे, हे कारणही अगदीच पोकळ आहे. 'हर नाईटस्', 'सेक्स प्ले', 'प्रेम और वासना' सारख्या मद्रासी चित्रपटांचं अचानक फुटलेलं पेवही सेन्सॉरच्या धोरणातील तफावतीमुळंच आहे. अशा प्रकारचं पक्षपाती धोरण स्वीकारून सेन्सॉरनं स्वतःच स्वतःची गळचेपी करून घेतली आहे. कारण हिंसाचार, अश्लीलता ही कशाही, स्वरूपात कुठल्याही भाषेत दाखवली तरी त्याचं मूळ स्वरूप बदलत नाही. आणि त्यामुळंच त्याचा समाजावर काय व्हायचा तो परिणाम होतच असतो. तेव्हा सेन्सॉरनं पक्षपातीपणा सोडून मार्गदर्शक सूत्रं अवलंबण्याच्या बाबतीतलं धोरण निश्चित करायला हवंय.

—शुभदा रानडे

विज्ञान

## मृत समुद्राला संजीवनी, इस्रायलला ऊर्जा


डॉ. सुभाषचंद्र सारंग

मृत समुद्र हा मध्यपूर्वेतील इस्रायल आणि जॉर्डन या दोन देशांच्या सीमेवर असलेला छोटासा समुद्र, त्याच्या अनेक वैशिष्ट्यांमुळे सर्वांना परिचयाचा आहे. या समुद्राची क्षारता सर्वात उच्च स्वरुपाची आहे. समुद्राच्या हजार वजनी भाग पाण्यात क्षारांचे जे प्रमाण असते त्याला क्षारता असे म्हणतात. सामान्यपणे सागरजलाची क्षारता हजारी ३५ असते. मृत समुद्राची क्षारता हजारी २४० इतकी प्रचंड आहे. सभोवताली पसरलेला ओसाड वाळवंटी प्रदेश, अभावानेच पडणारा पाऊस, उष्ण हवामानामुळे समुद्राच्या पाण्याचे मोठ्या प्रमाणावर होणारे बाष्पीभवन आणि समुद्रामध्ये गोड्या पाण्याची भर टाकणाऱ्या मोठ्या नद्यांचा अभाव यामुळे मृत समुद्राचे पाणी दिवसेंदिवस अधिकच खारट बनत चालले आहे.

मृत समुद्राचे आणखी एक वैशिष्टच आहे. सामान्यपणे समुद्रसपाटी ही शून्य मानली जाते व त्यानुसार इतर स्थळांच्या उंची किंवा खोलीचे मापन केले जाते. मृत समुद्रच मुळी सामान्य समुद्रसपाटी खाली ४०० मीटर्स खोलीवर आहे. समुद्रसपाटी हा शब्दप्रयोग मृत समुद्राच्या बाबतीत लागू पडत नाही असे म्हणता येईल. शिवाय हा समुद्र सर्व बाजूंनी जमिनीने वेढलेला आहे. तो इतर कोणत्याही मोठ्या समुद्राला जोडलेला नाही. अशा या मृत समुद्राच्या निम्म्या भागावर इस्रायलची मालकी आहे तर निम्या भागावर जॉर्डनची. फार मोठी क्षारता आणि सामान्य समुद्रसपाटीखाली इतक्या खोलीवर असणे या तसे पाहता या समुद्राच्या संदर्भातल्या प्रतिकूल गोष्टीच. पण इस्रायलने या प्रतिकूल वैशिष्ट्यांचाच आपल्या फायद्याच्या दृष्टीने कसा उपयोग करून घ्यायचे ठरवले आहे हे पाहणे मनोरंजक तर आहेच पण नैसर्गिक प्रतिकूलतेमुळे अविकसित राहिलेल्या राष्ट्रांना एक वेगळी वाट दाखविणारे आहे.


भूमध्य समुद्रापासून नकाशात केवळ ८० कि. मीटर्स अंतरावर असलेल्या मृत समुद्राची पातळी भूमध्य समुद्राच्या पातळीच्या खाली ४०० मीटर्स आहे. या गोष्टीचा इस्रायलने विलक्षण चातुर्याने उपयोग करून घेऊन वीज निर्मितीसाठी मृत समुद्र प्रकल्प हाती घ्यायचे ठरविले आहे. प्रकल्पामागचे तत्त्व तसे साधे आणि सोपेच आहे. भूमध्य समुद्र आणि मृत समुद्र यामध्ये ज्यूडियन पर्वत नावाचा एक पर्वत आहे. या पर्वताखालून एक बोगदा खणून भूमध्य समुद्राचे पाणी दुसऱ्या बाजूला आणायचे आणि तेथून कृत्रिम जलाशयातून




ते खाली थेट ४०० मीटर्स खोलीवर असलेल्या मृत समुद्रात सोडायचे. ४०० मीटर्स खाली कोसळणाऱ्या पाण्यावर जनित्र चालवून वीज निर्माण करायची. म्हणजे इस्रायलचे हे वीज निर्मितीकेंद्र समुद्रसपाटीखाली ४०० मीटर्सवर मृत समुद्रावर असले तरी चालणार. मात्र भूमध्य समुद्राच्या पाण्यावर प्राथमिक अंदाजानुसार ३०० मेगॅवॅट क्षमतेचे केंद्रं सहज आणि किफायतशीरपणे चालवता येणे शक्य आहे असे आढळून आले आहे. तथापि भूमध्य समुद्राचे १० कोटी घनमीटर पाणी ४०० मीटर्स खाली कोसळल्यामुळे १०० ते १५० मेगॅवॅट वीज निर्माण होईल व प्रकल्पाचा सर्व खर्च केवळ तीस वर्षात भरून निघेल. हा झाला दोन समुद्राच्या पातळीमधील फरकाचा उपयोग. इस्रायल एवढ्यावर थांबणार नाही. दोन समुद्राच्या क्षारतेमध्ये जी तफावत आहे त्याचा सुद्धा ऊर्जा निर्मितीसाठी उपयोग केला जाणार आहे.

भूमध्य समुद्राची क्षारता हजारी ४० तकी आहे. म्हणजेच मृतसमुद्राची क्षारता




भूमध्य समुद्राच्या क्षारतेच्या सहापटीनी जास्त आहे. भूमध्य समुद्राचे पाणी मृत समुद्रात पृष्ठभागावर साठल्याने तळाशी जास्त क्षारतेचे पाणी व पृष्ठभागावर कमी क्षारतेचे पाणी अशी रचना होईल व त्यामुळे संपूर्ण मृत समुद्र हा सौर–उष्णता शोषून घेणारे एक मोठे संयंत्र बनेल. ही उष्णता तळाशी असणाऱ्या जास्त क्षारतेच्या पाण्यात साठविली जाईल व तिचा ऊर्जा निर्मितीसाठी उपयोग करता येईल. एक प्रचंड सौर-तलाव म्हणून इस्रायल या समुद्राचा उपयोग करणार आहे.

जॉर्डन नदीचे गोडे पाणी मृत समुद्राला मिळते तेथे क्षारतेमधील भिन्नतेचा उपयोग करून घेऊन प्रेशर रिटार्डेड ऑस्मॉसिस PRO या आधुनिक तंत्राचा वापर करून इस्रायल अत्यंत अल्प खर्चात वीज निर्माण करू शकेल. परंतु त्यासाठी आवश्यक तेवढे पाणी जॉर्डन नदीमधून उपलब्ध होणे शक्य नसल्यामुळे भूमध्य सागरातून मृत समुद्रात सोडल्या जाणाऱ्या पाण्याचा पुन्हा एकदा उपयोग करता येणे शक्य आहे व त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

इस्रायलच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे ऊर्जेचा प्रश्न सुटणारच आहे; पण त्याच बरोबर आणखी एक हेतू साध्य होणार आहे. मृतसमुद्राला केवळ जॉर्डन ही एकमेव नदी मिळते. या नदीतील पाण्याचा इस्रायल आणि जॉर्डन या दोन्ही देशांनी गेल्या २५ वर्षात जलसिंचनासाठी इतक्या प्रचंड प्रमाणावर उपसा केला आहे की त्यामुळे या नदीतून मृत समुद्राला पाण्याचा होणारा पुरवठा नगण्य स्वरूपाचा आहे. समुद्राभोवतालचा प्रदेश ओसाड वाळवंटी आहे. उष्णतेमुळे समुद्राचे प्रती वर्षी सुमारे १२० कोटी घन मीटर पाणी वाफ होऊन जाते. प्रचंड प्रमाणात होणाऱ्या बाष्पीभवनामुळे चालू शतकामध्येच मृत समुद्राची पातळी १० मीटर्सनी खाली गेली आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर अल्प काळातच हा समुद्र नष्ट होऊन जाईल. व खऱ्या अर्थाने तो मृत समुद्र ठरेल. नव्या प्रकल्पामुळे अखेरच्या घटका मोजत असलेल्या या समुद्राला भूमध्य समुद्राच्या पाण्याचे इंजेक्शन मिळाल्यामुळे संजीवनी प्राप्त होईल. आणि त्याचा मृत्यूयोग टळू शकेल.

ज्याच्या अस्तित्वावर सतत टांगती तलवार आहे असा इस्रायलसारखा चिमुकला देश मृत समुद्र प्रकल्पासारख्या खऱ्या अर्थाने बहुउद्देशी असलेल्या प्रकल्पांचे नियोजन करतो यातून आपण बरेच काही शिकण्यासारखे आहे. गंगा–कावेरी प्रकल्पामुळे द. भारतातल्या उन्हाळ्यात रोडावणाऱ्या नद्यांना गंगेच्या पाण्याचे इंजेक्शन देऊन संजीवनी देणे शक्य आहे. पण त्यासाठी इस्रायलचा आदर्श समोर ठेवण्याची गरज आहे. तोपर्यंत भारतीयांच्या दृष्टीने ती एक परिकथाच राहील. □



**MANOOS WEEKLY** ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) **Regd. No. PNCW–28**

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला ' माणूस ' केले. मनुष्यात ' ईश्वरी ' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार विवेचनासह प्रकाशित झालेली पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

---

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

## लेक वालेसा

डॉ. श्रीकांत मुंदरगी

**बावीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

---

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

## काही दिवस श्यामचे काही राधाचे

फिरोझ रानडे

पंचवीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

---

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

## मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू

**वीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**